महाराष्ट्र पोलीस दलाचे मुखपत्र

महाराष्ट्र पोलीस

सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

# दक्षता

- कथा
- लेख
- कविता
- ललित लेख

सर्वदूर पोहोचलेले वाचकप्रिय मासिक

Vol : 51 | Issue : 11 | Mumbai | Marathi Monthly | August 2025 | Pages 84 | RNI No. 21352 | Price : Rs. 30/-



शौर्यपदक, उल्लेखनीय सेवेबद्दल राष्ट्रपती पदक व गुणवत्तापूर्ण सेवेसाठीचे पदक अलंकरण समारंभ



राज्य राखीव पोलीस बल गट क्र. ५ दौंड येथे पार पडलेले रक्तदान शिबीर



गडचिरोली पोलिसांच्या उपक्रमातून सेवा व संवेदनशीलतेचा नवा अध्याय



प्रिय बालपण



एकटेपणाची महामारी

महाराष्ट्र राज्य पोलिसांचे मुखपत्र

# दक्षता

महाराष्ट्र पोलीस

सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

सर्वदूर पोहोचलेले वाचकप्रिय मासिक...

## आता दक्षता पीडीएफ स्वरूपात महाराष्ट्र पोलिसांच्या संकेतस्थळावर

## मोफत उपलब्ध!

**S.B.Collect**

**छापील मासिकाची ऑनलाईन वर्गणी भरण्यासाठी**

**https://www.mahapolice.gov.in/daksha-pay.php**

***अथवा***

खालील क्युआर कोड आपल्या मोबाईलमध्ये स्कॅन करा.




**दक्षता छापील अंकाची नियमित मासिक वर्गणी रु. ३०/-**
**वार्षिक वर्गणी रु. ३००/- फक्त**

**वेबसाईटवर दक्षता मासिक मोफत वाचण्यासाठी : https://www.mahapolice.gov.in/dakshata-magazine/**

अथवा खालील क्युआर कोड आपल्या मोबाईलमध्ये स्कॅन करा

**https://www.mahapolice.gov.in/ dakshata-magazine**

YouTube MAHARASHTRA POLICE HEADQUARTERS- DAKSHATA अंतर्गत नव्या यु-ट्युब चॅनलवर ऐका दक्षता मासिकातील दर महिन्याची उत्कृष्ट तपासकथा ऑडिओ-व्हिज्युअल स्वरूपात.

पत्रव्यवहारासाठी पत्ता: महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१,
वर्गणीसाठी दूरध्वनी: ०२२-२२०४९७०१, email: mpd.dakshata@mahapolice.gov.in

**पोलीस आणि जनता यांच्यातील जिव्हाळ्याच्या नात्यामध्ये आपणही सहभागी व्हा!**




ऑगस्ट २०२५ । वर्ष ५१ वे । अंक ११ वा

**मार्गदर्शन**
**रश्मि शुक्ला**
पोलीस महासंचालक
महाराष्ट्र राज्य, मुंबई

**कृष्ण प्रकाश**
अपर पोलीस महासंचालक
(नि. व स.) (अतिरिक्त कार्यभार)

**मुद्रक/ प्रकाशक/ सरसंपादक**
**विजय मनोहर खरात**
सहायक पोलीस महानिरीक्षक

**अंकरचना व अंतर्गत व्यवस्थापन**
**सुरेंद्र बनगे**
कार्यालय अधीक्षक

**पत्रव्यवहारासाठी पत्ता**
सरसंपादक दक्षता
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय,
शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा,
मुंबई ४००००१
दूरध्वनी:०२२ २२०४९७०१/२२८३४५११
mpd.dakshata@mahapolice.gov.in

**वितरण व्यवस्था**
वर्गणीसाठी संपर्क
दूरध्वनी : ०२२ २२०४९७०१

**मांडणी, मुद्रण व प्रकाशन**
विजय मनोहर खरात यांनी महाराष्ट्र स्टेट पोलीस वेल्फेअर फंड यांचेकरिता मे. प्रिंट प्लस प्रा. लि. २१२, स्वस्तिक चेंबर्स, एस टी रोड, चेंबूर, मुंबई ४०००७१ येथे मुद्रित करून महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४००००१ येथून प्रसिद्ध केले.

संपादक : **विजय मनोहर खरात**
१०२, आर विंग, मोहन पाम्स, चैतन्य विद्यालयाजवळ, शिरगांव, बदलापूर, जि. ठाणे
नागरिकत्व भारतीय

एकूण पृष्ठे ८४

*या अंकातील लेखकांच्या विचारांशी संपादक मंडळ अथवा महाराष्ट्र राज्य पोलीस दल सहमत असेलच असे नाही.*

# संपादकीय...



नमस्कार. वाचकांसाठी ज्ञान, माहिती आणि मनोरंजनाची मेजवानी देणारा दक्षताचा अंक पुन्हा एकदा नव्या उत्साहाने प्रकाशित करत आहोत.

राज्यातला नक्षलप्रवण जिल्हा अशी ओळख असलेला गडचिरोली जिल्हा आता आपली नवी ओळख निर्माण करण्याच्या प्रयत्नात आहे. पोलीस दलाच्या सहकार्याने जिल्ह्यातल्या भामरागड उपविभागात अबूजमाडच्या पायथ्याशी वसलेल्या अतिदुर्गम मरकणार या गावापासून अहेरीपर्यंत बससेवा सुरू करण्यात आली आहे. या बसच्या रूपाने या दुर्गम परिसरातील नागरिकांना वाहतुकीचा एक पर्याय तर उपलब्ध झालेला आहेच, शिवाय या परिसराच्या विकासाचा मार्ग मोकळा झाला आहे. या बससेवेमुळे सुमारे १२०० हून अधिक नागरिकांचा प्रवास सुलभ होणार आहे. विशेषत: वृद्ध व्यक्ती, रुग्ण, विद्यार्थी यांच्यासाठी तर हे वरदान ठरणार आहे. या गोष्टीचा तसेच जिल्ह्यात पोलीस दलाने राबवलेल्या रक्तदान शिबीर, सायकल रॅली, ५०० वृक्षांचे केलेले रोपण अशा विविध उपक्रमांचा ऊहापोह करणारा लेख अंकात प्रसिद्ध करत आहोत.

रारापोब गट क्र.५, दौंड येथे अधिकारी, अंमलदार, शहीद जवानांचे कुटुंबीय, अनुचारी वर्ग या सर्वांना रुग्ण सेवा देण्यासाठी ‘युनिट डिस्पेंसरी’ कार्यरत आहे. याबद्दलची व तिथे राबवण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती देणारा लेख अंकात समाविष्ट केलेला आहे.

याव्यतिरिक्त अवकाश संशोधन या वेगळ्या व प्रतिष्ठित क्षेत्रातल्या करिअर संधींची माहिती देणारा श्री. सुरेश वांदिले यांचा मार्गदर्शनपर लेख, बँकेमधील नॉमिनेशनबाबत माहिती देणारा श्री. सुधाकर कुलकर्णी यांचा लेख, पावसातल्या गाण्यांवर भाष्य करणारा श्री. संजीव देवकर यांचा लेख, श्रावणमासाचे अंतरंग उलगडणारा श्रीमती भारती सावंत यांचा लेख, एकटेपणावरचा श्रीमती स्मिता जिंतूरकर यांचा लेख, व्यसनांच्या दुष्परिणामांबद्दल बोलणारा श्री. बबन चिखले यांचा लेख इत्यादी साहित्य वाचकांना आवडेल असा विश्वास वाटतो.

याशिवाय कथा, तपासकथा, पाककृती, शब्दकोडे ही नेहमीची सदरे आहेतच. वाचकवर्ग अंकाचे स्वागत करेल ही अपेक्षा.

आपला स्नेहांकित,

**(विजय खरात)**
**सहायक पोलीस महानिरीक्षक,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई**

# सेवा आणि संवेदना



मरकणार ते अहेरी बससेवेमुळे परिसरातील नागरिकांसाठी वाहतुकीचा पर्याय उपलब्ध झाला असून जिल्ह्यात शांतता राखण्यासाठी आणि विकासाच्या मार्गातले अडथळे दूर करण्यासाठी साहाय्य होणार आहे. या बससेवेच्या माध्यमातून १२०० हून अधिक नागरिक, रुग्ण, विद्यार्थी यांचा प्रवास सुलभ होणार आहे. वर्षभर ही सेवा उपलब्ध राहणार आहे. यानिमित्ताने पोलीस दलाची सेवा आणि संवेदना यांचे अनोखे पर्व सुरू झाले आहे.

दक्षताच्या सर्व वाचकांना सस्नेह नमस्कार.

महाराष्ट्र पोलीस दलातील पोलीस अधिकारी/अंमलदार यांना शौर्यपूर्ण कामगिरीबद्दल केंद्र शासनाकडून स्वातंत्र्यदिन २०२२, प्रजासत्ताक दिन २०२३, स्वातंत्र्यदिन २०२३ व प्रजासत्ताक दिन २०२४ रोजी शौर्यपूर्ण कामगिरी बद्दल ६४ पोलीस शौर्यपदके, उल्लेखनीय सेवेबद्दल ०४ राष्ट्रपती पोलीस पदके व गुणवत्तापूर्ण सेवेसाठी ४० पोलीस पदके अशी एकूण १०८ पदके जाहीर झाली आहेत. या पदकप्राप्त पोलीस अधिकारी व अंमलदारांचा पदक अलंकरण समारंभ राजभवन येथे दिनांक २९ जुलै २०२५ रोजी संपन्न झाला. सर्व पदकप्राप्त अधिकारी/अंमलदारांचे हार्दिक अभिनंदन.

कर्तव्यनिष्ठापूर्वक सेवा बजावून सेवानिवृत्त झालेल्या पोलीस अधिकारी/अंमलदारांच्या निधनानंतर त्यांच्या कुटुंबीयांना व इतर सेवानिवृत्त पोलिसांना त्यांच्या सेवेची आठवण राहावी आणि त्यांचा गौरव व्हावा यासाठी त्यांचे सन्मानपूर्वक अंत्यसंस्कार करणे हे महाराष्ट्र पोलीस दलाचे कर्तव्य आहे. दिनांक २१ जुलै २०२५ रोजीच्या स्थायी आदेशान्वये सेवानिवृत्त पोलीस अधिकारी व अंमलदारांच्या मृत्यूनंतर अंत्यसंस्कार व शोकसंदेशासाठी कार्यपद्धती निश्चित करण्यात आली आहे. याअंतर्गत सदर पोलीस अधिकारी अथवा अंमलदार यांचा मृत्यू झाल्यावर विहित निर्देशांनुसार प्रतिनिधी अधिकारी नियुक्त करण्यात येऊन कुटुंबीयांना अंत्यसंस्कारांसाठी मदत केली जाईल. त्याचप्रमाणे अंत्यसंस्कारानंतर कुटुंबीयांना पेन्शन, विमा, निधी मिळण्यात साहाय्य केले जाईल. मृत व्यक्तीच्या कुटुंबाला भावनिक आधार देणे व विभागातर्फे सहवेदना व्यक्त करणे हा यामागील उद्देश आहे.

गडचिरोली जिल्ह्यात जनहिताचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून पोलीस प्रशासन विविध पातळ्यांवर प्रयत्नशील आहे. पोलीस दलाच्या अथक प्रयत्नांमधून गडचिरोली जिल्ह्यातल्या भामरागड उपविभागातील अबूजमाडच्या पायथ्याशी वसलेल्या अतिदुर्गम मरकणार गावात मरकणार ते अहेरी अशी बससेवा सुरू करण्यात आली आहे. यामुळे परिसरातील नागरिकांसाठी वाहतुकीचा पर्याय उपलब्ध झाला असून जिल्ह्यात शांतता राखण्यासाठी आणि विकासाच्या मार्गातले अडथळे दूर करण्यासाठी साहाय्य होणार आहे. या बससेवेच्या माध्यमातून १२००



**महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल मा. श्री. सी. पी. राधाकृष्णन, उपमुख्यमंत्री मा. श्री. एकनाथ शिंदे, मा. श्री. योगेश कदम, गृहराज्यमंत्री (शहरे), आणि पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, श्रीमती रश्मि शुक्ला, तसेच वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत राजभवन येथे स्वातंत्र्यदिन २०२२, प्रजासत्ताक दिन २०२३, स्वातंत्र्यदिन २०२३ व प्रजासत्ताक दिन २०२४ रोजी जाहीर झालेल्या शौर्यपदक, उल्लेखनीय सेवेबद्दल राष्ट्रपती पदक व गुणवत्तापूर्ण सेवेसाठीचे पदक अलंकरण समारंभ पार पडला.**

हून अधिक नागरिक, रुग्ण, विद्यार्थी यांचा प्रवास सुलभ होणार आहे. वर्षभर ही सेवा उपलब्ध राहणार आहे. यानिमित्ताने पोलीस दलाची सेवा आणि संवेदना यांचे अनोखे पर्व सुरू झाले आहे. तसेच जिल्ह्यात पोलीस दलाने १४ जून २०२५ रोजी जागतिक रक्तदान दिनाचे निमित्त साधून रक्तदान शिबीर राबवले. या माध्यमातून समाजामध्ये मानवी संवेदनांचे रोपण आणि जीवनमूल्यांची पेरणी करण्याचा पोलीस दलाचा प्रयत्न नक्कीच प्रशंसनीय आहे. त्याचप्रमाणे दिनांक ३ जून २०२५ रोजी जागतिक सायकल दिनी आयोजित केलेली सायकल रॅली, दिनांक ५ जून २०२५ रोजी जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत ५०० वृक्षांचे केलेले रोपण अशा विविध उपक्रमांमुळे पोलीस आणि नागरिक यांच्यातील परस्परसंबंध अधिक दृढ होतील, असा विश्वास वाटतो.

दिनांक ६ जुलै २०२५ रोजी संपूर्ण राज्यभरात आषाढी एकादशी उत्साहात साजरी झाली. या सणास जनमानसात अनोखे धार्मिक आणि सांस्कृतिक महत्त्व आहे. या निमित्ताने विठ्ठलाचे दर्शन घेण्यासाठी जाणाऱ्या लाखो भाविकांच्या श्रद्धांचा आदर करत, वारीच्या परंपरा कायम राखतानाच गर्दीचे व वाहतुकीचे नियोजन करण्याची आव्हानात्मक कामगिरी महाराष्ट्र पोलिसांनी नेहमीप्रमाणेच उत्तम प्रकारे पार पाडली. त्यामुळेच वारीचा सोहळा निर्विघ्नपणे पार पडू शकला. या निमित्ताने महाराष्ट्र पोलीस दलाची केवळ कर्तव्यदक्षताच अधोरेखित झाली नाही, तर राज्यातील लाखो भाविकांशी त्यांचे आपुलकीचे आणि विश्वासाचे नाते निर्माण झाले आहे, ही निश्चितच अभिमानास्पद बाब आहे.

सणसमारंभ, उत्सव, मिरवणुका अशा प्रसंगी महाराष्ट्र पोलीस दल कायदा व सुव्यवस्था राखण्याकामी कर्तव्यतत्पर असते. या महिन्यात दहिहंडी तसेच गणेशोत्सव हे महत्त्वाचे उत्सव साजरे होणार आहेत. या सोहळ्यांच्या वेळी होणारी गर्दी तसेच संभाव्य अनिष्ट घटना यांचा विचार करून परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी महाराष्ट्र पोलीस दल सुसज्ज आहे. तसेच जनतेनेही पोलिसांना उत्तमरीत्या सहकार्य करावे, ही अपेक्षा आहे.

दिनांक १५ ऑगस्ट २०२५ रोजी संपूर्ण देशभरात स्वातंत्र्यदिन साजरा होणार आहे. स्वातंत्र्यदिनाच्या निमित्त सर्वांना मन:पूर्वक शुभेच्छा. महत्प्रयासाने आणि असंख्य देशभक्तांच्या त्यागातून आपल्याला स्वातंत्र्य मिळाले आहे, त्यांच्याप्रती कृतज्ञता बाळगणे हे आपले आद्य कर्तव्य आहे. हे स्वातंत्र्य अबाधित राखण्यासाठी अविरत झटण्याची आणि देशाचा आदर्श नागरिक बनण्याची या निमित्ताने प्रतिज्ञा करूया.

जयहिंद!

**आपली स्नेहांकित,**



रश्मि शुक्ला

**पोलीस महासंचालक,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई**

# अंतरंग



## पोलीस विशेष


०७


०७. जनसंपर्कातून जनकल्याणाकडे : गडचिरोली पोलिसांच्या उपक्रमातून सेवा व संवेदनशीलतेचा नवा अध्याय – **नीलोत्पल, पोलीस अधीक्षक, गडचिरोली**

१७. 'युनिट डिस्पेंसरी' राज्य राखीव पोलीस बल गट क्र. ५ दौंड : रुग्णसेवेचा आधुनिक वारसा असणारी संस्था... – **सोमनाथ वाघचौरे, समादेशक रारापोबल गट क्र. ५, दौंड**

४४. लोहमार्ग मुंबई पोलिसांची उल्लेखनीय कामगिरी: १२ तासांत मेल एक्सप्रेसमध्ये चोरी करणाऱ्या सराईत चोरास अटक **– विजय खेडकर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गुन्हे शाखा, लोहमार्ग मुंबई**



१७

## नवी दिशा... नवीन संधी


३९


३९. गगनभरारी – **सुरेश वांदिले**


## कथा


३२. भावना – **प्रा. शरद मनसुख**

५२. गणपती पावला – **सचिन बेंडभर**


## कविता


३२


१६. नको दुरावा नात्यांमधला – **प्रा.बी.एन. चौधरी**

२४. कवीचे मन – **पल्लवी रासकर**

४६. पुस्तकं वाचू, आयुष्य घडवू – **प्रिन्स पाटील**

५४. कोण हा राजा ये आकाशातूनी? – **रघुनाथ मोहिते**

७७. प्रेरणेने याच एका – **दत्तात्रय जोशी**


## लेख


२८


१३. नामनिर्देशन(नॉमिनेशन)मधील नव्याने झालेले बदल– **सुधाकर कुलकर्णी**

२५. व्यसनांचा विळखा – **प्रा. प्रदीप चिखले**

२८. एकाकीपणाची महामारी ! – **स्मिता जिंतुरकर**

३५. चला झिम्माड होऊ – **भारती सावंत**

४७. रिमझिम गीरे सावन – **संजीव देवकर**

५०. योग-योगाने जूळून आलेले एक अतुट अनमोल नाते – **किर्तीकुमार औरंगाबादकर**

५५. प्रिय बालपण – **पंकज (गंधार) पेडणेकर**



३५

## तपासकथा


५८


५८. घात – **निकेतन कदम, सहा. पोलीस अधीक्षक लातूर**

६३. अनोखे वादळ – **संजय जगताप, पोलीस निरीक्षक, कामशेत पोलीस ठाणे, पुणे ग्रामीण**

६९. क्रोध – **सुनिल पुंगळे, सहा. पोलीस निरीक्षक, नानलपेठ पोलीस ठाणे, परभणी**

७३. लोभ – **चंद्रकांत भोयर, पोलीस अंमलदार रेल्वे पोलीस ठाणे, गोंदिया**

## ७८. सोशल मुशाफिरी

## ७९. पाककृती

## ८१. शब्दकोडे



७९



नीलोत्पल
पोलीस अधीक्षक
गडचिरोली

### जनसंपर्कातून जनकल्याणाकडे :

# गडचिरोली पोलिसांच्या उपक्रमातून सेवा व संवेदनशीलतेचा नवा अध्याय




**अबूजमाडच्या पायथ्याशी विकासाची गती :- गडचिरोली पोलिसांच्या संकल्पातून स्वातंत्र्यानंतर प्रथमच बससेवा : सुरक्षा आणि विकास हा गडचिरोली पोलिसांचा संकल्प**

स्वातंत्र्यानंतर प्रथमच गडचिरोली जिल्ह्यातील भामरागड उपविभागातील अबूजमाडच्या पायथ्याशी वसलेल्या अतिदुर्गम मरकणार गावात बससेवा सुरू होणे, हा केवळ वाहतुकीतील बदल नाही, तर शांती व विकासाच्या प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा आहे. गडचिरोली पोलीस दलाच्या अथक प्रयत्नांमुळे आणि महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या सहकार्याने १६ जुलै २०२५ रोजी मरकणार ते अहेरी बस सेवा सुरू झाली.

गडचिरोली जिल्हा हा आदिवासीबहुल आणि माओवादग्रस्त क्षेत्र म्हणून ओळखला जातो. येथील दुर्गम भौगोलिक परिस्थितीमुळे नागरिकांना जीवनावश्यक कामांसाठी अनेकदा मैलोन्‌मैल पायपीट करावी लागत होती. मरकणारसह फुलनार,

कोपर्शी, पोयारकोटी यांसारख्या गावांसाठी बससेवा ही केवळ एक स्वप्नवत गोष्ट होती. पण या दिवशी हे स्वप्न सत्यात उतरले.

बससेवेच्या उद्घाटनावेळी गावातील नागरिकांनी राष्ट्रध्वज फडकवत, तिरंगा रॅली काढून, फटाके फोडत आणि घोषणा देत या ऐतिहासिक क्षणाचे जल्लोषात स्वागत केले. गावचे पाटील श्री. झुरू मालू मट्टामी यांच्या हस्ते बससेवेचे उद्घाटन करण्यात आले. सीआरपीएफ ३ बटालियनचे असिस्टंट कमांडंट अविनाश चौधरी आणि पोलीस स्टेशन कोठीचे प्रभारी अधिकारी पोलीस उपनिरीक्षक दिलीप गवळी यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवला गेल्यानंतर बस मार्गस्थ झाली. गेल्या काही वर्षांमध्ये गडचिरोली पोलिसांनी गडचिरोलीच्या विकासकामांमध्ये मोलाची भूमिका बजावली आहे. आतापर्यंत ४२०.९५ किमी लांबीचे २० रस्ते आणि ६० पूल पोलीस संरक्षणात पूर्ण झाले आहेत. कोठी ते मरकणार रस्ता पूर्ण करण्यात आला असून मरकणार ते मुरुमभुशी रस्त्याचे काम सुरू आहे. तसेच, संवाद सुविधा वाढविण्यासाठी मोबाईल टॉवर बसविण्यात आले आहेत. काही महिन्यांपूर्वी दि. ०९ फेब्रुवारी २०२५ रोजी मरकणार गावातील नागरिकांनी नक्षल गावबंदी ठराव पारित करून माओवादी विचारसरणीपासून दूर राहण्याची शपथ घेतली होती. पोलिसांनी



Devendra Fadnavis
@Dev_Fadnavis

**स्वातंत्र्यानंतर प्रथमच गडचिरोलीतील अतिदुर्गम मरकणार ते अहेरी बस सेवा सुरू !**

गडचिरोली जिल्ह्यातील 'मरकणार' ते 'अहेरी' या अतिदुर्गम भागात पहिल्यांदाच बससेवा सुरू झाली आहे!
राज्याच्या पहिल्या जिल्ह्यातील ही बससेवा केवळ दळणवळणाचा नाही, तर विश्वासाचा आणि विकासाचा मार्ग आहे.
गडचिरोली प्रशासन आणि पोलिस दलाच्या अथक प्रयत्नातून आणि स्थानिक जनतेच्या सहकार्यामुळे शक्य झाल्याचा मला विशेष आनंद आहे.
मा. पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांनी मांडलेली नक्षलमुक्त भारताची संकल्पना हीच आमची प्रेरणा आहे आणि अशा उपक्रमांमुळे जनतेचा विश्वास बळकट होत आहे.

सातत्याने राबवलेल्या नागरी उपक्रमांमुळे हा बदल शक्य झाला. आज बससेवा सुरू होणे हा या विश्वासाचा ठोस पुरावा आहे.

या बससेवेच्या माध्यमातून १२०० हून अधिक नागरिक, रुग्ण, विद्यार्थी यांचा प्रवास सुलभ होणार आहे. वर्षभर ही सेवा उपलब्ध राहील आणि त्यामुळे पोलीस आणि नागरिक यांच्यातील संबंध अधिक दृढ होतील. या बससेवेमुळे केवळ रस्ताच नाही तर विश्वासाचा पूल बांधला गेला आहे. गडचिरोली पोलिसांचे हे प्रयत्न नक्कीच शांती, प्रगती आणि लोकसहभागाच्या दिशेने एक मोठे पाऊल ठरतील.

स्वातंत्र्याच्या ७८ वर्षांनंतर प्रथमच मरकणार ते अहेरी बस सेवेच्या शुभारंभ प्रसंगी मा. देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी आपल्या एक्स अकाऊंट वरून गडचिरोली पोलीस आणि प्रशासनाचे अभिनंदन केले आहे. 'गडचिरोली जिल्ह्यातील मरकणार ते अहेरी या अतिदुर्गम भागात पहिल्यांदाच बससेवा सुरू झाली आहे! राज्याच्या पहिल्या जिल्ह्यातील ही बससेवा केवळ दळणवळणाचा नाही, तर विश्वासाचा आणि विकासाचा मार्ग आहे. गडचिरोली प्रशासन आणि पोलीस दलाच्या अथक प्रयत्नातून आणि स्थानिक जनतेच्या सहकार्यामुळे शक्य झाल्याचा मला विशेष आनंद आहे,' असे उद्गार त्यांनी यावेळी काढले आहेत.

'मा. पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांनी मांडलेली नक्षलमुक्त भारताची संकल्पना हीच आमची प्रेरणा आहे आणि अशा उपक्रमांमुळे जनतेचा विश्वास बळकट होत आहे.' असेही प्रतिपादन त्यांनी याप्रसंगी केले.

## रक्तदान हेच श्रेष्ठ दान– गडचिरोली पोलीस दलाचा मानवतावादी उपक्रम

गडचिरोलीसारख्या दुर्गम आणि माओवादग्रस्त भागात केवळ कायदा व सुव्यवस्था राखणे हेच उद्दिष्ट न राखता, समाजामध्ये मानवी संवेदनांचे रोपण करणे आणि जीवनमूल्यांची पेरणी करणे हाही गडचिरोली पोलीस दलाचा एक व्यापक उद्देश बनला आहे. याच संवेदनशीलतेचा प्रत्यय जागतिक रक्तदान दिनाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या भव्य रक्तदान शिबिराच्या माध्यमातून आला.

जागतिक रक्तदान दिन (World Blood Donor Day) दरवर्षी १४ जून रोजी साजरा केला जातो.

सुरक्षित रक्ताची गरज, त्याचे महत्त्व आणि नियमित रक्तदानाचे फायदे यांबाबत समाजात जनजागृती करणे हा यामागचा उद्देश आहे. सन २००४ पासून हा दिवस जगभरात रक्तदात्यांचा सन्मान करण्यासाठी आणि नव्या रक्तदात्यांना प्रेरणा देण्यासाठी साजरा केला जातो. २०२५ या वर्षीची थीम Give Blood and Keep the World Beating ही आहे, जी रक्तदानाबाबत असलेल्या गैरसमजुती दूर करण्यावर आणि रक्तदानाच्या वस्तुनिष्ठ गरजेवर प्रकाश टाकते.

१४ जून २०२५ रोजी जागतिक रक्तदान दिनाचे औचित्य साधून गडचिरोली पोलीस दलाच्या पोलीस दादालोरा खिडकीच्या माध्यमातून राबविण्यात आलेल्या प्रोजेक्ट उडान अंतर्गत भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. हे शिबिर जिल्हा सामान्य रुग्णालय रक्तकेंद्र, गडचिरोली आणि उप जिल्हा रुग्णालय रक्तकेंद्र, अहेरी यांच्या संयुक्त सहकार्याने पोलीस मुख्यालय, गडचिरोली, पोलीस उप मुख्यालय, प्राणहिता (अहेरी), व उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, सिरोंचा या तीन ठिकाणी एकाच वेळी पार पडले.

**१४ जून २०२५ रोजी जागतिक रक्तदान दिनाचे औचित्य साधून गडचिरोली पोलीस दलाच्या पोलीस दादालोरा खिडकीच्या माध्यमातून राबविण्यात आलेल्या प्रोजेक्ट उडान अंतर्गत भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. हे शिबिर जिल्हा सामान्य रुग्णालय रक्तकेंद्र, गडचिरोली आणि उप जिल्हा रुग्णालय रक्तकेंद्र, अहेरी यांच्या संयुक्त सहकार्याने पार पडले.**

या शिबिरात पोलीस उपअधीक्षक (अभियान) श्री. विशाल नागरगोजे, उपविभागीय पोलीस अधिकारी (अहेरी) श्री. अजय कोकाटे, उपविभागीय पोलीस अधिकारी (सिरोंचा) श्री. संदेश नाईक यांच्यासह जिल्ह्यातील विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी, सीआरपीएफ, एसआरपीएफ व गडचिरोली पोलीस दलातील अधिकारी व अंमलदार तसेच नागरिकांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला. 'रक्तदान हेच श्रेष्ठ दान' ही भावना मनात ठेवून एकूण ३३० रक्तदात्यांनी या शिबिरात रक्तदान केले.

या उपक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे काही आत्मसमर्पित माओवादी सदस्यांनीही यामध्ये सहभाग





**रक्तदान : गडचिरोली पोलीस दलाचा मानवतावादी उपक्रम**

घेतला. कधी काळी हिंसेचा मार्ग स्विकारलेले हे आत्मसमर्पित माओवादी आता समाजाच्या मुख्य प्रवाहात सहभागी होत 'मानवतेच्या सेवेसाठी रक्तदान' करत असल्याचा एक प्रेरणादायी संदेश त्यांनी दिला. गडचिरोली विभागीय समितीचे माजी प्रभारी गिरीधर यांच्यासह एकूण तीन आत्मसमर्पित माओवादी सदस्यांनी रक्तदान करत इतर माओवाद्यांनाही शांततेचा मार्ग स्विकारण्याचा मोलाचा संदेश दिला. प्रत्येक ठिकाणी स्थानिक पोलीस अधिकारी, अंमलदार आणि नागरिकांनीही उत्तम प्रतिसाद दिला. अहेरी, भामरागड, एटापल्ली, हेडरी, सिरोंचा, जिमलगट्टा, असरअलो, पातागुडम यांसारख्या अतिदुर्गम भागातून आलेल्या नागरिकांनी सहभाग नोंदवून गडचिरोली जिल्ह्यातल्या जनजागृतीचे एक आदर्श उदाहरण उभे केले.

गडचिरोली पोलीस दलाच्या वतीने गेल्या काही वर्षांमध्ये आयोजित विविध रक्तदान शिबिरांतून एकूण ३०९९ रक्त युनिट्सचे संकलन करण्यात आले आहे. त्यात २१ ऑक्टोबर २०२३ रोजी पोलीस स्मृती दिनानिमित्त १०७१ युनिट्स, १४ जून २०२४ रोजी ५६० युनिट्स आणि ५ जानेवारी २०२५ रोजी रेझिंग डे निमित्त ११३८ युनिट्स रक्त संकलित करण्यात आले होते. यामध्ये या वर्षीच्या ३३० युनिट्सचा समावेश होतो.

या उपक्रमामध्ये जिल्हा सामान्य रुग्णालय, गडचिरोली व अहेरी येथील रक्तकेंद्रांच्या वैद्यकीय पथकांनी महत्त्वपूर्ण सहभाग नोंदवून, तांत्रिकदृष्ट्या संपूर्ण रक्तदान प्रक्रियेला समर्थ साथ दिली.

गडचिरोली पोलीस दल समाजाच्या मनात सुरक्षिततेसोबत माणुसकीचे बीजही पेरत आहे. या रक्तदान शिबिराच्या माध्यमातून सेवा हीच श्रद्धा आणि रक्तदान हेच श्रेष्ठ दान या मूल्यांचा प्रभावी आविष्कार झाला. या उपक्रमांमधून प्रेरणा घेऊन प्रत्येक जबाबदार नागरिकाने तीन महिन्यातून एकदा रक्तदान करण्याचा संकल्प करावा, अशी अपेक्षा पोलीस दलाच्या वतीने करण्यात आली.

### जागतिक पर्यावरण दिनानिमित्त गडचिरोली पोलीस दलाचा हरित उपक्रम – पर्यावरण संवर्धनासाठी ठोस पाऊल उचलत केले ५०० वृक्षांचे रोपण

पर्यावरण संवर्धन ही आजच्या काळाची अत्यंत महत्त्वाची गरज आहे. वाढते प्रदूषण, जलसंकट, जंगलतोड आणि हवामान बदल या समस्यांमुळे संपूर्ण जग धोक्यात आले आहे. याच पार्श्वभूमीवर संयुक्त राष्ट्रसंघाने १९७२ मध्ये जागतिक स्तरावर पर्यावरण विषयक जनजागृतीसाठी संकल्पना मांडली आणि १९७४ पासून दरवर्षी ५ जून हा दिवस जागतिक पर्यावरण दिन म्हणून साजरा केला जातो. वर्ष २०२५ मधील पर्यावरण दिनाची थीम प्लास्टिक प्रदूषण कमी करणे (Beat Plastic Pollution)

**जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण**






अशी जाहीर करण्यात आली आहे. प्लास्टिक प्रदूषण हा एक गंभीर पर्यावरणीय संकटाचा विषय आहे. यावर प्रभावी उपाययोजना करण्यासाठी समाजातील सर्व घटकांनी जबाबदारीने पुढे येणे अत्यावश्यक आहे.

या पार्श्वभूमीवर गडचिरोली पोलीस दलाने पर्यावरण संरक्षणासाठी आपली बांधिलकी अधोरेखित करत एक महत्त्वपूर्ण हरित उपक्रम राबविला. दिनांक ०५ जून २०२५ रोजी सकाळी ०७.३० वाजता एमआयडीसी मैदानावर आयोजित या कार्यक्रमाअंतर्गत ५०० वृक्षांचे वृक्षारोपण करण्यात आले. जांभूळ, पेरू, सिताफळ, करंजी, शिसम यांसारख्या स्थानिक आणि पर्यावरणपूरक जातींची झाडे निवडण्यात आली. ही झाडे परिसराला केवळ हिरवाईच देणार नाहीत, तर स्थानिक जैवविविधता, तसेच पशुपक्ष्यांसाठी अधिवास निर्माण करण्यासही मदत करतील. या उपक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे पोलीस दल, केवळ वृक्षारोपण करून आपली जबाबदारी संपली असे न समजता, लावलेल्या झाडांचे संवर्धनही करणार आहे. त्यासाठी प्रत्येक झाडाची देखभाल, पाणीपुरवठा आणि संरक्षक उपाययोजना करण्याचा निर्धार पोलिसांनी केला.

गडचिरोली पोलीस दलाचा हा उपक्रम केवळ एक औपचारिक कार्यक्रम नसून सामाजिक जबाबदारीची जाणीव आणि पर्यावरण संवर्धनासाठीची पोलिसांची प्रत्यक्ष कृतिशीलता यांचे द्योतक आहे.

जंगलावर अवलंबून असलेल्या गडचिरोली जिल्ह्यात पोलीस दलाने हाती घेतलेला हा उपक्रम प्रेरणादायी ठरून समाजातील इतर घटकांसाठी आदर्श निर्माण करणारा आहे. 'पर्यावरणाचे रक्षण म्हणजे भावी पिढ्यांचे संरक्षण' या भावनेतून उचललेले हे पाऊल निश्चितच जिल्ह्याच्या पर्यावरणीय संतुलनासाठी मोलाचे ठरेल.

**जागतिक सायकल दिन – पर्यावरण संरक्षण आणि आरोग्य संवर्धनाचा संदेश देणारा गडचिरोली पोलिसांचा अभिनव उपक्रम**

संपूर्ण जगभरात ३ जून हा दिवस जागतिक सायकल दिन म्हणून साजरा केला जातो. संयुक्त राष्ट्रसंघाने सन २०१८ मध्ये या दिनाची औपचारिक घोषणा केली. सायकल ही एक साधी, परवडणारी, विश्वासार्ह, पर्यावरणास अनुकूल आणि आरोग्यवर्धक वाहतूक व्यवस्था आहे. आजच्या गतिमान जीवनशैलीत आरोग्यदायी पर्याय निवडणे ही काळाची गरज बनली आहे आणि याच अनुषंगाने जागतिक सायकल दिन हे जनजागृतीसाठी एक प्रभावी माध्यम ठरत आहे.

या दिनानिमित्ताने गडचिरोली पोलीस दलाच्या वतीने दिनांक ३ जून २०२५ रोजी सकाळी ७ वाजता सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले. रॅलीची सुरुवात पोलीस कवायत मैदान, गडचिरोली येथून झाली व ती इंदिरा गांधी चौकापर्यंत नेण्यात आली. या रॅलीमध्ये अपर पोलीस अधीक्षक (अभियान)



**गडचिरोली पोलीस दलाच्या वतीने आयोजित सायकल रॅली**

श्री. एम. रमेश, पोलीस उप अधीक्षक (अभियान) श्री. विशाल नागरगोजे, विविध पोलीस अधिकारी व कर्मचारी, विशेष अभियान पथकातील जवान, ज्येष्ठ नागरिक, युवक–युवती तसेच अनेक शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी–विद्यार्थिनी यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

ही सायकल रॅली म्हणजे केवळ एक कार्यक्रम नव्हता, तर आरोग्य आणि पर्यावरणविषयक जनजागृतीसाठीचा एक सामूहिक संकल्प होता. रॅलीचा समारोप पोलीस मुख्यालयातील शहीद पांडू आलाम सभागृहात करण्यात आला. या प्रसंगी सर्व सहभागी सायकलस्वारांना पोलीस दलाच्या वतीने सहभाग प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

कार्यक्रमादरम्यान उपस्थितांना मार्गदर्शन करताना असे सांगण्यात आले की, सायकल चालविल्यामुळे फक्त इंधनाची बचत होत नाही तर आपल्या आरोग्यावरही सकारात्मक परिणाम होतो. सायकल चालविणे हे शारीरिक आणि मानसिक आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर आहे. आठवड्यातून किमान दोन दिवस, एक तास सायकल चालविल्यास फिटनेस सुधारतो, वजन नियंत्रणात राहते आणि मानसिक प्रसन्नता अनुभवता येते. विशेषतः युवापिढीने सायकलिंगकडे केवळ व्यायाम म्हणून नव्हे, तर एक जीवनशैली म्हणून पाहण्याची गरज आहे.

**कार्यक्रमादरम्यान उपस्थितांना मार्गदर्शन करताना असे सांगण्यात आले की, सायकल चालविल्यामुळे फक्त इंधनाची बचत होत नाही तर आपल्या आरोग्यावरही सकारात्मक परिणाम होतो. सायकल चालविणे हे शारीरिक आणि मानसिक आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर आहे.**

गडचिरोलीसारख्या दुर्गम आणि निसर्गरम्य भागात पोलीस दल केवळ कायदा व सुव्यवस्था राखण्याचेच काम करत नाही, तर समाजमनामध्ये आरोग्य, स्वच्छता, पर्यावरण आणि शाश्वत जीवनशैली याबाबत जागरूकता निर्माण करण्याचाही प्रयत्न सातत्याने करत आहे. जागतिक सायकल दिनाच्या माध्यमातून एक सकारात्मक संदेश देण्याचा प्रयत्न गडचिरोली पोलीस दलाच्या वतीने केला गेला आहे.

या विविध कार्यक्रमांच्या यशस्वितेकरिता अपर पोलीस अधीक्षक (अभियान) श्री.एम.रमेश, अपर पोलीस अधीक्षक (अहेरी) श्री. सत्यसाई कार्तिक, अपर पोलीस अधीक्षक (प्रशासन) गोकुल राज जी, पोलीस उप अधीक्षक (अभियान) श्री. विशाल नागरगोजे, सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, पोलीस स्टेशन/ उप पोलीस स्टेशन/ पोलीस मदत केंद्र यांचे प्रभारी अधिकारी तसेच नागरी कृती शाखेचे पोलीस उपनिरीक्षक चंद्रकांत शेळके, पोलीस कल्याण शाखेचे पोलीस उपनिरीक्षक नरेंद्र पिवाल, जनसंपर्क शाखेचे पोलीस उपनिरीक्षक प्रतिक भदाणे, सर्व शाखांचे अधिकारी आणि अंमलदार, तसेच जिल्हा सामान्य रुग्णालय गडचिरोलीच्या संपूर्ण टीमने अथक परिश्रम घेतले. तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी (भामरागड) श्री. अमर मोहिते यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन कोठी येथील पोलीस उपनिरीक्षक दिलीप गवळी व सीआरपीएफ आणि जिल्हा पोलीस दलाचे अधिकारी व अंमलदार यांनी मरकणार ते अहेरी बससेवा या उपक्रमासाठी अथक परिश्रम घेतले. ■

# नामनिर्देशन(नॉमिनेशन)मधील नव्याने झालेले बदल



सुधाकर कुलकर्णी
पुणे

बँकिंग सुधारणा कायदा भारतीय संसदेने संमत केला. यात प्रामुख्याने नामनिर्देशन अर्थात नॉमिनेशन प्रक्रियेविषयीच्या अनेक महत्त्वपूर्ण बाबींचा समावेश आहे. या सुधारणांमुळे अनक्लेम खात्यांमधील ठेवी तसेच रोकड आता अनक्लेम न राहता नॉमिनेशन असलेल्या व्यक्तींकडे सहजरित्या सुपुर्द करणे शक्य होणार आहे. ते कसे याचे विवेचन लेखात केले आहे.

संसदेने नुकत्याच मंजूर केलेल्या बँकिंग कायदा (सुधारणा) २०२४ या विधेयकामुळे बँकिंग कायद्यात काही महत्त्वाचे बदल केले आहेत. यातील एक बदल म्हणजे नामनिर्देशन पद्धतीत केलेला बदल. या बदलामुळे प्रचलित नामनिर्देशनात आमूलाग्र बदल होत असून तो निश्चितच ग्राहकाभिमुख आहे. काय आहे हा बदल व यामुळे नेमका काय फायदा होणार आहे हे आता पाहू.



TO BE FILLED IN BY THE BANK

नामांकन पंजीकरण क्रमांक ______ पृष्ठ क्रमांक ______ पर दिनांक ______
Nomination Registration No. ______ on Page No. ______ Dated ______

नामांकन (नामांकन फार्म डीए - १) NOMINATION (NOMINATION FORM da 1)

बैंक जमा के संबंध में बैंकिंग विनियम अधिनियम १९४९ की धारा ४५ जेड ए और बैंकिंग कंपनी (नामांकन) नियम १९८५ नियम २ (१) के अंतर्गत नामांकन
Nomination under sec 45 ZA of the Banking Regulation Act, 1949 and rule 2 (1) of the Banking Companys (Nomination) Rule 1985 in respect of bank deposit

मै/हम I/We ______

(सभी जमाकर्ताओ के नाम व पते - Name/s & Address/es of all depositors)

एतद्वारा निम्नलिखित व्यक्ति को नामित कराता/करती हूं/करते है जिसको मेरी/हमारी/अवयस्क की मृत्यु की दशा में बैंक ऑफ महाराष्ट्र ______ शाखा के खाते में जमा रक्कम जिसके विवरण नीचे दिये गऐ है, वापस की जाए।

Nomination the following person to whom in the event of my/our/minor's death the amount of deposit in the account, particulars where of are given below, may be returned by Bank of Maharashtra ______ Branch

| जमा का प्रकार Nature of Deposits | पहचान हेतु क्रमांक Distinguishing No | अतिरिक्त जानकारी, यदि कोई है Additional details if any | नामित व्यक्ति का नाम व पत्ता Name & Address of Naminee |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |

| जमाकर्ता से रिश्ता, यदि कोई है Nature of Deposits | उम्र Age | यदि नामित व्यक्ति अवयस्क है तो जन्म तिथी If nominee is minor Date of Birth |
|---|---|---|
| | | |

+ चुंकि आज नामित व्यक्ति अवयस्क है इसलिए मै/हम ______ को नामित करता/करती हूँ। करते है जो मेरी/हमारी अवयस्कता अवधि में नामित व्यक्ति की मृत्यु की दशा खाते में जमा रकम प्राप्त करेगा/करेगी।

As nomince is minor no this date I/We appoint ______ to receive the umount of deposit in the account on behalf of the nominee in the event of my/our/minar's death during the minority of the nominee.

स्थान - Place
दिनांक - Date

जमाकर्ता/ओं के हस्ताक्षर/अंगूठे के निशान
++ Signatur (s)/thumb impression of Depositor (s)

गवाह का नाम व पत्ता/Name and address of witness

गवाह का नाम व पत्ता/Name and address of witness

गवाह के हस्ताक्षर
Signature of witness+++

गवाह के हस्ताक्षर
Signature of witness+++

+ नामित व्यक्ति अवयस्क नही है तो काट दें /Strike our if nominee is not a minor

++ जहाँ जमा अवयस्क के नाम पर है, वहाँ अवयस्क की ओर से कार्य करने में सक्षम कोर्ट द्वारा नियुक्त विधिक अभिभावक या माता - पिता नामांकन करें/Where deposit is made in the name of the minor the nomination should be assigned by natural/legal guardian entitled to act on behalf of the minor

+++ अंगूठे के निशान दो गवाह अभिप्रमाणित करेंगे/Thumb impression (s) shall be attested by two witnesses.

आपण आपल्या हयातीत कमविलेल्या चल व अचल संपत्तीचे आपल्या पश्चात योग्य त्या पद्धतीने वाटप होण्याच्या दृष्टीने संपत्तीच्या वाटपाचे नियोजन आपण आपल्या हयातीतच करणे आवश्यक असते. त्यासाठी प्रामुख्याने नामनिर्देशन (नॉमिनेशन) व विल (मृत्यूपत्र) हे दोन प्रमुख पर्याय आहेत. यातील मृत्यूपत्राबाबत अजूनही पुरेशी जागरूकता असल्याचे दिसून येत नाही. यामुळे मृत्यूपत्र करण्याचे प्रमाण अगदी नगण्य आहे. मात्र नॉमिनेशनबाबत गेल्या ८-१० वर्षांमधील रिझर्व्ह बँक तसेच सेबी यांसारख्या नियंत्रकाच्या सततच्या पाठपुराव्यामुळे बऱ्यापैकी जागरूकता दिसून येते. असे असले तरी मार्च २०२४ अखेर एकूण ४२ हजार २७० कोटी इतक्या रकमेचे अनक्लेम्ड डिपॉझिट्स बँकाकडे असल्याचे दिसून येते. याचे एक प्रमुख कारण म्हणजे सर्वसामान्यांना नॉमिनेशनबाबत पुरेशी माहिती नसणे हे होय. यामुळे मृत व्यक्तीच्या नावावर शिल्लक असलेल्या रकमेवर जवळच्या नातेवाईकाकडून

दावा केला जात नाही. जर नॉमिनेशन नसेल तर बँकांना मृताच्या नातेवाईकाची माहिती नसल्याने त्यांच्याशी संपर्क साधणे बँकेस अवघड होऊन जाते. तर काही वेळा खात्यातील रक्कम वारसांच्या दृष्टीने फारशी नसेल तर त्यांना त्यासाठी आवश्यक असणारी पूर्तता करण्यात स्वारस्य नसते. मात्र संपत्ती वाटपाच्या नियोजनाच्या दृष्टीकोनातून नॉमिनेशन हा अगदी सहज व सोपा पर्याय आहे. यामुळे मृत व्यक्तींच्या नावावरील गुंतवणुकीची रक्कम संबंधित वित्त संस्था नॉमिनीच्या नावावर केवळ मृत्यू दाखल्याच्या आधारे वर्ग करू शकते. या आधीच्या नियमानुसार बँकेतील बचत खाते, ठेव खाते, पुनरावर्ती(रिकरिंग ठेव खाते व लॉकर यासाठी केवळ एकाच व्यक्तीचे नामनिर्देशन करता येते आणि जर लॉकर, खाते संयुक्त नावाने असेल तर दोन जणांचे नामनिर्देशन करता येते. त्यामुळे जर खातेदाराच्या आधी नॉमिनीचे निधन झाले असेल, तर मयत खातेदाराच्या नावावर बँकेत शिल्लक असलेली रक्कम वारसा हक्काचा दाखला किंवा मृत्यूपत्र असल्याशिवाय वर्ग करता येत नव्हती. बहुतांश बाबतीत मृत्यूपत्र नसल्याने व वारसा हक्क दाखला मिळण्यास लागणारा दीर्घ कालावधी यामुळे बऱ्याचदा वारसांकडून अशा रकमेवर दावा (क्लेम) केला जात नाही. परिणामी अशा अनक्लेम्ड खात्यांची संख्या सातत्याने वाढत जात असल्याचे दिसून आल्याने यावर एक उपाय म्हणून बँकिंग कायद्यात नुकतीच दुरुस्ती करण्यात आली आहे.

> **संसदेने मंजूर केलेल्या बँकिंग कायद्यानुसार आता बँक ग्राहक त्याच्या बचतखाते, ठेवखाते, पुनरावर्ती(रिकरिंग) ठेवखाते व लॉकर यासाठी जास्तीत जास्त चार जणांना नॉमिनी देऊ शकणार आहे व यातही दोन पर्याय असणार आहेत. याची अंमलबजावणी १ एप्रिल २०२५ पासून सुरू झाली आहे.**

संसदेने नुकत्याच मंजूर केलेल्या बँकिंग कायदा (सुधारणा) विधेयकानुसार आता बँक ग्राहक त्याच्या बचतखाते, ठेवखाते, पुनरावर्ती(रिकरिंग) ठेवखाते व लॉकर यासाठी जास्तीत जास्त चार जणांना नॉमिनी देऊ शकणार आहे व यातही दोन पर्याय असणार आहेत. याची अंमलबजावणी १ एप्रिल २०२५ पासून सुरू झाली आहे.

## पर्याय १:

प्रत्येकाचे स्वतंत्र वेगळे न करता एकाच वेळी (सायमलटेनीयस) चार जणांचे नामनिर्देशन (नॉमिनेशन) करणे व त्यात प्रत्येकाचा हिस्सा किती असेल याचा उल्लेख करणे. उदा: अ या व्यक्तीस पत्नी व दोन मुले व एक मुलगी आहे तर अ या चारजणांना नॉमिनी करून प्रत्येकास समान म्हणजे २५% इतका हिस्सा देऊ शकतो किंवा त्याला हव्या त्या प्रमाणात हिस्सा देऊ शकतो. उदा: पत्नीस ५०%, व दोन्ही मुलांना प्रत्येकी १५% व मुलीस २०% किंवा त्याला योग्य वाटेल तशी टक्केवारी ठरवू शकतो. विशेष म्हणजे हा पर्याय फक्त ठेवखात्यांसाठीच (उदा: बचत खाते, मुदत ठेव खाते, पुनरावर्ती(रिकरिंग ठेवखाते) उपलब्ध असणार आहे. लॉकरसाठी





सेवा में
श्रीमान शाखा प्रबंधक महोदय,
बैंक का नाम एवं एड्रेस लिखे
विषय: नॉमिनी बदलने हेतु प्रार्थना पत्र
महोदय,

सविनय निवेदन है कि मैं ........................... आपके बैंक का एक खाताधारक हूँ. मेरा अकाउंट नंबर है जिसके साथ नॉमिनी में मेरे दोस्त का नाम दर्ज है. अब मैं इस नाम को हटा कर अपने वाइफ ........................ को जोड़ना चाहता हूँ. महोदय, अकाउंट ओपन कराते समय मुझे को नाम सूझ नही रहा था, इसलिए, मैंने ...................... डाल दिया था. अब मैं चाहता हूँ कि निमिनी में ..................... को बदल कर ........................ को जोड़ा जाए. इसके लिए मैंने सभी आवश्यक डाक्यूमेंट्स भी इस पत्र के साथ लगा दिया है.

अतः श्रीमान से विनती है कि मेरे द्वारा प्रदान तथ्यों पर विचार करते हुए बैंक में नॉमिनी चेंज करने की कृपा करे. इसके लिए मैं आपका सदैव आभारी रहूँगा.
धन्यवाद!

भवदिव
नाम: ..............................
बैंक अकाउंट: ..............................
मोबाइल नंबरल: ..............................

हा पर्याय उपलब्ध असणार नाही.

## पर्याय २: सलग (सकसेसिव्ह)

चार जणांचे नामनिर्देशन (नॉमिनेशन) करणे. या पद्धतीमध्ये जरी चारजणांचे नामनिर्देशन करता येत असले, तरी खातेदारच्या मृत्यूनंतर ज्या क्रमाने (ऑर्डर) नामनिर्देशन केले असेल त्या क्रमानुसार हयात असणाऱ्या पहिल्या व्यक्तीस संपूर्ण रक्कम वर्ग केली जाईल. उदा: अ या व्यक्तीने वरीलप्रमाणे आपली पत्नी, दोन मुले व मुलगी असे चौघांचे नामनिर्देशन केले असेल आणि यात पहिले नाव पत्नीचे, दुसरे मुलीचे व तिसरे मोठ्या मुलाचे व चवथे धाकट्या मुलाचे दिले असेल तर अ च्या मृत्यूनंतर त्याच्या खात्यातील संपूर्ण रक्कम पत्नीस दिली जाईल. जर त्यावेळी पत्नी हयात नसेल तर संपूर्ण रक्कम दुसरे नाव असणाऱ्या मुलीस दिली जाईल थोडक्यात त्यावेळी हयात असणाऱ्या पहिल्या क्रमांकावरील व्यक्तीस दिली जाईल. या पर्यायात वरील प्रमाणात टक्केवारी नुसार विभागणी होत नाही. हा पर्याय ठेव खाती तसेच लॉकर या दोन्हीसाठीही उपलब्ध असणार आहे.

वरील दोन्हीही पर्यायांमुळे खातेदारच्या मृत्यूनंतर त्याच्या नावावर शिल्लक असलेली रक्कम तसेच लॉकरमधील चीजवस्तू नॉमिनीस त्वरित व सहजपणे देणे बँकांना शक्य होणार आहे. कसे ते या उदाहरणावरून लक्षात येईल. उदा: श्री. अ यांची बँकेत विविध ठेवखाती तसेच लॉकर आहे व त्यांनी सर्व ठिकाणी आपल्या पत्नीस नॉमिनी दिलेले आहे. मात्र काही दिवसांपूर्वी त्याच्या पत्नीचे दुःखद निधन झाले व श्री अ यांचे त्यानंतर नॉमिनी बदलायचे राहून गेले व पुढील काही दिवसांमध्ये श्री अ यांचेही दुःखद निधन झाले व त्यांच्या पश्चात एक मुलगा व एक मुलगी आहे, मात्र आता दोघांपैकी कोणाच्याच नावाने नॉमिनेशन नसल्याने व श्री अ यांनी मृत्यूपत्र केले नसल्याने वारसा हक्क दाखल्याशिवाय बँक खात्यावरील शिल्लक रक्कम दोघांपैकी कोणच्याही नावावर ट्रान्स्फर (वर्ग) करणार नाही, तसेच तसेच लॉकर उघडण्यास अनुमती देणार नाही. याउलट नवीन निमानुसार आता श्री अ तिघांनाही पर्याय १ किंवा २ प्रमाणे नॉमिनी करू शकतात आणि लॉकरसाठी मात्र फक्त पर्याय २ प्रमाणे नॉमिनी करू शकतात. यामुळे वरील घटना घडल्यास ठेवीची रक्कम पर्यायानुसार मुलांना दिली जाईल व लॉकर व्यवहार सुद्धा करता येतील.

> **नॉमिनीची संख्या आता वाढविली असल्याने बँकेतील मृताचे खाते आता अनक्लेम्ड राहण्याची शक्यता खूप मोठ्या प्रमाणावर कमी होईल. (सध्या असलेली अनक्लेम्ड खाती मात्र वारसाचा दाखला किंवा विलच्या आधारावरच क्लेम करावी लागतील) दोन्ही प्रकारातील नॉमिनी हे केवळ विश्वस्त असतील.**

थोडक्यात नॉमिनीची संख्या आता वाढविली असल्याने बँकेतील मृताचे खाते आता अनक्लेम्ड राहण्याची शक्यता खूप मोठ्या प्रमाणावर कमी होईल. (सध्या असलेली अनक्लेम्ड खाती मात्र वारसाचा दाखला किंवा विलच्या आधारावरच क्लेम करावी लागतील) असे असले, तरी वरील दोन्ही प्रकारातील नॉमिनी हे केवळ विश्वस्त असतील. त्यांनी मिळालेल्या रकमेचे तसेच लॉकरमधील वस्तूंचे वाटप मृत्यूपत्र असल्यास त्यानुसार आणि नसल्यास वारसा हक्कानुसार करावयाचे आहे. हे लक्षात घेणे आवश्यक आहे. याशिवाय सेबीने ३० सप्टेंबर २०२४ रोजी म्युच्युअल फंड व डी–मॅट खात्यासाठीचे नॉमिनेशनचे नियम बदले असून त्यात प्रामुख्याने खालील बदल केले आहेत.

सध्याची म्युच्युअल फंड व डी–मॅट खात्यासाठी असणारी जास्तीत जास्त ३ नॉमिनी संख्या आता १० केली आहे. म्हणजे आता जास्तीत जास्त १० व्यक्तींना नॉमिनी म्हणून नेमता येईल. एखादी व्यक्ती खात्यावरील व्यवहार करण्यास सक्षम नसेल तर नॉमिनी जोखमीबाबतची आवश्यक ती काळजी घेऊन संबंधित व्यक्तीच्या वतीने व्यवहार करू शकेल.

संयुक्त नावाने असणाऱ्या म्युच्युअल फंड व डी–मॅट खात्यासाठी नॉमिनेशन बंधनकारक असणार नाही, मात्र एकाच नावाने खाते असल्यास नामनिर्देशन करणे गरजेचे आहे व ते करावयाचे नसेल तर तसे लेखी स्वरूपात कळवावे लागते.

नॉमिनेशन करताना नॉमिनीची ओळख पटविण्यासाठी आधार कार्ड, पासपोर्ट, पॅन कार्ड यांसारखा ओळखीचा दाखला द्यावा लागतो.

नॉमिनी हा कायदेशीर वारसाचा विश्वस्त म्हणूनच असणार आहे. तसेच नॉमिनीच्या मृत्यूनंतर त्याच्या कायदेशीर वारसाला कुठलाही अधिकार असणार नाही याची काळजी घ्यावी.

याशिवाय आयुर्विमा पॉलिसीज व पीपीएफ खात्यास सुद्धा एकाहून अधिक नॉमिनीज देता येतात व त्यांची टक्केवारी नमूद करता येते. टक्केवारी नमूद केली नसेल, तर सर्व नॉमिनींना रक्कम सम प्रमाणात दिली जाते. तसेच आयुर्विमा पॉलिसीज बेनिफिशीअरी नॉमिनी देता येतो. बेनिफिशीअरी नॉमिनीज क्लेम पोटी मिळणाऱ्या रकमेचा विनियोग हवा तसा करता येतो. कायदेशीर वारसास पेमेंट देण्याचे त्याच्यावर बंधनकारक नसते. म्हणून बेनिफिशरी नॉमिनी नेमताना विशेष खबरदारी घेणे आवश्यक असते.

थोडक्यात असे म्हणता येईल, की नॉमिनेशन मधील या नव्याने झालेल्या बदलामुळे खात्यावरील शिल्लक रक्कम नॉमिनीस देणे आता सहज शक्य होणार आहे आणि यामुळे गुंतवणूक अनक्लेम्ड राहण्याची शक्यता कमी होईल. ▪

कविता

## नको दुरावा नात्यांमधला

**नको दुरावा नात्यांमधला, किल्मिषं सारी झटकून टाकू.**
**स्नेहादराने जगता येथे, क्षण आनंदी वेचून घेवू.**

**घासामधले घास स्वतःचे, सहज कुणाला देता यावे.**
**माणुसकीला यावा गहिवर, अन् घराचे मंदिर व्हावे.**

**जरी इवले काजवे आपण, अंधाराला पळवून लावू,**
**स्नेहादराने जगता येथे, क्षण आनंदी वेचून घेवू.**

**मित्र म्हणावे जिवनी ज्याला, अंतर त्याला कधी न द्यावे,**
**अवगुण त्याचे द्यावे टाकून, सदगुणांचे कौतुक व्हावे.**

**मत्सर सोडू द्वोषही टाळू, हेवे दावे उधळून लावू,**
**स्नेहादराने जगता येथे, क्षण आनंदी वेचून घेवू.**

**दुःख कुणाचे बघतांनाही, डोळ्यांमधूनी अश्रू ढळावे,**
**दिव्यत्वाची पटता ओळख, मीपण तेथे गळून पडावे.**

**जगणे व्हावे एक तराणे, आनंदाने मिळून गाऊ,**
**स्नेहादराने जगता येथे, क्षण आनंदी वेचून घेवू.**



**प्रा.बी.एन. चौधरी.**
**जळगाव.**



सोमनाथ वाघचौरे
समादेशक
रारापोबल गट क्र. ५, दौंड

# 'युनिट डिस्पेंसरी'
# राज्य राखीव पोलीस बल गट क्र. ५ दौंड :
## रुग्णसेवेचा आधुनिक वारसा असणारी संस्था...



रेल्वेचे मोठे जंक्शन असलेले दौंड शहर या ठिकाणी १९६५ साली राज्य राखीव पोलीस बल गट क्र. ५ ची स्थापना झाली. या गटात एकूण अधिकारी, अंमलदार यांची संख्या सुमारे ११०० आहे. सर्व कुटुंबीय मिळून गटात एकूण सुमारे ५००० सदस्य वास्तव्यास आहेत. त्यात शहीद जवान यांचे कुटुंबीय, अनुचारी वर्ग देखील सामील आहेत. या सर्वांना रुग्ण सेवा देण्यासाठी या ठिकाणी 'युनिट डिस्पेंसरी' कार्यरत आहे. या मध्ये एक वैद्यकीय अधिकारी व नऊ कर्मचारी सक्रिय आहेत.

जुन्या इमारतीतून नवीन प्रशासकीय इमारतीमध्ये स्थलांतरीत झालेले हे युनिट आधुनिकतेचा वसा घेऊन मा. अपर पोलीस महासंचालक, श्री. सुरेशकुमार मेखला, परिक्षेत्रीय पोलीस महानिरीक्षक, श्री. राजीव जैन यांच्या मार्गदर्शनाखाली वाटचाल करत आहे. सद्यस्थितीत या गट रुग्णालयात डॉ. नितीन भोसले हे वैद्यकीय अधिकारी म्हणून कार्यरत आहेत.

राज्य राखीव पोलीस दलाच्या आधुनिकीकरणाचा वसा घेतलेले सेवानिवृत्त अपर पोलीस महासंचालक श्री. चिरंजीव प्रसाद व तत्कालीन विशेष पोलीस महानिरीक्षक श्री. नवीनचंद्र रेड्डी व श्री. अशोक मोराळे यांच्या मार्गदर्शनाखाली पाच वर्षांचा कृती आराखडा घेऊन युनिट डिस्पेंसरीच्या आधुनिकीकरणाचा कार्यक्रम आखण्यात आला. त्याचा एकत्रित परिणाम म्हणून युनिट डिस्पेंसरी हे एक आधुनिक युनिट म्हणून आज गटातील अधिकारी, अंमलदार, मंत्रालयीन कर्मचारी, अनुचारी वर्ग, सेवानिवत्त कर्मचारी, शहीद जवान कुटुंबीय, विविध कोर्सेस व प्रशिक्षण घेत असलेले नवप्रविष्ट पोलीस शिपाई यांचेकरिता आपली सेवा वैद्यकीय अधिकारी व अधिनस्थ कर्मचारी यांचे सहकार्याने उपलब्ध करून देत आहे.

## उत्कृष्ट युनिट दवाखाना (डिस्पेंसरी) स्पर्धा-२०२५

राज्य राखीव पोलीस बलात अपर पोलीस महासंचालक, राज्य राखीव पोलीस बल, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे वतीने चालू करण्यात आलेल्या 'उत्कृष्ट दवाखाना(डिस्पेंसरी) स्पर्धा -२०२५' बाबत विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल पुणे/नागपूर या परिक्षेत्रामधील राज्य राखीव पोलीस बलातील उत्कृष्ट दवाखाना (डिस्पेंसरी) स्पर्धा -२०२५ नियुक्त समितीने मूल्यांकन करून अहवाल सादर केला. या अहवालाप्रमाणे युनिट डिस्पेंसरी, राज्य राखीव पोलीस बल गट क्र. ५ दौंड यांनी १०० पैकी ८३ गुण प्राप्त करून प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळवले आहे.

## कामकाज व्यवस्थापन

युनिट डिस्पेंसरीच्या माध्यमातून राज्य राखीव पोलीस बल गट क्र. ५ दौंड मधील पोलीस अधिकारी, अंमलदार, अनुचारी, मोटार परिवहन विभाग, बिनतारी संदेश विभाग, कार्यालयीन लिपीक वर्ग व त्यांचे सर्व कुटुंबीय, सेवानिवृत्त कर्मचारी तसेच या गटात आयोजित केल्या जाणाऱ्या विविध प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये असलेले अधिकारी, अंमलदार यांच्यासाठी बाह्यरुग्ण विभाग व आंतररुग्ण विभाग यांमध्ये आरोग्य सुविधा पुरविण्यात येते. युनिट डिस्पेंसरीमध्ये पुरुष रुग्ण व स्त्री रुग्ण यांच्या सोयीसाठी स्वतंत्र विभागाची व्यवस्था करून सलाईन लावणे, विश्रांती घेणे यासाठी पुरेशा खाटांची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

हृदयरोगाच्या उपचारास येणाऱ्या किंवा आपत्कालीन प्रसंगी रुग्णास उपचार करताना सुलभ जावे म्हणून रिकव्हरी रूमची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

केस पेपर विभाग, औषधनिर्माता विभाग, औषधी भांडार, डिस्पेंसरी स्टोअर, अधिपरिचारीका विभाग, फिजिओथेरपी विभाग, सिक एनसीओ रूम यासह लघुशस्त्रक्रियागृह यांत डिस्पेंसरीचे विविध विभाग कार्यरत आहेत. ड्युटीवर असणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी थांबण्याची वेगळी व्यवस्था करण्यात आलेली आहे.

समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र. ५ दौंड यांचे आस्थापनेवर कार्यरत असणाऱ्या विविध विभागातील पोलीस अधिकारी, अंमलदार, अनुचारी, तांत्रिक सेवा वर्ग यांनी सिक पास घेऊन आल्यावर युनिट डिस्पेंसरी येथे तसेच दौंड शहर या ठिकाणी शासकीय रुग्णालय व महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजनेअंतर्गत येणाऱ्या दौंड व पुणे येथील अद्ययावत हॉस्पिटलमध्ये उपचार करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात येते.

## नियोजित शिबिराचा आराखडा सन – २०२५

| अ. क्र. | महिना | शिबिराचे नाव |
|---|---|---|
| १ | जानेवारी | हाडातील कॅल्शिअम तपासणी शिबीर |
| २ | फेब्रुवारी | स्त्री वंध्यत्व तपासणी व उपचार शिबीर |
| ३ | मार्च | कान नाक घसा तपासणी व उपचार शिबीर |
| ४ | एप्रिल | त्वचारोग तपासणी व उपचार शिबीर |
| ५ | मे | अस्थिरोग तपासणी व सांध्याचे आजार शिबीर |
| ६ | जून | मूळव्याध तपासणी व उपचार शिबीर |
| ७ | जुलै | फुफ्फुस क्षमता तपासणी शिबीर |
| ८ | ऑगस्ट | गर्भवती महिला व बालके संगोपन शिबीर |
| ९ | सप्टेंबर | हिमोग्लोबिन व रक्तशर्करा तपासणी शिबीर |
| १० | ऑक्टोबर | सांसर्गिक आजार निदान, उपचार व माहिती शिबीर |
| ११ | नोव्हेंबर | डोळ्यांची तपासणी शिबीर |
| १२ | डिसेंबर | महिलांचे आरोग्य तपासणी व उपचार शिबीर |

सन २०२४–२५ या वर्षात युनिट डिस्पेंसरी मार्फत रक्तदाब, हृदयविकार, मधुमेह, त्वचा व सौंदर्यवर्धन सल्ला, मानसिक ताण–तणाव व्यवस्थापन, योग प्रशिक्षण, डेंग्यू व साथीचे आजार, उष्माघात, आहार व व्यायामाचे महत्त्व, स्त्री रोग, दंतरोग, मूळव्याध, सेवानिवृत्त व शहीद जवान कुटुंबियांची रक्त तपासणी अशी एकूण ७१ शिबीरे आयोजित करण्यात आली. सन २०२५–२६ मध्ये ही संख्या मार्च २०२५ महिना अखेरीस २१ आरोग्य विषयक शिबीरे आयोजित केली. शिबिरामध्ये एकूण ११८३९ लाभार्थी यांनी लाभ घेतला आहे.

इतर नियोजित उपक्रम

१. मधुमेह, रक्तदाब आहार योजना व्याख्यान

२. स्त्री आरोग्य व महिलांचे अनियमित मासिक त्रास यावर माहितीपर व्याख्यान

३. नेत्रदान, अवयवदान जनजागृती अभियान

४. मानसोपचार तज्ज्ञांचे व्याख्यान

५. लठ्ठपणा व वजन कमी करणे यावर उपयोजना व्याख्यान

६. पोलीस पाल्यांकरिता करियर गाईड्स, स्पर्धा परीक्षा नियोजन करणे

७. स्वच्छता अभियान व वार्षिक स्वच्छता ट्रॉफी अभियान

८. सर्व प्रकारचे दिवस साजरे करणे.

९. रक्तदान अभियान (ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे)

### मानद वैद्यकीय चिकित्सक

युनिट डिस्पेंसरीमध्ये वेगवेगळया आजारावर उपचार मिळणेसाठी मानद वैद्यकीय अधिकारी यांची नेमणूक करण्यात आलेली आहे. मानद वैद्यकीय अधिकारी यांचेसाठी स्वतंत्र कक्ष व तपासणी यंत्रणा यांचे सोयीसह उपलब्ध करून दिलेली आहे.

| अ. क्र. | मानद चिकित्सक | वार | वेळ | सुविधा |
|---|---|---|---|---|
| १ | डॉ. श्री. संजय जयकर | सोमवार | १०.०० ते ११.०० | अस्थिरोग तज्ञ |
| २ | डॉ. सौ. संगिता गायकवाड | मंगळवार | ११.०० ते १२.०० | स्त्रीरोग तज्ञ |
| ३ | डॉ. श्री. समीर कुलकर्णी | मंगळवार | ११.०० ते १२.०० | अस्थिरोग तज्ञ |
| ४ | डॉ. सौ. शलाका लोणकर | बुधवार | ११.०० ते १२.०० | हृदयरोग तज्ञ |
| ५ | डॉ. श्री. अशोक पवार | शनिवार | १०.०० ते १२.०० | मूळव्याध तज्ञ |
| ६ | डॉ. सौ. पूजा भवर | सोमवार व गुरुवार | ०९.०० ते १३.०० | फिजिओथेरपिस्ट |
| ७ | डॉ. सौ. नव्यालता पवार | सोमवार | ०९.०० ते १३.०० | बालरोग तज्ञ |
| ८ | डॉ. सौ. भाग्यश्री कोल्हे | दररोज | १०.०० ते ११.०० | पॅथोलॉजिस्ट |
| ९ | अबुलहसन अबुबकर शेख | दररोज | ०९.०० ते ०२.०० | प्रयोगशाळा तंत्रज्ञ |

## मासिक कार्यक्रम

| | | |
|---|---|---|
| गरोदर माता नावनोंदणी, तपासणी व लसीकरण | महिन्यातील दुसरा सोमवार सकाळी ९ ते दुपारी २ | उपजिल्हा रुग्णालय, दौंड |
| ० ते ५ वयोगटातील मुलांकरिता लसीकरण | महिन्यातील दुसरा सोमवार सकाळी ९ ते दुपारी २ | उपजिल्हा रुग्णालय, दौंड |

याबरोबर या गटामध्ये कोविड काळात क्वारंटाईन सेंटर स्थापन करून सर्वांचे आरोग्य सांभाळले. तसेच गटामधील विशेष कोविड लसीकरण केंद्राद्वारे सुमारे ५००० पेक्षा जास्त लाभार्थींचे लसीकरण केले. सेवेसोबत दंतचिकित्सक, त्वचारोग तज्ञ, नेत्र चिकित्सक व मानसोपचार समुपदेशक यांच्यासाठी विविध शिबिरांच्या माध्यमातून सेवा उपलब्ध करून दिल्या जातात.

मानद वैद्यकीय चिकित्सक यांना पोलीस कल्याण निधीतून नियमाप्रमाणे मानधन अदा करण्यात येते.

### रुग्णांची सांख्यिकी

युनिट डिस्पेंसरी येथे दिनांक ०१/०१/२०२४ ते ३१/१२/२०२४ पर्यंत उपचार घेतलेल्या रुग्णांची संख्या लक्षणीय आहे. आंतररुग्ण व बाह्यरुग्ण विभागात अनुक्रमे १९३ व १३७४० रुग्णांनी युनिट डिस्पेंसरीमध्ये सेवा प्राप्त केली. यादरम्यान विविध कोर्सेस, नवप्रविष्ट पोलीस शिपाई, महाराष्ट्र सुरक्षा बल, परिविक्षाधीन पोलीस उपनिरीक्षक व गटामध्ये आयोजित सशस्त्र पोलीस भरती साठी रुग्णसेवा पुरविण्यात आली. यासोबत येथील अधिकारी व कर्मचारी यांनी अतिरिक्त राज्य राखीव पोलीस बल गट क्र. १९, कुसडगाव यांचे सशस्त्र पोलीस भरतीवेळी प्रथमोपचार सेवा पुरविली. यावर्षी आधुनिकीकरणामध्ये भर पडल्याने या रुग्णसंख्येत नक्कीच वाढ होऊन सेवांच्या माध्यमातून सर्वांना याचा लाभ होईल. ही लक्षणीय रुग्णसंख्या गटामध्ये उपलब्ध असलेल्या कुटुंबियांसोबत व परिसरामध्ये निवासास असलेल्या सेवानिवृत्त कुटुंबियांना दिलेल्या सेवेमुळे आहे हे येथे आवर्जून नमूद करावेसे वाटते.

### विविध प्रतिबंधात्मक लसीकरणाचा अहवाल

युनिट डिस्पेंसरी मध्ये नियमितपणे उपजिल्हा रुग्णालय, दौंड यांच्या आरोग्य पथकामार्फत महिन्याच्या दुसऱ्या सोमवारी गरोदर माता तपासणी व नोंदणी तसेच शासन स्तरावर उपलब्ध असणाऱ्या सर्व लसींचे लसीकरण केले जाते. या लसीकरण कार्यक्रमाचा फायदा गटातील कुटुंबियांनी घेतला. तसेच या गटामध्ये गरोदर मातांना रक्त तपासणी सुविधा उपलब्ध असल्याचा फायदा यानिमित्ताने झालेला आहे.

### डायग्नोस्टिक लॅब

सेवानिवृत्त अपर पोलीस महासंचालक, श्री. चिरंजीव प्रसाद यांच्या प्रेरणेने व मार्गदर्शनाखाली गट क्र. ५ येथील आस्थापनेवर कार्यरत असणाऱ्या अधिकारी, अंमलदार, मंत्रालयीन कर्मचारी, अनुचारी वर्ग, सेवानिवृत्त कर्मचारी, शहीद जवान कुटुंबीय यांचेसाठी मोफत डायग्नोस्टिक लॅब सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे.

युनिट डिस्पेंसरी येथे दिनांक २२/०३/२०२२ पासून ‘डायग्नोस्टिक लॅब’ सुरू करण्यात आली आहे.

## डायग्नोस्टिक लॅब मधील तपासण्या

| Sr. | Test Name | Sr. | Test Name | Sr. | Test Name |
|---|---|---|---|---|---|
| 1 | HB% [Hemoglobin] | 16 | HIV Tridot | 31 | Sr.Uric acid |
| 2 | Platelet Count | 17 | HBsAg Hepatitis B surface antigen | 32 | Sr. Calcium |
| 3 | WBC Count | 18 | UPT [Urine Pregnancy Test] | 33 | CRP [C-reactive Protein] |
| 4 | Hemogram [CBC] | 19 | LFT [Liver Function Test] | 34 | Lipid Profile |
| 5 | Blood Group | 20 | Bilirubin Total | 35 | Cholesterol |
| 6 | ESR | 21 | Bilirubin Direct | 36 | Triglyceride |
| 7 | BT-CT | 22 | Bilirubin Indirect | 37 | HDL [High-density liprotein] |
| 8 | Dengue Ns1 | 23 | SGPT | 38 | Blood Sugar [Fasting] |
| 9 | Dengue Igm | 24 | SGOT | 39 | Blood Sugar [Post Prandial] |
| 10 | Dengue Igg | 25 | Alkaline Phosphatase | 40 | Blood Sugar [Random] |
| 11 | Rapid Malaria | 26 | Total Protein | 41 | Urine Routine |
| 12 | Chikungunya | 27 | Albumin | 42 | Urine Albumin |
| 13 | Widal | 28 | Renal Function Test | 43 | Urine Sugar |
| 14 | Weil Felix | 29 | Sr.Urea | 44 | GTT [Glucose Toler-ance Test] |
| 15 | VDRL | 30 | Sr.Creatinine | 45 | ANC Profile |

सदर डायग्नोस्टिक लॅब सुरू झाल्यापासून आजपर्यंत ९६११ रुग्णांनी या सुविधेचा लाभ घेतला. याबरोबर गटातील अधिकारी, अंमलदार, मंत्रालयीन कर्मचारी, अनुचारी वर्ग यांचे वार्षिक हेल्थ प्रोफाईल दरवर्षी करण्यात येते. यामुळे आजाराची गंभीरता वेळीच निदर्शनास आल्याने त्यावर तज्ञांचे उपचार घेण्यासंबंधी गरजूंना सल्ला दिला जातो.

## युनिट डिस्पेंसरी येथे उपलब्ध आधुनिक सुविधा

Breast Scan (Breast cancer Screening) या उपकरणाद्वारे प्रशिक्षित महिला अधिपरिचारीका यांचेकडून स्त्रियांचे स्तनाचे स्कॅनिंग केले जाते. कॅन्सर सदृश आजाराच्या बाबतीत प्राथमिक तपासणीमध्ये काही आढळल्यास त्यांना तज्ञांद्वारे मार्गदर्शन व पुढील उपचार करता येतो.

Oral Scan (Oral cancer screening) - या उपकरणाद्वारे गटातील स्त्री व पुरूष रुग्णांच्या तोंडाचे स्कॅनिंग केले जाते. कॅन्सर सदृश आजाराचे बाबतीत प्राथमिक तपासणीमध्ये काही आढळल्यास त्यांना तज्ञांद्वारे मार्गदर्शन व पुढील उपचार करता येतो.

(कार्डीओग्राम) – या मशीनद्वारे रुग्णांच्या हृदयाच्या आजाराबाबत प्राथमिक निदान करून उपचाराबाबत तज्ञांचे मार्गदर्शन घेता येते.

फिजिओथेरपी युनिट – डॉ. पूजा भवर, फिजिओथेरपिस्ट, दौंड यांचे मार्गदर्शनाखाली मणक्याचे विकार, कमरेचे विकार, मुका मार लागल्याने दुखणे, सांधे दुखणे, लिगामेंन्टचे विकार व इतर हाडांसंबधी दुखणे, स्नायू आखडणे, मानेचे आजार यावर फिजिओथेरपी उपचार करण्यासाठी गटातील युनिट डिस्पेंसरी येथे खालीलप्रमाणे सुसज्ज फिजिओथेरपी उपकरणे आहेत. या युनिटमध्ये आठवड्यातील सोमवार व गुरुवार रोजी सकाळी ०९:०० ते १३.०० वाजेपर्यंत फिजिओथेरपिस्ट उपलब्ध आहेत.

१) ट्रॅक्शन विथ बेड

२) सर्व्हायकल ट्रॅक्शन

३)Digi FIT Pro



४) अल्ट्रासाऊंड थेरपी युनिट

५) शॉर्ट वेव्ह डायथर्मी मशीन

## युनिट डिस्पेंसरी उल्लेखनीय कामगिरी

- ओरोस्कॅन व ब्रेस्ट स्कॅन मशीन खरेदी .
- राज्य राखीव पोलीस बल, पुणे परिक्षेत्रात उत्कृष्ट गट रुग्णालय स्पर्धा–२०२५ मध्ये प्रथम क्रमांक
- ८ मार्च रोजी कॅम्प परिसरातील महिलांना पुष्प व भेटवस्तूंचे वितरण
- स्वच्छता करंडक स्पर्धा–२०२५ मध्ये १० पैकी १० गुण.
- अभिनव शेती फार्म
- अपंग रुग्णांना बेड, क्रचेस, व्हीलचेअर, हॉट बॅग, टेलर ब्रेस, रुग्णास घरी नेण्यासाठी नेब्युलायझर
- गटामध्ये रोटरी क्लबचे माध्यमातून झाडे लावणे, क्रिकेट लीग, आमदार आरोग्य शिबीरे यांचे आयोजन, कनेक्ट टू पीपल मुव्हमेन्ट मधून लोकसहभाग.
- राज्य राखीव पोलीस बलास मदत करणारे सर्व शासकीय अधिकारी व कर्मचारी यांची सन २०२५ पासून आरोग्य प्रोफाईल तपासणी.
- सहायक समादेशक श्री. सचिन डहाळे यांचे प्रेरणेने अष्टविनायक गणपती पैकी एक सिद्धटेक देवस्थान ट्रस्टचे सर्व पुजारी व सिक्युरिटी स्टाफचे सर्व कर्मचारी यांची मोफत आरोग्य तपासणी.
- युनिट डिस्पेंसरी परिसरात विविध प्रकारची झाडे लावण्यात येऊन त्यांचे उत्तम प्रकारे जतन.
- दौंड शहरातील नागरिकांसाठी गॅलेक्सी लॅब, ओकार्ड कंपनी व श्री. नारायण डोलारव यांचे साहाय्याने २००० जणांसाठी ब्लड शुगर टेस्ट अभियान घेण्याचे नियोजित.



- विविध तज्ञांचे पॉडकास्ट, माहितीपर लेख सर्व अधिकारी, अंमलदार व अनुचारी यांचे पर्यंत पोहचवण्याची व्यवस्था.
- मा. अपर पोलीस महासंचालक, रारापोबल, म.रा. मुंबई यांचे ४ प्रशंसापत्र व मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, रारापोबल, परिक्षेत्र पुणे यांचेकडून उत्कृष्ट कामगिरीबद्दल प्रशंसापत्र प्राप्त
- गटातील १८ ते ३० वयोगटातील महिला सदस्यांकरिता डॉ. आलटकर हॉस्पिटल, हडपसर यांचे सहकार्याने चष्म्याचा नंबर कायमचा दूर करण्यासाठी लेसर असिस्टेड रोबोटीक लेसिक सर्जरीचे मोफत आयोजन.
- सेवानिवृत्त अंमलदारांना प्रत्येक महिन्याच्या २० तारखेला उपलब्धतेनुसार रक्तदाब, मधुमेह, हृदयविकार व संधिवात यावरील औषधांचे वितरण
- ग्रामपंचायत गोपाळवाडी व लिंगाळी येथील ज्येष्ठ नागरिक यांची मोफत रक्त व लघवी तपासणी तसेच शिवजयंतीच्या दिवशी दौंड शहरातील नागरिकांची मधुमेह तपासणी.
- ज्येष्ठ नागरिक संघ, भाजी मंडई, गोपाळवाडी यांना समादेशक श्री. सोमनाथ वाघचौरे यांचे प्रेरणेने प्रथमोपचार पेटीचे वाटप.
- नानवीज प्रशिक्षण केंद्र येथे वार्षिक परिक्षेदरम्यान आरोग्य पथकात सहभाग.
- मा. समादेशक यांचे हस्ते लहान मुलांसाठी दिवाळीला किल्ला निर्मिती व खाऊ वाटप.
- विविध आजाराबाबत व्हॉट्सअ‍ॅप द्वारे माहितीची प्रस्तुती.
- उन्हाळ्यात पक्ष्यांकरिता पिण्याच्या पाण्याची सोय. ■

# कविता

## कवीचे मन

**कवीचे मन म्हणजे विचाररुपी धन**

**जणू काही पेनात भरलेले शब्दरूपी धनं**

**कागदावर टिपलेले गत नि**
**वास्तवकाळातील क्षण**

**कवीचे मन म्हणजे बोध आणि अबोध**
**मनातील भावनांचे बन**

**कवीचे मन म्हणजे जणू काही पावसातही**
**पडलेलं ऊन जणू काही सांगते**
**श्रावण सरींची खूण**

**कवीचे मन म्हणजे जणू काही देव**
**दानवांमध्ये झालेले समुद्रमंथन**
**आणि त्या समुद्रमंथनातून**

**कवीला मिळालेले अमृतरुपी प्राशन**

**कवीच्या मनाचं व्यक्त होताना राहत नाही**
**स्वतःवर भान**

**म्हणूनच तर त्याला समाजामध्ये मिळतो**
**साहित्यिक म्हणून सन्मान**



पल्लवी रासकर
जुन्नर



प्रा. प्रदीप चिखले
मंचर (पुणे)

# व्यसनांचा विळखा

आजकाल अनेक प्रलोभने ही माणसाला खुणावत असतात ड्रग्ज, अंमली पदार्थांचे प्रलोभन हे याच रांगेतले आहे. या प्रलोभनाला सगळ्यात जास्त बळी पडते ती आजची युवा पिढी. या व्यसनाच्या विळख्यात अडकून तिचे उज्ज्वल भविष्य अंधारात ढकलत आहे. या विळख्यात ती कशी अडकत जाते तसेच या विळख्यातून सुटका कशी करून घ्यायची यावर भाष्य करणारा लेख...



**सुसंस्काराने समाज घडवू**
**करू गुन्हेगारीचा नाश**
**व्यसनमुक्त समाजाचे स्वप्न**
**करू आपण साकार**

सध्याचे युग हे स्पर्धात्मक युग आहे. परिणामी आधुनिक तंत्रज्ञान, बदलती जीवनशैली व सततच्या स्पर्धेमुळे मानवाला सातत्याने ताणतणावाला सामोरे जावे लागते. विविध प्रकारच्या स्पर्धा करत असताना अनेकदा बहुतांश समाज व्यसनाच्या विळख्यात अलगद सापडण्याची शक्यता निर्माण होते.

व्यसनांच्या विळख्यामध्ये साधारणतः किशोरवयीन व तरुण वर्गाचे प्रमाण जास्त असल्याचे दिसून येतो. प्रौढवर्ग व ज्येष्ठांमध्ये ही व्यसनांचे प्रमाण त्या खालोखाल आहे.

व्यसन म्हणजे एखादी वाईट सवय किंवा अपायकारक द्रव्य यांच्यावर व्यक्तीचे शारीरिक–मानसिक अवलंबित्व निर्माण होणे आणि व्यसनांशिवाय राहता न येणे. व्यसन हे केवळ शारीरिक नसून ते मानसिक, सामाजिक किंवा डिजिटल स्वरूपाचे असू शकते. पूर्वीच्या काळी दोन स्त्रिया कामानिमित्त एकत्र आल्या, की मशेरीचे व्यसन करताना दिसत असत. पुरुषांमध्ये तंबाखू, दारू, सिगारेट किंवा गुटख्याचे व्यसन पहावयास मिळत असे. तसेच या व्यसनांव्यतिरिक्त कोकेन, हेरॉईन, ब्राऊन शुगर, ड्रग्ज, गांजा, भांग, यांमुळे व्यसनाधीनता वाढत चाललेली आहे.

सध्या समाजामध्ये पार्टी संस्कृती झपाट्याने उदयास येताना दिसत आहे. त्यामध्ये जन्मदिवस, लग्न वाढदिवस, नवीन खरेदी, नवप्राप्ती, विविध प्रकारच्या उपलब्धी इ. चे निमित्त शोधले जाते. मित्रपरिवार एकत्र येतात, विरंगुळ्याचे निमित्त असते व अखेर हे एकत्रीकरण व्यसनांची नांदी घेऊनच येते. औद्योगिकीकरण, कामाचा ताण, वाढती बेरोजगारी, कौटुंबिक कलह, नातेसंबंधतील तणाव इ. बाबींमुळे व्यसने जडली जातात. लहान



मुलांपासून ते मोठ्या व्यक्तिंपर्यंत

**व्यसन म्हणजे एखादी वाईट सवय किंवा अपायकारक द्रव्य यांच्यावर व्यक्तीचे शारीरिक–मानसिक अवलंबित्व निर्माण होणे आणि व्यसनांशिवाय राहता न येणे. व्यसन हे केवळ शारीरिक नसून ते मानसिक, सामाजिक किंवा डिजिटल स्वरूपाचे असू शकते. पूर्वीच्या काळी दोन स्त्रिया कामानिमित्त एकत्र आल्या, की मशेरीचे व्यसन करताना दिसत असत. पुरुषांमध्ये तंबाखू, दारू, सिगारेट किंवा गुटख्याचे व्यसन पहावयास मिळते.**

मोबाईलचा अतिवापर, सतत स्क्रीन समोर राहण्याची सवय ही कालांतराने व्यसनात रूपांतरित होत असते. आजच्या धकाधकीच्या जीवनात पालक व मुले यांच्यात संवाद हरवत चालला आहे. पालकांना मुलांबरोबर हितगूज करण्यास वेळ मिळत नाही. परिणामी मुलांच्या मनात नैराश्य निर्माण होऊन ते व्यसनांच्या आहारी जाऊ शकतात. टी. व्ही., रेडिओ यांमध्ये ज्या जाहिराती येतात त्यामध्ये व्यसने निर्माण करणाऱ्या घटकांना आकर्षित स्वरूप दिले जाते. त्यामुळे व्यसनांकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलतो. सिनेमामध्ये नायक हा व्यसनांना सहजतेने स्वीकारतो हे पाहून त्याचे अनुकरण केले जाते. स्मार्टफोनचा अतिवापर, सोशल मीडिया, गेमिंग इत्यादींमुळे डिजिटल व्यसन वाढीस लागत आहे. ॲमेझॉन, फ्लिपकार्ट, मिशो या डिजिटल शॉपिंगमुळे गरज नसताना

उत्पादने खरेदी करण्याचे व्यसन वाढत आहे. समाजात पोर्नोग्राफी, ऑनलाईन जुगार खेळणाऱ्यांच्या प्रमाणातही दिवसेंदिवस वाढ होत आहे.

मित्रांनो, या व्यसनांचा वाईट परिणाम शरीरावर, मनावर, समाजावर सातत्याने होतो. व्यसनांचा आरोग्यावर गंभीर परिणाम होतो. यामध्ये दारूचा यकृतावर परिणाम होतो. लिव्हर सिरॉसिस, फॅटी लिव्हर, कर्करोग इ. विकार जडतात. दारूचे व्यसन सातत्याने केल्याने मानवाच्या मानसिक आरोग्यावर व्यसनांचा गंभीर परिणाम होतो. यामध्ये नैराश्य, स्मृती दोष, आत्महत्येची प्रवृत्ती तयार होण्याचे परिणाम दिसून येतात. तंबाखू व ड्रग्जमुळे रक्तवाहिन्या अकुंचन पावतात. सिगारेट, गुटखा, तंबाखू इत्यादी मुळे फुफ्फुसांचा कर्करोग, श्वसनाचे विकार होतात. व्यसनांमुळे भूक मंदावणे, अल्सर, उलट्या होणे, अन्नाबद्दलचा तिरस्कार वाढण्याच्या समस्या उद्भवतात. स्त्रियांमध्ये व पुरुषांमध्ये बीजधारणा व प्रजोत्पादन क्षमतेत परिणाम होतो, तसेच अपत्यामध्ये जनुकीय बिघाड होऊ शकतात. मूत्रपिंडाचे कार्य खालावते, तसेच प्रतिकारशक्तीचे कार्य खालावते व परिणामी कोणतेही आजारपण येऊ शकते. मोबाईल तसेच सोशल मीडियाच्या या अतिवापरामुळे उदासीनता, चिडचिडेपणा, निद्रानाश, एकटेपणा तसेच नातेसंबंधात दुरावा वाढण्याची अनेक उदाहरणे समोर येत आहेत. सामाजिक व कौटुंबिक कलह वाढतात. गुन्हेगारी, चोरी, हिंसाचार यामध्ये वाढ होऊ शकते. नोकरीच्या ठिकाणी बेपर्वा वर्तन वाढते.

काही व्यसन निर्माण करणारे ड्रग्ज ही इंजेक्शनद्वारे घेतली जातात. एकाच इंजेक्शनने अनेकांनी ही ड्रग्ज घेतल्यामुळे एड्स सारख्या गंभीर आजारांना ते बळी पडू शकतात. अशा विविध प्रकारच्या विघातक व्यसनांपासून मुक्ती मिळवायची असल्यास स्वतःच्या मनावर ताबा असणे खूप गरजेचे आहे. व्यसने ही सहजासहजी सुटत नाहीत. अचानक व्यसन सोडण्याचा प्रयत्न जर होत असेल तर त्या व्यक्तीच्या शरीरावर विपरित परिणाम होऊन विड्रॉवल सिम्पटम्स दिसून येतात. यासाठी व्यसनमुक्ती केंद्रांद्वारे समुपदेशनाची खूप मदत होते व व्यसनाधीन व्यक्तींना मानसिक आधार मिळू शकतो. व्यसनाधीन व्यक्तीच्या पुनर्वसनासाठी आरोग्य विभागाच्या योजनांचा लाभ दिल्याने तो व्यसनांपासून परावृत्त होऊ शकतो.

**काही व्यसन निर्माण करणारे ड्रग्ज ही इंजेक्शनद्वारे घेतली जातात. एकाच इंजेक्शनने अनेकांनी ही ड्रग्ज घेतल्यामुळे एड्स सारख्या गंभीर आजारांना ते बळी पडू शकतात. अशा विविध प्रकारच्या विघातक व्यसनांपासून मुक्ती मिळवायची असल्यास स्वतःच्या मनावर ताबा असणे खूप गरजेचे आहे. व्यसने ही सहजासहजी सुटत नाहीत. अचानक व्यसन सोडण्याचा प्रयत्न होत असेल तर त्या व्यक्तीच्या शरीरावर विपरित परिणाम होऊन विड्रॉवल सिम्पटम्स दिसून येतात.**

शाळा तसेच महाविद्यालयांमध्ये व्यसनमुक्तीच्या संदर्भात जागरूकता राबविणाऱ्या कार्यक्रमांचे आयोजन करणे गरजेचे आहे. कायदेशीर बाबींची अंमलबजावणी केली, तर व्यसनवृद्धीचे प्रमाण कमी होऊ शकते. अमली पदार्थ विरोधी कठोर अंमलबजावणी करण्याची गरज आहे. व्यसनमुक्त झालेल्या व्यक्तींना रोजगाराची सोय उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. तरुणाईची ऊर्जा ही खेळ, सांस्कृतिक कार्यक्रम, नेतृत्व विकास कार्यक्रमाच्या माध्यमातून योग्य दिशेने वळवली तर हा समाज व्यसनमुक्त होण्यास नक्कीच मदत होईल. ■

लेख

# एकाकीपणाची महामारी !




स्मिता जिंतुरकर
मुंबई




माणूस समाजप्रिय प्राणी आहे. त्याला आपल्या सभोवती माणसे हवी असतात. आनंद साजरा करायला जसे आप्तस्वकीय लागतात तसेच दुःखात देखील! मरणानंतर असो वा डोके ठेवून रडायला मनुष्यास खांदा हवाच. गेल्या काही दशकांपासून मात्र समाजाचे चित्र पार बदलले आहे. सामाजिक, सांस्कृतिक अभिसरण झाले आहे. एकत्र कुटुंब इतिहासजमा झाली आहेत. विभक्त कुटुंबही विभागली जात आहेत. पोटापाण्यासाठी शहरात स्थलांतर केल्याने गावे दूर राहिली. 'अखेरचा हा तुला दंडवत, सोडून जाते गाव' या गाण्यातली आर्तता गाव सोडून जातानाची नेमकी वेदना लताबाईंच्या गाण्यातून उमटली आहे. गाव सोडून स्थलांतर करणे, कधी गावेच्या गावे विस्थापित होणे, कधी मुले लांब जाणे, कधी मृत्यू, अपमृत्यू तर कधी स्वतःचेच नकारात्मक विचार, एक ना अनेक कारणांनी सर्व वयोगटातील व्यक्तींना एकाकीपण अनुभवावे लागते. माणूस समाजप्रिय असल्यामुळे त्याला एकटे राहाणे नकोसे होते, परंतु स्थल-कालपरत्वे नशिबी एकटेपणा आलाच तर त्याला

तोंड देण्याची मानसिकता हवीच! एकाकीपणाचे एपिडेमिक अथवा महामारी येण्याची परिस्थिती येणे हे समाज स्वास्थ्याच्या दृष्टिकोनातून विचार करायला लावणारे आहे.

भारतासारख्या उत्सवप्रिय देशाला एकाकीपणाच्या महामारीने ग्रासले आहे यावर विश्वास बसत नाही ना? पण वास्तव हेच आहे. Longitudinal Ageing Study in India (LASI) यांनी केलेल्या सर्वे क्षणातील आकडेवारीही सांगते, की २०% पेक्षा जास्त लोक एकाकी आहेत. एकाकीपणा हे नैराश्याचे (डिप्रेशन) कारण आहे. World Health Organization (WHO) यांच्या अहवालानुसार १०% तरुण व २५% वयस्कर लोक एकाकीपणाने पीडित आहेत.

सध्या अमेरिकेतील आरोग्य विभागाचे प्रमुख सर्जन जनरल डॉ. विवेक मुर्ती हे भारतीय वंशाचे आहेत. त्यांनी Our epidemic of loneliness and isolation २०२३ ही अमेरिकन नागरिकांसाठी advisory प्रसिद्ध केली. त्यामध्ये डॉ. मुर्ती म्हणतात, ''एकाकीपण किंवा एकटेपणाची जणू महामारी आलीये, प्रत्येक दोन व्यक्तींमागे एकाला या एकाकीपणाच्या समस्येने ग्रासले आहे. दररोज १५ सिगरेटी पिण्याने जे नुकसान संभवते तेवढेच किंबहुना जास्तच नुकसान एकाकी आयुष्य जगण्याने होते.'' या वक्तव्यावरून एकाकीपणाच्या समस्येची तीव्रता लक्षात येईल. सोशल मीडियाच्या अतिवापरामुळे तरूणाई एकाकी पडत चालली आहे, याकडे देखील डॉ. मुर्ती लक्ष वेधतात.

सातत्याने भेडसावणाऱ्या एकाकीपणामुळे ज्येष्ठ नागरिकाची आत्महत्या, तरुणाने एकाकीपणाला कंटाळून जीव दिला अशा बातम्या कधीतरी येतात. एका तरुणाने जीवन संपवण्यापूर्वी एक अतिशय हृदयद्रावक व्हिडिओ बनवला. त्यात हल्लीचा पुरुष किती एकाकी पडलाय ते सांगत असून पुरुषांनादेखील समजून घ्या, अशी विनवणी तो समाजाला करतो. एकाकीपण

> माणूस समाजप्रिय असल्यामुळे त्याला एकटे राहाणे नकोसे होते, पण स्थल-कालपरत्वे नशिबी एकटेपणा आलाच तर त्याला तोंड देण्याची मानसिकता हवीच! हे स्वास्थ्याच्या दृष्टिकोनातून विचार करायला लावणारे आहे.

किंवा एकटेपणा अचानक ठळकपणे अधोरेखित होताना दिसत आहे.

अमेरिकेतील हार्वर्ड विद्यापीठात एक प्रयोग केला गेला. त्यामध्ये तुम्हाला १५ मिनिटांकरिता एका खोलीत एकटे ठेवले जाईल जर तुम्हाला एकटे न राहाता बाहेर यायचे असेल, तर तुम्हाला विजेचे सौम्य झटके (शॉक) देण्यात येतील. लोकांनी एकटे राहाण्यापेक्षा विजेचे झटके खाऊन बाहेर येणे पत्करले. परंतु केवळ १५ मिनिटांचे एकटेपण नाकारले. लोकांना स्वत:बरोबर एकटे राहाणे म्हणजे शिक्षा वाटते.

## कशामुळे येते एकाकीपण-

**१. तणावपूर्ण नातेसंबंध-** नवरा बायको मध्ये विसंवाद व टोकाचे वाद झाले, तर प्रचंड एकाकी वाटते, मित्र मैत्रिणींच्या गराड्यात काही काळ घालवला तरीदेखील सरतेशेवटी रितेपणातून एकटेपण येते. अनेक कारणांनी मुलांचे आई वडिलांशी न पटणे.

**२. जवळच्या व्यक्तीचा मृत्यू -** मृत्यू इतके अटळ सत्य दुसरे नाही तरीही मृत्युला मन घाबरते. जवळची व्यक्ती सोडून गेल्यावर काही लोक एकाकीपणाच्या पिंजऱ्यात फार काळ बंदिस्त राहतात.

**३. स्थलांतरित व्यक्ती-** कामानिमित्त घर-दार-गाव सोडून दूरच्या शहरात वा परदेशात जातात. या व्यक्ती एकट्या असतात, परंतु सर्वच एकेकटे लोक एकाकी असतातच असे नाही.

**४. लोकांच्या गराड्यात असूनही एकाकीपणाचा अनुभव-** आजूबाजूला लोक आहेत, परंतु त्यांच्याशी भावनिक बंध निर्माण होऊ शकत नाहीत. कोणी समजून घेत नाही अशी भावना निर्माण होते. नातेसंबंधांत तणाव निर्माण होतो.

**५. मुलं दूरदेशी/ दुसऱ्या शहरांत-** या गोष्टी झाल्याने अनेक वृद्ध आई वडिलांना एकाकीपण येते. त्यातही जी मुले पालकांशी भावनिक गुंतलेली असतात त्यांना जास्त

एकाकीपण सतावते.

**६. सोशल मीडियाच्या अतिवापरा**मुळे आपल्यासोबत असलेल्यांपासून दुरावा तर निर्माण होतोच शिवाय एकाकीपणाचा धोकादेखील वाढतो.

**७. सोशल मीडियावर सतत स्क्रोल करणे**, लाईक्स बघणे, सतत आभासी दुनियेचा आधार वास्तविक समस्यांकरिता घेतला जातो. हल्लीच्या तरूणाईला सततच्या सोशल मीडियाच्या वापराने आभासी जग जवळचे वाटू लागते. खरे भावनिक नातेसंबंध व खोटा मुखवटा घेतलेले लोक यांच्यात फरक कळत नाही. सतत तुलना करणे, आपल्या पोस्ट कोणी पाहिल्या का, किती लाईक्स येतात, कोणाच्या पोस्टवर कोणी काय प्रतिक्रिया दिली यातच गुंतून राहतात.

## एकाकीपणाचे घातक परिणाम-

एकाकीपणामुळे अनेक शारीरिक व मानसिक व्याधी घर करू शकतात. त्यांना खतपाणी मिळून छोटा आजार देखील उग्र रूप धारण करतो. उच्च रक्तदाब, हृदय विकार, अर्धांगवायू, मधूमेह यांसारखे आजार मोठ्या प्रमाणात उद्भवतात. अमेरिकेत केलेल्या अभ्यासांती असेही आढळून आले आहे, की ज्या लोक-समूहात सामाजिक सलोखा जास्त त्यांच्यामध्ये कमी प्रमाणात हृदय  विकार वा उच्च रक्तदाब किंवा मधूमेह आढळून आला.



एकाकीपणामुळे आपल्या रोग प्रतिकारशक्तीवर विपरीत परिणाम होतो. कुटुंबासोबत किंवा जीवाभावाच्या व्यक्तींसोबत राहणारे कुठल्याही संसर्गाने कमी आजारी पडतात. एकाकीपणामुळे औदासिन्य (anxiety), चिंता (depression), अल्झायमर, डिमेन्शिया व आत्महत्येचे विचार बळावतात व अति टोकाच्या एकाकीपणात आत्महत्या केल्या जातात.

## एकाकीपण (loneliness) की एकांत (solitude) तुम्हीच ठरवा -

एकाकीपणामध्ये अंतर्मनाचा दरवाजा बंद केलेला असतो. स्वत:चा स्वत:शी सुसंवाद घडत नाही. अनेक नकारात्मक विचार मनात घर करून राहतात. मला कोणी समजू शकत नाही. मी सगळ्यांसाठी एवढे करतो त्याची कोणाला किंमत नाही इत्यादी.. त्यामुळे आजूबाजूला लोक असले, तरी तो आतल्याआत स्वत:ला एकाकी समजू लागतो. सर्वांपासून अलिप्त होऊ लागतो. एकाकीपणा मनुष्यास खायला उठतो. त्यांच्या आजूबाजूला कोणीच नसते असेही नाही, पण त्या व्यक्तीला त्यांच्यात रस वाटत नाही किंवा भावबंध नसतात. त्याविरुद्ध एकांतवासातील व्यक्तीचा अंतर्मनाचा दरवाजा उघडा असतो. एकटेपण वाट्याला आलेच तर तो ती इष्टापत्ती समजून मिळालेल्या वेळेचा सदुपयोग करून घेतो. छंद जोपासेल, स्वतःची प्रगती साधेल अशी कामे हाती घेईल. मुख्य म्हणजे सकारात्मक आयुष्य जगेल. ही सकारात्मकता येण्याकरिता 'हे ही क्षण जातील' हा विश्वास असावा लागतो. एकांतात राहणाऱ्या माणसाला आजूबाजूला कोणी असायची गरज नसते, तो स्वत: परिपूर्ण असतो. मुख्य म्हणजे त्याला स्वत:ची कंपनी हवीशी वाटते. एकाकी मनुष्य एकटा राहू शकत

नाही. जेव्हा एकटेपण त्याच्यावर येते तेव्हा तो विचलित होतो. त्याच्यावर एकटेपण लादले गेल्यामुळे स्वत:च्या कंपनीला घाबरतो. त्यामुळे सतत सोशल मीडियाचा आधार किंवा कोणाला तरी फोन करत राहणे असे करून एकटेपणापासून दूर जायचा प्रयत्न करतो.

कधी काळी एकाकीपणाचे विचार येणे स्वाभाविक आहे, परंतु त्यांना आपल्या मनात घरटे करून राहू द्यायचे की नाही हे पूर्णपणे आपण ठरवू शकतो. आपण एकटे नसून या समाजाचा एक हिस्सा आहोत, आपण समाजासाठी काही केले तर उद्या समाज आपल्या मदतीला येईल. आपण आपल्या कुटुंबीयांशी व पर्यायाने समाजाशी जोडलेलो आहोत. जे लोक सामाजिक भान ठेवून राहतात. सामाजिक उपक्रमांशी जोडलेले असतात ते एकाकीपणाला लांब ठेवतात. स्वत:पुरता विचार बाजूला ठेवला तर समाजाकरिता कितीतरी चांगल्या गोष्टी करता येऊ शकतात. आज एकटा असलेला पण उद्या त्यांच्या मागे काफिला येईल! सोबत कोणीही आले नाही तरी तू एकटा तुझी वाट चाल– तोबे एकोला चलो रे या गीतातून– असा संदेश रवींद्रनाथ टागोरांनी देऊन ठेवला आहे.

### या एकाकीपणाला मनाच्या उंबऱ्याबाहेर ठेवा–

१. स्वत:च्या कंपनीचा आनंद घ्या, अनेक गोष्टी एकट्याने करण्यासारख्या आहेत त्या करून पाहा.

२. जिवाभावाचे मित्र/मैत्रिणी आप्त यांच्याशी मोकळेपणाने संवाद साधा. आडपडदा न ठेवता बोलता येतील असे कोणीतरी नक्की असावे

३. नवनवीन लोकांशी मैत्री करा. कधीही मागील पानावरून पुढे जाणे चांगले. आयुष्याची पाने उलटवत राहता आली पाहिजे.

४. सहकारी असोत, भावंड असोत वा मित्र कोणाशीही तुलना करणे अयोग्य आहे. प्रत्येकजण वेगळा आहे हे मान्य करा. सोशल मीडियावर तर सतत शेकडो लोकांबरोबर तुलना केली जाते असे दिसून येते.

५. स्वत:चा स्वीकार करा, स्वत:वर प्रेम करा व स्वत:शीच स्वतःची तुलना करा. स्वतःची नवी आवृत्ती बघण्याइतके सुख कशात नाही.

६. निसर्ग भ्रमंती, आवडीचे नाटक, चित्रपट पाहाणे, विविध क्लबला भेटी, वाचनालये, आवर्जून वेळ काढून छंद जोपासणे असे अनेक विरंगुळ्याचे क्षण अनुभवता येतील

७. योगा, प्राणायाम, ध्यान केल्यास एकाकीपणातून एकांतवासाकडे सकारात्मक प्रवास होईल.

आज अमेरिकेत एकाकीपणाच्या महामारीला थोपवण्यासाठी अनेक सामाजिक उपक्रम सरकार तर्फे हाती घेतले जात आहेत. लोकांनी हिरिरीने भाग घेण्याकरिता त्यांना उद्युक्त केले जात आहे. एकाकीपणाच्या महामारीने भारतात पण शिरकाव केला असून तिने आपली पाळेमुळे रोवण्यापूर्वीच तिचे उच्चाटन करायला हवे. भारतीय तर उत्सवप्रिय आहेतच. आपले सणवार हे अतिशय सकारात्मक वातावरण निर्माण करतात. एकाकीपण वाटले तर जिथे असाल तिथून सण साजरे करावेत, सर्व वयाचे लोक एका प्लॅटफॉर्मवर क्वचितच एकत्र येत असतील परंतु सणाच्या निमित्ताने सगळे भेटतील. असलेले नाते संबंध टिकविणे किंवा नवीन नाती निर्माण करणे सहज शक्य होते. आता येऊ घातलेले गौरी–गणपती, नवरात्री एकापाठोपाठ एक वातावरणात जल्लोष निर्माण करतील. दिवाळी तर मनामनांतील अंधःकार मिटवून प्रकाशाकडे नेणारा सण, एकाकीपणा घालवून अंतरीचा दिवा उजळवणारा एकांताकडे घेऊन जाणारा सण!

आपली मरगळ आपणच झटकून उभे राहावे लागते. नाहीतर साईडिंगला टाकलेल्या ट्रेन सारखे होते. बाकीच्या पुढे जाताना नुसतेच बघत बसावे लागते. एकोणीसाव्या शतकातील अमेरिकेतील कवयित्री एला व्हीलर विलकॉक्स या Solitude (सॉलिट्युड / एकांत) या कवितेत म्हणतात, ''हसाल तर जग तुमच्या बरोबर हसेल; रडाल तर एकटेच रडावे लागेल; गाणी म्हणाल तर डोंगरदेखील प्रतिसाद देतील; उसासे मात्र हवेत विरतील.'' ■

## कथा




प्रा. शरद मनसुख
जुन्नर


# भावना

**अनेकदा भावना दुखावणे या वाक्यप्रयोगाचा आपण वापर करतो. पण हे वाक्य ऐकल्यावर साजन या कॉलेजकुमाराला मात्र प्रचंड त्रास होत असे. वरवर रोजच्या वापरातला असणारा, निरुपद्रवी असा हा वाक्प्रचार. मग साजनला एवढा राग यायचे नक्की काय कारण होते?**



साजन हा एक हरहुन्नरी कॉलेज तरुण. गावात कोणाला कसलीपण मदत लागली किंवा एखादी अडचण निर्माण झाली, की सर्वात अगोदर साजन हजर. सामान्य लोकांचे, विशेषत: गरिबांचे, प्रश्न किंवा समस्या सोडवायला कायम तत्पर असणारा युवक. दोन तीन वर्षांपूर्वी त्याच्या वडिलांचे अचानक निधन झाल्याने त्याच्या खांद्यावर घराची संपूर्ण जबाबदारी पडली होती. साजनला त्याच्या दोन मामांची मोठी भक्कम साथ होती. मोठा सूर्यकांत मामा तर बारका चंद्रकांत मामा. अर्थात चंदूमामाचा

आपल्या लाडक्या भाच्यावर– साजनवर– लई जीव होता. विशेष म्हणजे आपल्या भाच्याचे नामकरण साजन हे त्यांनीच केले होते. त्याचे झाले असे, तरुणपणी चंदूमामा हा जवळजवळ संजय दत्तसारखा दिसायचा. अन त्यावेळी माधूरी दीक्षित व संजय दत्त यांची जोडी खूपच फेमस होती. त्याच टाईमाला ‘साजन’ पिक्चर सुपरहिट झाल्याने चंदूमामाला त्या सिनेमातले ‘देखा है पहली बार साजन के आँखो में प्यार’ हे गाणे खूप आवडायचे. आणि त्याच थिएटरात चंदूमामाने रेखा को देखा पहली बार आणि मग काय? रेखाबरोबर पहिल्या दोनतीन भेटी झाल्या आणि थेट लग्नाची मागणी घातली व दोघांचेही मोठ्या थाटामाटात लग्न झाले. म्हणूनच चंदूमामाला साजन नाव लय मनापासून आवडत असे. पुढे आपल्या मोठ्या बहिणीला मुलगा झाल्यावर त्यानी सर्वांचा विरोध डावलून आपल्या भाच्याचे नाव आवडीने ‘साजन’ हेच ठेवले. भाच्यानेपण कधीच आपल्या चंदूमामाचा शब्द खाली पडू दिला नाही. मोठा सूर्यकांत मामा हा थोडा कडक स्वभावाचा. त्याला एकुलती एक मुलगी होती. आणि आपल्या लाडक्या लेकीला मोठे टोलेजंग स्थळ मिळावे यासाठी सुर्यामामाची कायम खूप धडपड चालू असायची. दुसरीकडे चंदूमामाची पण मनोमन इच्छा होती की, आपल्या मोठ्या भावाची लेक आपल्या होतकरू भाच्याला– साजनलाच– द्यावी.

मात्र सुर्यामामाचा व पुष्पामामीचा साजनला विरोध होता. कारण तो कॉलेजात शेवटच्या वर्गात शिक्षण घेत असल्याने त्याला कधी नोकरी लागणार? तो कधी व्यवसाय करणार? म्हणून सुर्यामामा आपल्या मुलीच्या लग्नाकरिता नवरदेव म्हणून

**रेखाबरोबर पहिल्या दोनतीन भेटी झाल्या आणि थेट लग्नाची मागणी घातली व दोघांचेही मोठ्या थाटामाटात लग्न झाले. म्हणूनच चंदूमामाला साजन नाव लय मनापासून आवडत असे. पुढे आपल्या मोठ्या बहिणीला मुलगा झाल्यावर त्यानी सर्वांचा विरोध डावलून आपल्या भाच्याचे नाव आवडीने ‘साजन’ हेच ठेवले. भाच्यानेपण कधीच आपल्या चंदूमामाचा शब्द खाली पडू दिला नाही.**



भाच्याऐवजी एखाद्या चांगल्या तरुणाच्या शोधात होते. त्यापैकी एका मोठ्या पार्टीशी सोयरिकीविषयी त्यांचे बोलणे अंतिम टप्प्यात आले होते. ते लग्न जणू काही जमल्यातच जमा होते. त्यामुळे आपल्या हक्काची मामाची पोर आपल्याला मिळत नसल्याने साजन हा खूप बेचैन झाला होता अन मोठ्या मामावर लई नाराज पण होता. दुसऱ्या दिवशी त्याचा कॉलेजचा मित्र बबन हा साजनला नेण्यासाठी घरी आला. साजनने पण मोटरसायकलवर टांग मारली आणि ते दोघे थेट कॉलेजात पोहोचले. पहिले दोन तास झाले होते. तिसरा तास सुरू होणार तो पण प्रा. बोंबले सरांचा. वर्गात एकदम भयानक शांतता होती. कारण सरांचा स्वभाव थोडा कडक तर होताच, पण तेवढेच ते भावनिकही होते. जर का सरांना लेक्चर चालू असताना कुणी डिस्टर्ब केले तर... त्या विद्यार्थ्याचा भर वर्गात सरांनी पाणउतारा केलाच म्हणून समजा. सरांना राग खूप लवकर यायचा आणि तेवढाच पटकन जायचाही. ते थोडे इमोशनल असल्याने शेवटी लेक्चर संपायच्या अगोदर पाच मिनिटे ते पुन्हा ज्याला झाप झाप झापलंय त्याला गोडीत घ्यायचे व मुलांनी वर्गात अशा चुका करू नयेत यासाठी त्यांच्या स्टाईलने फेमस डायलॉग मारायचे.

‘‘सॉरी , बरंका बाळा तुझ्या भावना दुखावल्या असतील तर... तुमच्या भावना दुखावण्याचा माझा मुळीच हेतू नव्हता’’

त्यामुळे सरांचा स्वभाव संपूर्ण कॉलेजला माहिती झाला होता. नेमके त्याच दिवशी चुकून साजन व त्याचा मित्र बोंबले सरांच्या लेक्चरला बसले. सरांचे लेक्चर सुरू झाले होते. सगळी मुले शांततेने लेक्चर

मन लावून ऐकत होती. तेवढ्यात साजनच्या मोबाईलची रिंगटोन वाजली 'देखा है पहली बार, साजन के आँखो में प्यार'

मग काय! कसला प्यार अन कसला यार!! सर ती रिंगटोन ऐकताच मोकार तापले आणि साजनला भर वर्गात मोठ्या आवाजात खडे बोल सुनावले. मग साजन आपली पडती बाजू सावरीत म्हणाला

''सर, सॉरी. माझ्याकडून मोबाईल नजरचुकीने सायलेंट वर करायचा राहून गेला.''

मात्र सर काही ऐकायला तयार नाही.

''अरे साजन, गाढवा, मोबाईल व्यवस्थित सांभाळता येत नसेल तर वापरता कशाला?''

सरांच्या लक्षात नाही आले की साजनचे आडनाव गाढवे आहे म्हणून. अखेर बराच वेळ वर्गात पूर्ण शांतता होती. सर एकटेच तावातावाने बोलत होते आणि सगळे विद्यार्थी निमूटपणे ऐकत बसले होते. थोड्या वेळाने सर पण शांत झाले. त्यांनी घड्याळाकडे पाहिले तर पाच मिनिटे बाकी होती लेक्चर संपायला. मग ते वातावरण थोडे हलके करत साजनकडे पाहत म्हणाले,

''बाळा , सॉरी बरंका तुझ्या भावना दुखावल्या असतील तर...''

हे ऐकताच साजनचेही डोके अचानक बिघडले आणि तो सरांना म्हणाला,

''सर , प्लीज तिचं नाव घेऊ नका.''

सर म्हणाले ''कोणाचं?''

साजन परत सरांकडे पाहत म्हणाला, ''त्या भावनाचं''

साजनचे उत्तर ऐकून सरांना

**सरांच्या लक्षात नाही आले की साजनचे आडनाव गाढवे आहे म्हणून. अखेर बराच वेळ वर्गात पूर्ण शांतता होती. सर एकटेच तावातावाने बोलत होते आणि सगळे विद्यार्थी निमूटपणे ऐकत बसले होते. थोड्या वेळाने सर पण शांत झाले. त्यांनी घड्याळाकडे पाहिले तर पाच मिनिटे बाकी होती लेक्चर संपायला.**



आश्चर्य वाटले.

सर पुन्हा साजनला म्हणाले, ''कोण भावना? कुठली भावना? मला काय कळत नाही तू काय म्हणतोस ते...''

शेवटी हा सगळा गोंधळ ऐकून वर्गातील सर्व पोरंपोरी मोठमोठ्याने एकमेकांकडे पाहत हसू लागली. कुणालाच काही समजेना. अखेर साजनचा जिगरी मित्र बबन उठला व सरांना म्हणाला,

''सर तुम्ही सारखं सारखं म्हणता ना, तुझ्या भावना दुखावल्या तर सॉरी... खरंच आज आमच्या साजनच्या भावना तुम्ही चक्क भर वर्गात ठेचल्या आहेत. कारण ती भावना दुसरी तिसरी कुणी नाही तर साजनच्या मामाची पोरगी. साजनला तिच्याबरोबर लग्न करायचं होतं. कालच त्या भावनाचं लग्न जमलंया. त्यामुळे हा गडी कालपासूनच टेन्शनमध्ये हाय.''

बबनचे सगळे गाऱ्हाणे ऐकल्यावर सर म्हणाले, ''बरं मग मी काय करू तुमच्या भावनाचं?''

बबन सरांकडे पाहत म्हणाला, ''अहो सर, आता तुम्ही तुमच्या भावना आवरा. नाहीतर साजनच्या भावनांचा मोठा बांध फुटेल. मग लई कठीण होईल.''

तेवढ्यात लेक्चर संपल्याची बेल झाली. सगळ्या वर्गात भावना कोण? कसली? हा जप सुरु झाला. मात्र शेवटपर्यंत कुणालाच साजनच्या भावना कळल्या नाहीत व बोंबले सरांनी परत कोणत्याच वर्गात चुकूनही 'तुझ्या भावना दुखावल्या का?' हे वाक्य उच्चारले नाही. ■

लेख



भारती सावंत
नवी मुंबई

# चला झिम्माड होऊ



*श्रावणमास आला सयांनो*
*चला मिळूनी नाचू गाऊ*
*फांद्यावरती झोके घेऊ*
*माहेराच्या गावी जाऊ*

खरोखर! श्रावण आला, की मन कसे प्रफुल्लित होते!! सकाळचा चहा पीत खिडकीजवळ उभे राहिले, की तिथेही श्रावणसरी थेंबांचे सिंचन करताना दिसतात. सकाळचा थंडगार वारा अंगावर शहारा फुलवतो नि मन प्रसन्न होऊन जाते. आपले मन बालकांसम छोटे होऊन भिंगोऱ्या खेळण्यासाठी प्रेरित होते. निसर्ग हिरवाईने फुललेला असतो. आपल्या सौंदर्याचे दान करताना सृष्टी हातचे राखत नाही. वसुंधरा हिरव्या रंगाचा मखमली गालिचा ओढून नवपरिणित वधूप्रमाणे

सजली आहे असे वाटते. झाडेवेली, वृक्ष, लतिका हिरव्या पानांनी चकाकलेल्या दिसतात. नवीनच पालवी फुटलेली रोपे पोपटाप्रमाणे भासतात. मधूनच कोकिळेची सुरेल तान आनंद द्विगुणीत करते. डोंगर, टेकड्या हिरवळीमुळे शोभायमान होतात. काळेनिळे ढग दाटल्यामुळे आभाळ जरी मेघाच्छादित भासत असले, तरी एक जोराची सर आली, की पुन्हा निरभ्र होते. लहान बालके पाऊस धारा अंगावर झेलत

***ये गं ये गं सरी***
***माझे मडके भरी***
***सर आली धावून***
***मडके गेले वाहून***

अशी गमतीदार गाणी म्हणत पावसाचा आनंद लुटत राहतात आणि आई ओरडली की घरात पळतात. काही द्वाड बालके मात्र

***सांग सांग भोलानाथ***

***पाऊस पडेल का***

***शाळेभोवती तळे साचून***

***सुट्टी मिळेल का?***

अशी पावसाला आळवणी करत राहतात. शाळेभोवती तळे साचले, की शाळेला सुट्टी मिळेल आणि आपणाला आईच्या हातची गरम गरम भजी खायला मिळतील अशी त्यांना आशा वाटत राहते. शाळा नाही की गृहपाठ नाही, अभ्यास नाही. पावसात खेळत राहायचे

**अरसिक मनालाही काव्यस्फूर्ती व्हावी असा हा श्रावण सर्वांनाच खूप आवडतो. चित्रकार, कवी, कवयित्री आणि छायाचित्रकार यांना तर श्रावणात या सौंदर्यसृष्टीच्या दृष्टीची मेजवानीच असते.**

आणि आनंद लुटत राहायचा एवढेच त्यांना माहीत असते.

काळ्या मेघांआड लपलेला भास्कर जणू आकाश निरभ्र होण्याची प्रतीक्षा करत असतो. निळ्या आकाशास सोनेरी किरणांनी चमकवत रूपेरी लकाकी चढवितो आणि ते टपोरी दवबिंदू हिऱ्याप्रमाणे चमकतात. किती मनोहारी दृश्य! आकाशातील इंद्रधनुची कमान इतकी मनमोहक भासते, की ते सप्तरंग आपल्या मन:पटलाला काबीज करतात. डोळ्यांचे पारणे फिटावे असा हा श्रावणातील निसर्ग सजीव सृष्टीसाठी जसे वरदानच आहे. बगळ्यांचा थवा घरट्याकडे परतण्यासाठी आकाशातून जात असताना कवीला काव्याच्या ओळी सुचतात आणि प्रेमी आपल्या प्रियतमेच्या भेटीच्या ओढीने तिच्या भेटीचे चित्र दृष्टीपटलावर आणून आळवत राहतो.

***बगळ्यांची माळ फुले अजूनी अंबरात***

***भेट आपली स्मरशी, काय तू मनात***

अशी ही पांढऱ्या पंखांची बलाकमाला आकाशात झेपावताना दिसणारे विहंगम दृश्य नयनरम्य वाटते. दूरवरच्या रानांमधून ‘म्याँव’चा टाहो फोडत मोर जेव्हा सप्तरंगी पिसारा फुलवत नृत्य करू लागतो, तेव्हा वाटते स्वर्गही याहूनी निराळा नसेल. खरोखर, विधात्याने निर्मिलेला हा निसर्ग श्रावणात निरखून पाहावा. आबालवृद्धांना घराबाहेर पडून अशी ही मनोहारी सौंदर्यदृष्टी पाहण्याचा मोह होणार नाही तरच नवल! दऱ्याखोऱ्यातून दुधाळ फेसाळणारे झरे नि उंचावरून पडणारा पाण्याचा लोट. त्या धबधब्याखाली चिंब होण्याचा मनमुराद आनंद तरुणाईच नव्हे तर लहानथोर सर्वच लुटत असतात. अहाहा! असे वाटते तिथून हलूच नये. अरसिक मनालाही काव्यस्फूर्ती व्हावी असा हा श्रावण सर्वांनाच खूप आवडतो. चित्रकार, कवी, कवयित्री आणि छायाचित्रकार यांना तर श्रावणात या सौंदर्यसृष्टीच्या दृष्टीची मेजवानीच असते. आनंदाने किलबिल करणारे पक्षी जणू हे सूचित करतात की ‘बेधुंद जगा आणि आम्हालाही जगू द्या.’

***नका ठेवू पिंजऱ्यात आम्हां***

***जगू द्या स्वैर स्वच्छंद जीवन***

***निसर्गच आमचा असे सखा***

***घरकुल आम्हां हेच रान वन***

पाऊसधारा कोसळू लागतात. इवली पाखरे आपल्या

इवल्याश्या डोळ्यांनी टुकूटुकू बघत पर्जन्यसरींचा आनंद घेतात. चिमणचारा आणायला गेलेले आपले आई वडील परतून येण्याची वाट पाहत घरट्यातल्या गवताच्या मऊसूत गादीवर किलबिल करत पिल्ले उड्या मारत राहतात. भिजून घरट्याकडे परतलेले खगगण आपले ओले पंख फडफडवत बाळांच्या चोचीला आनंदविभोर होऊन चारा भरवतात. मधूनच पाऊसधारा चोची झेलत आनंदाने चिवचिवतात.

पशुदेखील आनंदाने भावविभोर होताना दिसतात. चरण्यासाठी दूर गेलेल्या आपल्या जोडीदाराला ते साद घालतात. पर्जन्यधारांत भिजलेली पाडसे, मनमौजी हुंदडत असतात. सर्वांसाठी श्रावण म्हणजे आनंदाची पर्वणीच! कुणी खाण्याचा तर कुणी फिरण्याचा आनंद लुटत जीवनाचा आनंद व्यक्त करत असतो. रिमझिम सरींना अंगावर घेत पावसाची गाणी गात गोल गोल गिरक्या घेताना दिसतो. मुली वडाच्या झाडाला झोके बांधून उंच–उंच झुलत राहतात.

**श्रावणमास म्हणजे व्रतवैकल्ये आणि सणसोहळ्यांची पर्वणीच! नागपंचमी, बैलपोळा, रक्षाबंधन, नारळी पौर्णिमा, कृष्ण जन्माष्टमी अशा अनेक सणांची परंपरा सांगणारा हा मास गोडधोड आवडणाऱ्या खवय्यांसाठी चंगळच.**

श्रावणमास म्हणजे व्रतवैकल्ये आणि सणसोहळ्यांची पर्वणीच! नागपंचमी, बैलपोळा, रक्षाबंधन, नारळी पौर्णिमा, कृष्ण जन्माष्टमी अशा अनेक सणांची परंपरा सांगणारा हा मास गोडधोड आवडणाऱ्या खवय्यांसाठी चंगळच. विविध पक्वान्नांची रेलचेल असतेच. परंतु पावसात भिजून आल्यावर भजी, वडापाव आणि चहा पिण्याची मजा काही औरच! मक्याचे भाजलेले कणीस खात, श्रावणसरी अंगावर घेत, कुडकुडत फिरणारी प्रेमी युगुले पावसाची पुरेपूर अनुभूती घेताना दिसतात. नवविवाहितांसाठी श्रावणाचे वेगळेच कौतुक असते. लग्नानंतर पहिल्या सणाला माहेरी आलेल्या लेकी आपल्या सासरचे कौतुक मैत्रिणींना सांगत हितगुज करत राहतात. मैत्रिणीदेखील त्यांना पतीवरून चिडवत राहतात आणि ही नवविवाहिता लटक्या रागाने मैत्रिणींच्या चिडवण्यावरून रूसते आणि गाल फुगवून बसते. पण आतून मात्र तिला आनंदाच्या उकळ्या फुटत असतात.

अनेक ग्रंथांचे पठण करण्याचा



हा मास. देवपूजा नि व्रतांची सांगता करत हा महिना पवित्र मास म्हणून साजरा केला जातो. घरोघरी पूजा, धार्मिक कार्ये संपन्न होतात. श्रावणात सणांची रेलचेल असते. प्रत्येक सणाचे आपले असे एक वैशिष्ट्य असते आणि ते सण साजरे करत असताना घरात निरनिराळ्या पक्कान्नाचा घमघमाट सुटलेला असतो. नागपंचमीला काही सासुरवाशिणी मुरळी येऊन आपणाला माहेराला घेऊन जाईल म्हणून वाट पाहतात. माहेरी गेल्यावर रोज पंचमीची गाणी म्हणत फेर धरतात. तसेच फुगडी, झिम्मा आणि विविध खेळांना ऊत येतो. रक्षाबंधनाला बहिणी बंधुराजाच्या हाताला राखी बांधून संरक्षणाची जबाबदारी सोपवतात. भावाच्या आवडीचे पक्कान्न बनवून त्याच्याकडून घसघशीत ओवाळणी वसूल करण्याची मजा लुटतात. नारळी पौर्णिमा हा सण कोळी बांधवांसाठी जास्त महत्त्वाचा. त्यांचा चरितार्थ पूर्णतः सागरावर अवलंबून असल्याने नारळी पौर्णिमेला सागराला हळदीकुंकू नि नारळ वाहिला जातो. तेव्हा कोळी बांधव 'तुझ्या भरवशावर नाव सोडून वल्ही मारतोय दर्याराजा, आमचे रक्षण कर' असे सागराला आवाहन करतात. तेव्हापासून त्यांच्या मासेमारीचा प्रारंभ होतो.

***दह्यादुधाची लावू हंडी***

***आला मथुरेचा कान्हा***

**निसर्गसौंदर्याने नटलेला हा ऋतू सर्वांनाच वेड लावणारा आहे. वरुणराजाची कृपा झाल्याने जगाचा पोशिंदा, बळीराजा सुखावलेला असतो. पेरणी करून तरू चांगलेच फोफावल्याने तोही आपला आनंद साजरा करत असतो.**

***मारुनी खडा घड्यांवरी***

***खाऊ चोरून दही दूध लोणी***

असे म्हणत गोपिकांच्या संगती दही, दूध चोरून खाणारा माखनचोर कृष्ण आपल्याला आठवतो. गवळणी यशोदेकडे तिच्या लाडक्या कान्हाची तक्रार करायला आल्यानंतर यशोदा खोटे खोटे रागावत कान्हाला उखळाला बांधून ठेवते, परंतु आतून मात्र तिला प्रेमाचा पाझर फुटत असतो. कृष्ण जन्माष्टमी हा कृष्णाचा जन्मदिन! हा दिवस दहीहंडी बांधून मोठ्या जल्लोषात साजरा केला जातो. आयोजकांकडून उंच हंडी फोडण्यासाठी गोविंदा पथकावर बक्षिसांची खैरात केली जाते. वर्षभर गोविंदा मंडळे सराव करताना दिसतात. कित्येक सोसायट्यांमध्ये तरुण मुली मुले पावसात हंडी फोडण्याचा आनंद लुटतात. दहीहंडी फुटल्यानंतरचा आनंद अवर्णनीय असतो.

१५ ऑगस्टला भारताला स्वातंत्र्य मिळाले. त्यामुळे हा दिवस आनंदाने साजरा केला जातो. देशावर असणारे प्रेम व्यक्त करण्यासाठी दिवसभर देशभक्तीपर गाणी ऐकली, गायली जातात आणि स्वातंत्र्योत्सव साजरा केला जातो. स्वातंत्र्याचे महत्त्व प्रतिपादन केले जाते. सर्वजण शासकीय कार्यालयामध्ये, शाळा कॉलेजमध्ये तिरंग्याला अभिवादन करून देशभक्तीपर गीते आणि राष्ट्रगीत गाताना दिसत असतात. 'जन गण मन' हे राष्ट्रगीत प्रसारित होत राहते. काही ठिकाणी लतादीदींच्या सुमधुर स्वरातील गीत रेकॉर्डवर ऐकवले जाते. सर्व मुलांना आणि उपस्थितांना चॉकलेट्स वाटली जातात आणि या सुंदर अशा सोहळ्याची सांगता होते.

निसर्गसौंदर्याने नटलेला हा ऋतू सर्वांनाच वेड लावणारा आहे. वरुणराजाची कृपा झाल्याने जगाचा पोशिंदा, बळीराजा सुखावलेला असतो. पेरणी करून तरू चांगलेच फोफावल्याने तोही आपला आनंद साजरा करत असतो. मनातल्या मनात मालाला चांगला भाव येईल याचे गणित मांडत असतो. असा हा चराचराला आनंद देणारा, मनसोक्त जगायला शिकवणारा, तसेच दुनियेचे ज्ञान मिळवून देणारा, मनभावन ऋतू लहानथोर, स्त्रीपुरुष सर्वांचाच आवडता आहे. ■

# गगनभरारी



सुरेश वांदिले
मुंबई

**अवकाश संशोधन हे एक प्रतिष्ठेचे, समाधानकारक आणि तितकेच रंजक असे करिअर क्षेत्र. आज या क्षेत्रात भारतदेखील मोठी आघाडी घेऊ पाहात आहे. त्या दृष्टीने या क्षेत्रात आगामी काळात असंख्य करिअर संधी निर्माण होणार आहेत. त्यांचा परामर्श या लेखात घेण्यात आला आहे.**



भारतीय वायुदलातील कॅप्टन आणि इस्रो (इंडियन स्पेस ॲण्ड रीसर्च ऑर्गनायझेशन) संस्थेतील प्रशिक्षित अंतराळवीर शुभांशू शुक्ला, हे यंदाच्या २५ जून रोजी, ॲक्झिऑन–४ या मोहिमेअंतर्गत अंतराळ प्रयोगशाळेत प्रयोगासाठी गेले. ते, अंतराळात जाणारे गेल्या ४१ वर्षातील दुसरे भारतीय. याआधी विंग कमांडर राकेश शर्मा हे ३ एप्रिल १९८४ साली अंतराळात गेले होते.

ॲक्झिऑन–४ या मोहिमेच्या अंतर्गत, आंतरराष्ट्रीय अंतराळ प्रयोगशाळेत, इंडियन इंस्टिट्यूट ऑफ स्पेस सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी, या संस्थेने विकसित केलेल्या स्पेस बायोलॉजी लॅबच्या साहाय्याने जैविक प्रयोग केले जाणार आहेत. या संस्थेसाठी ही मोठी कामगिरी आहे.

**इंडियन इंस्टिट्यूट ऑफ स्पेस सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी या संस्थेत अंतराळ संशोधनाच्या संदर्भातील जागतिक दर्जाच्या संशोधनाच्या सोयी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.**

इंडियन इंस्टिट्यूट ऑफ स्पेस सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी ही संस्था भारत सरकारच्या डिपार्टमेंट ऑफ स्पेस अंतर्गत कार्यरत असणारी महत्त्वाची संस्था आहे. केरळ राज्यातील थिरुवनंतपुरमपासून २० किलोमीटर अंतरावर असलेल्या वालियामाला येथे स्थित या संस्थेत अंतराळशास्त्र आणि तंत्रज्ञानातील पदवी, पदव्युत्तर पदवी आणि संशोधनपर अभ्यासक्रम चालविले जातात. या संस्थेत अंतराळ संशोधनाच्या संदर्भातील जागतिक दर्जाच्या संशोधनाच्या सोयी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. या संस्थेला डीम्ड युनिव्हर्सिटीचा दर्जा देण्यात आला आहे.

### संस्थेचे अभ्यासक्रम

**(१)** बीटेक इन एरोस्पेस इंजिनीअरिंग,

**(२)** बीटेक इन इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड कम्युनिकेशन इंजिनीअरिंग (या दोन्ही शाखांमध्ये प्रत्येकी ७५ विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो.)

**(३)** ड्यूएल डिग्री (बीटेक ॲण्ड मास्टर ऑफ सायन्स/ मास्टर ऑफ टेक्नॉलॉजी). या शाखेत २४ विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो.

हा अभ्यासक्रम पाच वर्षे



**इंडियन इंस्टिट्यूट ऑफ स्पेस सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी, थिरुवनंतपुरम**

कालावधीचा आहे. हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यावर,

**(अ)** बीटेक इन इंजिनीअरिंग फिजिक्स आणि मास्टर ऑफ सायन्स इन ॲस्ट्रॉनॉमी ॲण्ड ॲस्ट्रोफिजिक्स किंवा अर्थ सिस्टीम सायन्स, किंवा

**(ब)** बीटेक इन इंजिनीअरिंग फिजिक्स आणि मास्टर ऑफ टेक्नॉलॉजी इन सॉलिड स्टेट फिजिक्स, किंवा

**(क)** ऑप्टिकल इंजिनीअरिंग ही पदवी प्रदान केली जाते.

सहावे सत्र संपल्यावर विद्यार्थ्यांना पदव्युत्तर पदवीचे विषय दिले जातात. यासाठी विद्यार्थ्यांचा पसंतीक्रम आणि सहा सत्रांपर्यंतची शैक्षणिक कामगिरी यांचा विचार केला जातो.

**(४)** यंदाच्या शैक्षणिक वर्षापासून बीटेक इन कॉम्प्युटर सायन्स ॲण्ड इंजिनीअरिंग (डाटा सायन्स) हा अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे. या अभ्यासक्रमाला ३६ विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो.

विद्यार्थी आणि अध्यापकांच्या शैक्षणिक आदानप्रदानासाठी अमेरिकेतील युनिव्हर्सिटीज स्पेस रीसर्च असोसिएशन आणि कॅलिफोर्निया इंस्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी यांसोबत सामंजस्य करार करण्यात आला आहे. या

**भारत सरकारच्या नव्या नियमानुसार आर्थिकदृष्ट्या कमजोर घटकांमधील विद्यार्थ्यांसाठी दोन्ही बीटेक अभ्यासक्रमासाठी ६ जागा राखीव ठेवण्यात आलेल्या आहेत. बीटेक- एमएस/ एमटेक साठी २ जागा राखीव ठेवण्यात आलेल्या आहेत.**

योजनेअंतर्गत काही विद्यार्थ्यांना अमेरिकेत त्यांचे प्रकल्प आणि इंटर्नशिप करण्याची संधी दिली जाते. या संस्थेतील बीटेक अभ्यासक्रमात प्रथम आलेल्या विद्यार्थ्याला कॅलिफोर्निया इंस्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी येथे ९ महिने कालावधीच्या उच्च श्रेणीच्या प्रशिक्षणासाठी प्रायोजित केले जाते.

## निवड प्रक्रिया

या अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी JEE-ADVANCED मधील गुण ग्राह्य धरले जातात. JEE-ADVANCED ही परीक्षा JEE-MAIN परीक्षेत उत्तीर्ण पहिल्या अडीच लाख विद्यार्थ्यांना देता येते. (JEE-MAIN ही परीक्षा इंडियन इंस्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी या संस्थेच्या प्रवेशासाठी घेतली जाणारी प्राथमिक परीक्षा आहे.)

ही प्रवेश प्रक्रिया संस्थेमार्फत राबवली जाते. त्यामुळे या अभ्यासक्रमांना प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना स्वतंत्रपणे अर्ज करावा लागतो. अर्ज केलेल्या उमेदवारांची, जेईई ॲडव्हान्स्ड परीक्षेत मिळालेल्या गुणांनुसार, संवर्गनिहाय गुणवत्ता यादी तयार केली जाते व त्यानुसार प्रवेश दिले जातात.

## अर्हता

उमेदवारांना १२ वी परीक्षेत भौतिकशास्त्र, गणित आणि रसायनशास्त्रात ७५ टक्के गुण मिळणे आवश्यक आहे. अनुसूचित जाती, जमाती, व शारीरिकदृष्ट्या अपंग यांच्यासाठी ६५ टक्के गुण हवेत. उमेदवारांनी दहावी आणि बारावीची परीक्षा प्रथम प्रयत्नात उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

भारत सरकारच्या नियमानुसार, या संस्थेत २७ टक्के जागा नॉन– क्रिमी लेअर इतर मागास वर्ग, १३ टक्के जागा अनुसूचित जाती संवर्ग, ७.५ टक्के जागा अनुसूचित जमाती संवर्ग, आणि ३ टक्के जागा दिव्यांगांसाठी राखीव ठेवल्या जातात. भारत सरकारच्या नव्या नियमानुसार आर्थिकदृष्ट्या कमजोर घटकांमधील विद्यार्थ्यांसाठी दोन्ही बीटेक अभ्यासक्रमासाठी ६ जागा राखीव ठेवण्यात आलेल्या आहेत. बीटेक– एमएस/ एमटेक साठी २ जागा राखीव ठेवण्यात आलेल्या आहेत. दोन्ही बीटेकमध्ये महिलांसाठी अतिरिक्त ५ आणि बीटेक– एमएस/ एमटेक साठी

अतिरिक्त ३ जागा राखीव ठेवण्यात आलेल्या आहेत.

### (५) एरोस्पेस

या ज्ञानशाखेला प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना प्रामुख्याने अग्निबाणवाहक, अंतरिक्ष यान, विमाने यांचे डिझाईन आणि विकास यांविषयीचे मूलभूत ज्ञान दिले जाते. या ज्ञानशाखेचे विद्यार्थी हे एरोस्पेस इंजिनीअरिंग इंडस्ट्रीमधील प्रॉपल्शन सिस्टीम्स, एरोडायनॅमिक डिझाईन, स्ट्रक्चरल सिस्टीम्स, प्रिसीजन मॅन्युफॅक्चरिंग या क्षेत्रांमध्ये कार्य करण्यास सक्षम होतात.

### (६)ॲव्हिऑनिक्स

एरोस्पेस इलेक्ट्रॉनिक्सचा दर्जा आणि विश्वासार्हता उच्च दर्जाची असणे आवश्यक असते. एरोस्पेस यंत्रसामग्रीशी संबंधित सर्व आव्हाने स्वीकारण्याची क्षमता या अभ्यासक्रमाद्वारे तंत्रज्ञांमध्ये निर्माण केली जाते. या अभ्यासक्रमात कंट्रोल सिस्टीम्स, डिजिटल इलेक्ट्रॉनिक्स, कम्युनिकेशन, कॉम्प्युटर सिस्टीम्स यांचा ठळकपणे समावेश करण्यात येतो.

## करिअर संधी

(१) अंतराळ संशोधनाच्या क्षेत्रात कार्यरत होण्यासाठी विज्ञान आणि अभियांत्रिकी ज्ञानशाखेच्या उमेदवारांना संधी मिळू शकते. अभियांत्रिकीतील प्रत्येक ज्ञानशाखेचा संबंध अंतराळाशी येतो. मेकॅनिकल अभियंते हे

**एरोस्पेस इलेक्ट्रॉनिक्सचा दर्जा आणि विश्वासार्हता उच्च दर्जाची असणे आवश्यक असते. एरोस्पेस यंत्रसामग्रीशी संबंधित सर्व आव्हाने स्वीकारण्याची क्षमता ॲव्हिऑनिक्स या अभ्यासक्रमाद्वारे तंत्रज्ञांमध्ये निर्माण केली जाते.**

अवकाशयानांचे डिझाईन, बांधणी आणि निर्मितीमध्ये सहभागी होऊ शकतात. केमिकल अभियंते हे अवकाशयानांच्या इंधनप्रक्रियेत सहभागी होऊ शकतात. संगणक शास्त्रातील अभियंते माहिती विश्लेषणात सहभागी होतात. तथापि, एरोस्पेस अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान या विषयांतील तज्ज्ञांना अंतराळ संशोधनाच्या क्षेत्रात प्राधान्याने संधी मिळू शकते.

(२) एव्हिऑनिक्स शाखेतील अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना पुढील महत्त्वाच्या संस्थांमध्ये संधी मिळू शकते.

विक्रम साराभाई स्पेस सेंटर–त्रिवेंद्रम,

इस्त्रो सॅटेलाइट सेंटर– बेंगळुरु,

स्पेस ॲप्लिकेशन सेंटर–अहमदाबाद,

मास्टर कंट्रोल फॅसिलिटी – हसन,

नॅशनल रिमोट सेन्सिंग सेंटर – हैदराबाद,

इस्त्रो सॅटेलाइट ट्रॅकिंग सेंटर – हैदराबाद,

भारत इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेड,

हिंदुस्थान एरोनॉटिक्स लिमिटेड,

इलेक्ट्रॉनिक्स सिस्टीम्सचे विकास आणि डिझाईन करणारे विविध उद्योग,

कॉम्प्युटर नेटवर्क आणि सॉफ्टवेअर सिस्टीम्सचा विकास करणारे उद्योग.

(३) एरोस्पेस इंजिनीअरिंग – या विद्यार्थ्यांना इंडियन स्पेस रीसर्च ऑर्गनायझेशनमध्ये महत्त्वाच्या आणि प्रगत प्रकल्पांवर प्रत्यक्ष काम करण्याची संधी मिळू शकते. हा अभ्यासक्रम केलेल्या विद्यार्थ्यांना,

विक्रम साराभाई स्पेस सेंटर –त्रिवेंद्रम,

इस्त्रो सॅटेलाइट सेंटर–बेंगळुरु,

स्पेस ॲप्लिकेशन सेंटर–अहमदाबाद,

सतीश धवन स्पेस सेंटर,

लिक्विड प्रॉपल्शन सिस्टीम्स सेंटर– बेंगळुरू, त्रिवेंद्रम आणि महेंद्रगिरी,

इस्त्रो सॅटेलाइट ट्रॅकिंग सेंटर – बेंगळुरु,

नॅशनल एरोस्पेस लॅबोरेटरीज,

हिंदुस्थान एरोनॉटिक्स लिमिटेड,

एरोस्पेस सिस्टीम्सची निर्मिती करणारे उद्योग,

मेकॅनिकल सिस्टीम्सचे डिझाईन आणि विकास करणारे उद्योग

या ठिकाणी वेगवेगळ्या संधी मिळू शकतात.

**(४)** इंडियन इंस्टिट्यूट ऑफ स्पेस सायन्स, इस्त्रो आणि केंद्र सरकारच्या डिपार्टमेंट ऑफ सायन्स मार्फत विद्यार्थ्यांना बीटेक मधील कामगिरीवर आधारित अर्थसाहाय्य करण्यात येत असल्याने इस्त्रो व डिपार्टमेंट ऑफ सायन्स या संस्थांना जागांच्या उपलब्धतेनुसार या विद्यार्थ्यांना सामावून घेण्याचा पहिला अधिकार असेल. सरासरी ग्रेड पॉईंट ॲव्हरेज ७.५ असल्यास विद्यार्थ्यांचा या संस्थेतील नोकरीसाठी विचार केला जाऊ शकतो. जागांची उपलब्धता लक्षात घेऊन मेरिट क्रमांकानुसार अशी नोकरी दिली जाते.

## ड्युएल डिग्री अभ्यासक्रम

पाच वर्षे कालावधीच्या अभ्यासक्रमात पहिल्या वर्षी विज्ञान आणि तंत्रज्ञानातील मूलभूत अभ्यासक्रम शिकवले जातात. दुसऱ्या आणि तिसऱ्या वर्षी भौतिकशास्त्र आणि अभियांत्रिकीचे पायाभूत विषय शिकवले जातात. चौथ्या वर्षी स्पेशलायझेशनचे विषय शिकवले जातात. पाचव्या वर्षी प्रकल्प संशोधनावर भर देण्यात येतो.

> **इंडियन इंस्टिट्यूट ऑफ स्पेस सायन्स, इस्त्रो आणि डिपार्टमेंट ऑफ सायन्स मार्फत विद्यार्थ्यांना बीटेक मधील कामगिरीवर आधारित अर्थसाहाय्य करण्यात येत असल्याने इस्त्रो व डिपार्टमेंट ऑफ सायन्स या संस्थांना जागांच्या उपलब्धतेनुसार या विद्यार्थ्यांना सामावून घेण्याचा पहिला अधिकार असेल.**

**(१)** ग्रह, तारे, अंतराळ, विश्व आणि आकाशगंगा यांच्या अनुषंगाने भौतिकशास्त्राचे महत्त्व यावर ॲस्ट्रॉनॉमी/ ॲस्ट्रोफिजिक्स या स्पेशलायझेशनमध्ये लक्ष केंद्रित केले जाते.

**(२)** अर्थ सिस्टीम सायन्समध्ये पृथ्वीच्या भौतिक, रासायनिक, जैविक प्रक्रियेची व्यामिश्र संकल्पना समजावून सांगितली जाते. पर्यावरण, जलावरण, भूगर्भ आणि जैवपर्यावरण यांच्या परस्परसंबंधाविषयीचा अभ्यास करावा लागतो.

**(३)** सॉलिड स्टेट फिजिक्स या स्पेशलायझेशनमध्ये सेमी-कंडक्टर उपकरणांच्या संशोधनात्मक अभ्यासावर भर देण्यात येतो. भौतिकशास्त्रातील उच्च दर्जाच्या संशोधनास प्रोत्साहन आाणि चालना देणारा हा अभ्यासक्रम आहे.

**(४)** ऑप्टिकल इंजिनीअरिंग या स्पेशलायझेशनमध्ये ऑप्टिक्स उद्योगातील भविष्यातीत तंत्रज्ञान विकासावर भर दिला जातो. ऑप्टो इलेक्ट्रॉनिक्स, लेन्स डिझाईन, ऑप्टिकल फॅब्रिकेशन यांसारख्या विषयांमध्ये विद्यार्थ्यांना प्रशिक्षित केले जाते.

## संपर्क

डीन(ॲकेडमिक्स)

इंडियन इंस्टिट्यूट ऑफ स्पेस सायन्स ॲण्ड टेक्नालॉजी, वालियामाला,

थिरुवनंतपुरम- ६९५५४७, दूरध्वनी-०४७१-२५६८४७७,

फॅक्स-२५६८४५५६,

संकेतस्थळ www.iist.ac.in,

ईमेल- admin@iist.ac.in mailto:admin@iist.ac.in> ■



विजय खेडकर
वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
गुन्हे शाखा,
लोहमार्ग मुंबई

## लोहमार्ग मुंबई पोलिसांची उल्लेखनीय कामगिरी:

# १२ तासांत मेल एक्सप्रेसमध्ये चोरी करणाऱ्या सराईत चोरास अटक



मेल एक्सप्रेस गाड्यांमधून झोपलेल्या महिला प्रवाशांच्या उशीखालील लेडीज पर्स उचलून चोरी करणाऱ्या रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगारास मुंबई लोहमार्ग पोलिसांनी १२ तासांच्या आत अटक केली आहे. यावेळी त्याच्याकडून ३४ लाख ९८ हजार १०० रुपये किमतीचे सोन्याचे दागिने हस्तगत करण्यात आले.

१९ जून २०२५ रोजी ०४ वाजून ३० मिनिटांची वेळ असणाऱ्या इंदौर – दौंड एक्सप्रेस गाडी नं २२९४४ च्या बोगी नं २ सीट नं. ४३, ४५ वरून वयस्कर फिर्यादी महिला प्रवासी झोपून प्रवास करत असताना २० जून २०२५ रोजी ०६:०० वाजता सदर गाडी कल्याण रेल्वे स्टेशन येथे आली. त्यावेळी सदर महिलेची उशीखाली ठेवलेली खाकी रंगाची पर्स अज्ञात चोरट्याने लबाडीने चोरली. त्या पर्समध्ये ३५ लाख ४५ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने, रोख

रकमेचा ऐवज होता. याबाबत कल्याण रेल्वे पोलीस ठाणे कलम ३०५(C) भारतीय न्याय संहिता २०२३ अन्वये गुन्हा दाखल झाला होता.

सदरचा गुन्हा दाखल झाल्यानंतर श्री. एम. राकेश कलासागर, पोलीस आयुक्त, लोहमार्ग मुंबई, श्री. मनोज पाटील, पोलीस उपायुक्त, मध्य परिमंडळ, श्री. राजेंद्र रानमाळे यांच्या आदेशान्वये गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय खेडकर व पोलीस निरीक्षक रोहित सावंत गुन्हे शाखा, लोहमार्ग, मुंबई यांच्या मार्गदर्शन व सूचनांप्रमाणे गुन्हे शाखा, लोहमार्ग मुंबई कल्याण युनिट क्र. ३ चे पोलीस अधिकारी व पथक यांनी कल्याण रेल्वे स्टेशन येथील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केली. त्यामध्ये रेल्वे पोलीस आयुक्तालय रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार महेश

बातमीदाराच्या मदतीने महेश घाग ऊर्फ विक्की याची माहिती घेतली असता तो चिपळूण येथे असल्याची खात्रीलायक माहिती प्राप्त झाली. त्या माहितीच्या आधारे गुन्हे शाखा, लोहमार्ग, मुंबई, कल्याण युनिट क्र. ३ चे पोलीस अधिकारी व पथक हे वरिष्ठांच्या परवानगीने तत्परतेने चिपळूण, जि. रत्नागिरी येथे रवाना झाले.

घाग ऊर्फ विक्की हा दिसून आला. बातमीदाराच्या मदतीने महेश घाग ऊर्फ विक्की याची माहिती घेतली असता तो चिपळूण येथे असल्याची खात्रीलायक माहिती प्राप्त झाली. त्या माहितीच्या आधारे गुन्हे शाखा, लोहमार्ग, मुंबई, कल्याण युनिट क्र. ३ चे पोलीस अधिकारी व पथक हे वरिष्ठांच्या परवानगीने तत्परतेने चिपळूण, जि. रत्नागिरी येथे रवाना झाले. त्यांनी आरोपी महेश घाग ऊर्फ विक्की यास ताब्यात घेऊन सखोल तपास केला. तपासाअंती त्यास पोलीस ठाण्यास आणून कल्याण रेल्वे पोलीस ठाणे गुन्हा नोंद क्र. ७८२/२०२५ कलम ३०५ (C) मध्ये २१ जून २०२५ रोजी अटक करून मा. न्यायालयातून त्याची पोलीस कोठडी रिमांड घेण्यात आली.

आरोपी महेश घाग ऊर्फ विक्की याच्याकडे पोलीस कोठडी रिमांड मुदतीत तपास करता त्याने सदरचा गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले. चोरलेल्या एकूण ऐवजापैकी ३४ लाख ९८ हजार १०० रुपये किमतीचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम दि. २२ जून २०२५ रोजी काढून दिली असून गुन्हा उघड करण्यात आला आहे. त्याचे वर्णन खालीलप्रमाणे:

| अ क्र. | पोलीस ठाणे व गुन्हा रजिस्ट्रेशन नंबर | हस्तगत मालमत्ता |
|---|---|---|
| १ | कल्याण रे.पो.ठाणे गु.र.न. ७८२/२०२५, कलम ३०५(C) BNS | १) १० लाख रुपये किमतीच्या हिऱ्याच्या बांगड्या. |
| | | २) १५ लाख रुपये किमतीची हिऱ्याची रिंग |
| | | ३) १ लाख २५ हजार रुपये किमतीचे सोन्याचे घड्याळ |
| | | ४) ४ लाख रुपये किमती मोत्याचा हार हिऱ्याचे पेडल |
| | | ५) ३ लाख रुपये किमतीच्या ३ सोन्याच्या चेन्स मोती असलेले |
| | | ६) १ लाख रुपये किमतीची एक सोन्याची रिंग त्यामध्ये हिरा असलेली |
| | | ८) ३१०० रुपये रोख रक्कम |
| | | ९) आधारकार्ड, पॅनकार्ड व इतर कागदपत्रे |
| | | **३४,९८,१००/ रू** |

सदरची कामगिरी श्री. एम. राकेश कलासागर, पोलीस आयुक्त, लोहमार्ग, मुंबई, श्री. मनोज पाटील, पोलीस उप आयुक्त, मध्य परिमंडळ, श्री. राजेंद्र रानमाळे, सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे शाखा, श्री. सुधाकर शिरसाठ, सहा. पोलीस आयुक्त कल्याण विभाग, यांचे मार्गदर्शन व सूचनांनुसार श्री. विजय खेडकर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक व पोलीस निरीक्षक श्री. रोहित सावंत, गुन्हे शाखा, लोहमार्ग, मुंबई, यांच्या नेतृत्वाखाली गुन्हे शाखा, कल्याण युनिट येथील पोलीस उपनिरीक्षक, सुधाकर सावंत, पोलीस अंमलदार संदीप गायकवाड, राम जाधव, स्मिता वसावे, लक्ष्मण वळकुंडे, प्रमोद दिघे, रविंद्र ठाकुर, हितेश नाईक, अक्षय चव्हाण, रूपेश निकम, सुनिल मागाडे, स्वप्नील नागरे, पद्यमा केंजळे, सहा. पोलीस निरीक्षक प्रमोद देशमुख, कल्याण रेल्वे पोलीस ठाणे, तांत्रिक शाखेचे सहा. पोलीस निरीक्षक मंगेश खाडे, सहा. पोलीस निरीक्षक देविदास अरण्ये, पोलीस अंमलदार विक्रम चावरेकर, संदेश कोंडाळकर, व अमोल अहिनवे यांनी केली आहे.

सदरची कामगिरी श्री. एम. राकेश कलासागर, पोलीस आयुक्त, लोहमार्ग, मुंबई, श्री. मनोज पाटील, पोलीस उप आयुक्त, मध्य परिमंडळ, श्री. राजेंद्र रानमाळे, सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे शाखा, श्री. सुधाकर शिरसाठ, सहा. पोलीस आयुक्त कल्याण विभाग, यांचे मार्गदर्शन व सूचनांनुसार करण्यात आली.

**(रेल्वे प्रवाशांना आपल्या किंमती मालमत्तेची काळजी घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे.)** ■

# कविता

## पुस्तकं वाचू, आयुष्य घडवू

**पुस्तकं असतात जादूचं दार, ज्ञानाचा खजिना, अमूल्य भार.**

**कधी गोष्टींचं जग उलगडतं, कधी नव्या स्वप्नांना बळ देतं.**
**पुस्तकं शिकवतात इतिहासाचा अर्थ, भूतकाळाचं गुपित, भविष्यासाठी गर्भ.**
**कथा, कविता, विज्ञान, आणि कला, प्रत्येक पानात नव्या विचारांची माळा.**

**मोबाईलपेक्षा वेगळी असते मजा, वाचनाने मिळते शांततेची सजा.**

**कल्पनाशक्तीला उंच भरारी, ज्ञानाचं आभाळ होतं विस्तारत सारी.**
**मुलांनो, वाचनाचा अंगीकार करा, पुस्तकांशी रोजचा संवाद साधा.**

**त्यांचं मैत्र तुम्हाला सावरतं, आयुष्य सुंदर, यशस्वी करतं.**
**तर हातात घ्या, पुस्तकांचा प्रकाश, त्यांनी उजळवा तुमचा जीवनप्रवास!**

**वाचनाने मिळेल नवी दिशा, ज्ञानाचा दीप होईल तुमच्या हृदयी नशा.**



प्रिन्स पाटील
कोल्हापूर

लेख




संजीव देवकर
पुणे


# रिमझिम गीरे सावन



श्रावणाचा मनमोहक महिना सुरू झाला, की सावन का महिना पवन करे सोर, जियरा रे झुमे ऐसे, जैसे बनमा नाचे मोर मिलन चित्रपटातील नूतनप्रमाणे आपलेही मन असे मोरासारखे नाचायला लागते. घन बरसताना केतकीच्या बनी मोर पिसारा फुलवत नाचू लागला, की मेघाला ही गहिवरून येते. मग अवचितच कवीच्या लेखणीतून शब्द उतरतात.. केतकीच्या बनी तिथे नाचला ग मोर, गहिवरला मेघ नभी सोडला गं धीर.

वाचक हो! खरे तर पाऊस आणि चित्रपट गाणी दोन्ही जणू हातात हात घालून मनसोक्त रिमझिम भटकंतीच करू लागतात. या लेखात आपण श्रावणातील पावसाच्या 'क्षणात येते सरसर शिरवे क्षणात फिरुनी उन पडे' अशा उघडझाप करणाऱ्या काही बहुरंगी, बहुढंगी फिल्मी छटा अनुभवूयात.

आषाढातील धो धो तर श्रावणातील मनमोहक रिमझिम ही दिल तो पागल हैं सिनेमातील माधुरी दिक्षित सारखी घोडे.



जैसी चाल, हाथी जैसी दुम, ओ सावन राजा कहाँ से आए तुम असा सवाल करत आपल्याही मनाला मोहून जाते. मग मनाला मोहित करणाऱ्या श्रावणात प्रेमीयुगलही जो हाल दिल का इधर वो रहा हैं, वो हाल दिल का उधर हो रहा हैं, जाने जा दिलों पे अजबसा असर हो रहा हैं (सरफरोश) अशी मनाची स्थिती सांगतात.

आषाढातील या धुमशान पावसानंतर झुमता सावन जेव्हा पवनचा शोर करत येतो ना तेव्हा मन गाऊ लागते आज मौसम बडा बेईमान हैं बडा, आज मौसम त्यात मग झुमता सावन देखो आया, बरखा ने प्यार बरसाया (दो खिलाडी) हे गीत सावन ऋतूची प्रकर्षाने आठवण करून देते. श्रावणी पाऊस श्रावणात घन निळा बरसला रिमझिम रेशीम धारा, उलगडला झाडांतून अवचित हिरवा मोरपिसारा असे सृष्टीचे रंग आणि गंध उधळीत मनात चैतन्य निर्माण करत बरसू लागतो. आया सावन झुम के गातच आकाशात ढग जमू लागतात. तोच दिवाना हुआ बादल सावन की घटा छायी, ये देख के दिल झुमाऽऽ ली प्यार ने अंगड़ाई (काश्मीर की कली) हे गीत मनात रूंजी घालू लागते.

रसिकांच्या हृदयात प्रवेश करणाऱ्या मंझिल चित्रपटातील रिमझिम गीरे सावन सुलग सुलग जाए मन या गाण्यातील श्रावणी पाऊस कोण बरे विसरले असेल.. हा आल्हाददायक पाऊस बघणाऱ्या लोकांसोबतच ते ऐकणाऱ्यांची मनोवृत्ती प्रसन्न करणारा आहे. मुंबईच्या रस्त्यावरून आणि समुद्र किनाऱ्यावरून खऱ्या-खऱ्या पावसात अमिताभ बच्चन व मौसमी चटर्जी हातात हात घालून मनसोक्त भिजत, ओलेचिंब होऊन फिरत, भ्रमंती करताना पाहून आपण ही सहजगत्या आठवणींच्या जगात भ्रमंती करून येतो.

धुमशान पाऊस आला, की दो बिघा जमीन सिनेमातील शेतकरी व गावकरी आनंदाने 'हरियाला सावन ढोल बजाता आया धिन तक मन में मोर नचाता आया' असे पावसाचे स्वागत करतात. ह्या पावसात भारतीय संस्कृतीचे दर्शन घडते. ह्याच ढोलाच्या तालावर तेच मेघ उमड घुमट कर आयी रे घटा म्हणत जोरात बरसू लागतात. हा पाऊस उत्सवी आहे. म्हणून सारे भारतीय दो आँखे बारह हाथ मधील जेलर व्ही. शांताराम आणि त्यांच्या सहकाऱ्यांसारखा उत्सव साजरा करू लागतात.

श्रावणातील पाऊस जेव्हा ढगांच्या गडगडाट आणि विजांच्या कडकडाटासह अवतरतो, तेव्हा बरसात की रात सारखा गरजत बरसत सावन आयो रे सारखी परिस्थिती निर्माण करतो. पाऊस आणि संगीत यांचा ऋणानुबंध युगायुगांचा..! सुगम संगीतील बहुतेक गाणी ही मल्हार ह्या वर्षा ऋतूशी संबंधित रागदारीत बांधली गेली आहेत. सतत बरसणारी संततधार असो की, बूँदों की टिप टिप बरसती फुहार, मेघांचा गडगडाट असो की, वीजेचा कडकडाट या प्रत्येकात संगीत ठासून भरलेले दिसते. रागदारी ते सुगम संगीतापर्यंत सगळ्या संगीत प्रकारांमध्ये हा पाऊस अगदी मनमुराद बरसत राहतो.

श्रावणाचा महिमा सांगणारे ऋतु हिरवा, ऋतु बरवा पाचूचा वनी रूजवा, युग विरही हृदयावर सरसरूतो मधू शिरवा हे आशाताईंचे एक सुंदर गीत नकळत ओठांवर तरंगते. रोटी




कपडा और मकान चित्रपटात हाय हाय हे मजबुरी ये मौसम और ये दुरी अशी तक्रार मांडताना झिनत आमन मनोजकुमारला आठवण करून देते की तेरी दो टकीयाकी नौकरी में मेरा लाखों का सावन जाये.

श्रावणात मन प्रेममय होऊन जाते. अगदी जैसे को तैसा सिनेमातील रिना रॉय जितेंद्रसारखे अब के सावन में जी डरे, रिमझिम तन पे पानी गिरे, मन में लगे आग सी. दुसरीकडे दहेक चित्रपटातील सावन बरसे, तरसे दिल, क्यु ना निकले घर से दिल आणि देवता सिनेमातील मैं तो कारी बदरवां से हारी, गरजे तो रात जगाये, बरसे तो आग लगाये या गीतांतील पावसाचे थेंब प्रेमाची भावना प्रभावी करतात.

पावसाची अनेक रूपे आहेत. कधी तो नायिका नंदासाठी घर आजा घिर आयी बदरा सांवरिया (छोटे नवाब) अशी अनामिक ओढ घेऊन येतो. तर कधी सावन के झुले पडे, तुम चले आओ (जुर्माना) अशी राखी सारखी प्रतिक्षा करायला लावतो. कधी तो अजहुं न आये बालमाँ, सावन बीता जाए (सांझ और सवेरा) अशी कैफियत मांडतो. तर कधी लगी आज सावन की फिर वो झडी हैं (चांदनी) अशी तुटलेल्या हृदयाची हकीकत सांगतो.

कधी तो मेघा छाये आधी रात बैरन बन गयी निंदिया, बता मैं क्या करू? (शर्मिली) असा सवाल करतो. तर कधी तो नाचे मन मोरा मगन तिक ता धिगी धिगी, बदरा घिर आये रूत हैं भिगी भिगी (मेरी सूरत तेरी आँखे) किंवा रिमझिम के गीत सावन गाये, हाये, भिगी भिगी रातों में (अंजाना) असा सुखावून जातो.

आ हा रिमझिम के वो प्यारे प्यारे गीत लिये (उसने कहा था) असा हा सावन कुणाला आल्हाददायक वाटतो. तर कुणासाठी तो शर्मिला टागोरसारखा अब के सजन सावन में आग लगी जी बदन में (चुपके चुपके) किंवा मीना कुमारीसारखा जा री जा री ओ कारी बदरीयां (आझाद) असे हृदयाचे मनोगत सांगणारा ठरतो.

अभिनेत्री रेखाला तर जाने कैसे बीतेगी ये बरसातें, माँगे हुए दिन हैं माँगी हुयी राते (बेसरा) ही खंत आहे. जेव्हा हा पाऊस दडी मारून बसतो तेव्हा मानवाकडून पावसाला आर्जव घालावी लागते. हा श्रावणी पाऊस अशा कित्येक गाण्याच्या माध्यमातून कधी प्रेमाचा वर्षाव करत राहतो. तर कधी विरहाच्या धारा बरसत राहतो. कधी आनंद साजरा करतो, तर कधी दु:ख मांडत राहतो. कधी अगदीच लुभावना असतो, तर कधी अत्यंत त्रासदायी ठरतो! म्हणूनच हिंदी सिनेमात पावसाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. असा हा श्रावणी पाऊस गीत, कविता आणि ग़ज़लच्या माध्यमातून रसिक मनाचे नेहमीच समाधान करत हृदयात गारवा पसरत आला आहे. ■



किर्तीकुमार औरंगाबादकर
नाशिक

## योग-योगाने जूळून आलेले एक अतुट

# अनमोल नाते

घटना आहे सन १९८४ ची. नाशिक मध्ये महाराष्ट्र पोलीस प्रबोधिनी येथे संचालक पदी असलेल्या आदरणीय दिवंगत अरविंद इनामदार त्या संस्थेत योगशिक्षक होते. दीक्षांत संचलनावेळी योगासन प्रत्यक्ष करता कार्यक्रम ठेवण्यासाठी आग्रह धरला. त्यांनी स्वतः कार्यक्रम पाहून मान्यता दिली. दीक्षांत संचालनाच्या पूर्वी दोन दिवस अगोदर मला आमचे कार्यक्रम रद्द करण्यात आले आहेत असे समजले. मी त्वरित साहेबांना भेटलो तर ते म्हणाले, 'प्रात्यक्षिके चित्तथरारक पाहिजेत. प्रेक्षक जागेवरून उठले पाहिजेत असं नाही' प्रगत आसने कॅडेटकडून करून घेणार पुरेसा अवधी मिळाला होता आणि साध्य झाले नाही पण साहेबांना विनंती पूर्वक आग्रहाने जिममध्ये नेऊन प्रगत आसने करून दाखवली. ते पाहून साहेब बेहद खुश झाले. कार्यक्रम ठेवण्यासाठी एका अटीवर त्यांनी परवानगी दिली. ती अट म्हणजे, मी कॅडेटच्या समोर प्रगत आसने करावी आणि कॅडेटने शिकवलेली आसने पाठीमागे करावी साहेबांनी स्पष्टपणे सांगितले, की तुम्हाला योग शिक्षक



म्हणून न संबोधता त्या ठिकाणी त्यांच्यामधील कॅडेटच समजू व आपण त्यासाठी डोक्यावरून केस कमी करणे.

मुख्य मैदानावरून टाळ्यांच्या कडकडाटात आमचा कार्यक्रम पार पडताच साहेब व्यासपीठावरून सरळ माझ्याकडे येऊन अभिनंदन करत म्हणाले, ''आता तुम्हाला मी शिक्षक म्हणतो.'' मला मिळालेली शाबासकी ही चेतना, उर्मी धडाडीची ती ज्योत अजय मी मनात तेवत ठेवलेली आहे.

प्रथमतः मी पोलीस प्रशासनाचे मनसे आभार मानतो. मी खात्याचा ऋणी आहे, कारण माझ्यासारख्या सामान्य माणसाचा स्वीकार कला प्रशिक्षण केंद्रात येणाऱ्या कर्मचारी, अंमलदार, अधिकारी यांची योगाद्वारे सेवा करण्याची बहुमोल संधी दिली व ते पुण्यकर्म अविरत चालू ठेवले गेले. मला येथेच पृथ्वीतलावर स्वर्ग मिळाला. त्याचे असे घडले, १९७५ मध्ये सुरुवातीला गोरे कमिशनच्या अहवालानुसार खात्यात योगा विषयाचा समावेश करण्यात आला. त्यावेळचे पोलीस प्रशिक्षण कॉलेजचे (PTC) प्राचार्य सिविंदर सहानी सरांनी माझे योग गुरु दिवंगत मणिलाल देसाई यांच्याशी चर्चा केली. त्यानुसार मला माझ्या योग गुरुने साहेबांना माझी योगशिक्षक म्हणून नेमणूक करण्याची विनंती केली आणि साहेबांनी ती स्वीकारली. तेव्हापासून खात्यात रुजू झालो कुठली लालसा, अपेक्षा न ठेवता

> मी पोलीस प्रशासनाचे मनसे आभार मानतो. मी खात्याचा ऋणी आहे. माझ्यासारख्या सामान्य माणसाचा स्वीकार कला प्रशिक्षण केंद्रात येणाऱ्या कर्मचारी, अंमलदार, अधिकारी यांची योगाद्वारे सेवा करण्याची बहुमोल संधी दिली.

वर्षानुवर्षे योगपाठ सकाळ संध्याकाळ घेत गेलो. खात्याविरहीत प्रबोधिनीत प्रशिक्षणास येणारे सरकारी कर्मचारी अधिकाऱ्यांची योगाद्वारे सेवा करण्याची संधी मिळाली. अनुभव घेता घेता जेव्हा कार्यकाकडून त्यांना मिळालेले शारीरिक मानसिक स्वास्थ्य आणि नोकरीमधील वाढीव कार्यक्षमता व समाधानी जीवन जगण्याची आनंददायी उर्मी त्यांच्याकडून ऐकल्याने एक नवीन उभारी मिळाली.

पोलीस कर्मचारी, अंमलदार, चालक, गुन्हा अन्वेषण विद्यालय मध्ये येणाऱ्या महिला, पुरुषांच्या तुकड्या, उजळणी वर्ग यांच्या संपर्कात जीवनाचा मनोमनी माझा अभ्यास झाला. सन १९८१ प्राचार्य मुश्रीफ ते २०१९ प्राचार्य गीता चव्हाण येणाऱ्या प्रशिक्षणार्थींचा वयोगट सर्व साधारणपणे ३५ ते ५५ असावा. सुरुवातीच्या काळात काही तुकड्यांमधील व्यक्तींची वैद्यकीय तपासणी होत असताना कोर्स संपताना परत तपासणी चांगला परिणाम दिसायचा.

योगासने, प्राणायामाचे धडे घेताना झालेल्या मनमोकळ्या चर्चेत अभ्यासात माझ्या लक्षात आले, ते असे. विस्कटलेली जीवनचर्या, अयोग्य जीवनशैली, प्रसंगानुसार घडणारा मानसिक व शारीरिक ताण, विश्रांतीचा अभाव, असमतोल आहार, आरोग्याची हेडसांड, प्रसंगी वेदनाशमक औषधांचे सेवन, मानसिक व्यवहारातून व्यसनाधीन लोकांना परिवाराच्या अपेक्षेनुसार गरजेनुसार न देता येणारा सहवास तसेच, आर्थिक ओढाताण, निवृत्तीनंतर समाधानी व शांत निरोगी जीवनच पारखे होते. माझ्या पोलीस सेवेतील ४० वर्षांच्या अविरत अभ्यासाने चिंतनाने आम्ही एकच रामबाण औषध म्हणजे शास्त्रशुद्ध योगासन, प्राणायाम हेच होय. डोंबारी लांब, जाडसर दोन दोरखंडांवरून स्वतःचा तोल हातातील काठीने सांभाळत यशस्वी पैलतीरावर जातो, त्याचप्रमाणे योगाची काठी तोल जाऊ देत नाही. नोकरीची कार्यक्षमता वाढेल. तुम्हाला जनतेकडून आदराने पाहिले जाईल आणि खात्यास तुमचा अभिमान वाटेल.

**निष्कर्ष** योगसाधनेने जीवनाच्या कालावधीत कार्यक्षमता सांभाळून संकट अरिष्ठावर मात करून सुखी समाधानी शांत निरोगी जीवन जगणे जगावेसे वाटणे. ■

कथा



सचिन बेंडभर
पुणे

# गणपती पावला




या वर्षीचा गणेशोत्सव उत्साहात साजरा करायचा असे आमच्या गँगने ठरवले. हो गँगच म्हणायची. आमच्या गँगमधील सगळी पोरे जहाल विचारांची. ठोशास ठोसा देणारी. मन्या, ह्‌या, सद्या, चेत्या, मी आणि पप्पूशेठ अशी आमची खतरनाक गँग.

एक दिवस आम्ही पाच-सहा जण हॉटेल 'वडा कोंबडा'मध्ये बसलो होतो. एवढ्यात मन्या बोलला,

''माच्यो, पोरांनी आपल्या मंडळाच्या गणपतीसमोर त्यांच्या ग्रुपचा गणपती बसवायचं

ठरवलंय.''

आमच्यापेक्षा वरचढ ठरून ते आम्हाला खुन्नस देणार होते. आम्ही सर्वांनी आमच्या प्लॅनची आखणी केली. आता पप्पूशेठ काय निर्णय घेतात, याकडे सर्वांचे लक्ष होते. पप्पूशेठला प्लॅन समजावून सांगितला. पप्पूशेठ म्हणजे आमच्या पोरासोरातले शानेसुरते व्यक्तिमत्त्व. त्यांचा निर्णय सर्वांना मान्य असायचा. शरीराने धडधाकट, उंची सहा साडेसहा फूट, कायम इनशर्ट केलेला, अंगात पॉश कपडे, डोळ्यांवर काळा गॉगल आणि गळ्यात सोन्याचा गोफ, असे त्यांचे व्यक्तिमत्त्व! आम्ही सगळी पप्पूशेठच्या निर्णयाकडे डोळा लावून बसलो होतो. पप्पूशेठनी सिगारेटची ॲश टेबलावर असलेल्या डबीत झटकली आणि म्हणाले,

''सरफरोशी की तमन्ना आज हमारे दिल में है। देखना है जोर कितना बाजू ए कातिल में है।''

त्या वेळी सर्वांनी मोठा जल्लोष केला. आम्ही गणपतीच्या तयारीला लागलो. पाठोपाठ माच्यो ग्रुपच्या पोरांनीही तयारी केली. युद्धाचेच रणशिंग फुंकले गेल्याचे वातावरण तयार झाले.चौकाचौकात गणेश मंडळाचे फ्लेक्स लावले गेले. माच्यो ग्रुप मुद्दामहून आमच्या फ्लेक्ससमोरच त्यांचे फ्लेक्स

**त्या वेळी सर्वांनी मोठा जल्लोष केला. आम्ही गणपतीच्या तयारीला लागलो. पाठोपाठ माच्यो ग्रुपच्या पोरांनीही तयारी केली. युद्धाचेच रणशिंग फुंकले गेल्याचे वातावरण तयार झाले.चौकाचौकात गणेश मंडळाचे फ्लेक्स लावले गेले. माच्यो ग्रुप मुद्दामहून आमच्या फ्लेक्ससमोरच त्यांचे फ्लेक्स लावायचा. अशातच माच्यो ग्रुपचा बॅनर कुणीतरी फाडला आणि नाव आमच्या 'ओपन चॅलेंज' ग्रुपवर आले.**

लावायचा. अशातच माच्यो ग्रुपचा बॅनर कुणीतरी फाडला आणि नाव आमच्या 'ओपन चॅलेंज' ग्रुपवर आले. तेव्हा वातावरण भलतेच पेटले. सरपंचांना हाताशी धरून प्रकरण मिटवले.आम्हाला संधीची वाट पाहायला सांगितले. त्या दिवसापासून आम्ही आठवडाभर गुल होतो. बाहेर आलो ती ताजी बातमी घेऊनच! ते बॅनर माच्यो ग्रुपच्या पोरांनीच फाडले होते. आमची बदनामी करण्यासाठी त्यांनी असे केले होते. बातमी पक्की होती आणि ती संज्यानी दिली होती. संज्याच्या बातम्या पक्क्या असत. दोन दिवसांवर उत्सव आल्याने पप्पूशेठनी गणपतीची तयारी करायला सांगितले.

आम्ही तारा रस्त्याला आडव्या बांधून पताका चिकटवत होतो. पूर्ण रस्ताभर पताका लावायच्या होत्या. सद्याच्या घरी खळ करून काम जोरात सुरू झाले. पप्पूशेठ आले तेव्हा रस्त्यात बांधलेल्या आडव्या तारा पाहून त्यांनी आम्हाला हटकले. त्या तारा बाजूला घ्यायला सांगितल्या. तेव्हा मी त्यांना समजावले,

''रात्री गाडीवर कोणी रस्त्यावरून जात नाही. कोण आलेच तर आम्ही आहोतच.''

''हो, पण लक्ष ठेवा. रात्रीची वेळ आहे. तारा दिसत नाहीत.'' असे म्हणत ते पताका चिकटवलेली एकेक तार नेऊन बांधू लागले. रात्रीचे साडेबारा वाजले. एक तार शिल्लक राहिली होती. मन्यानी सगळ्यांना चहा आणला. आम्ही सगळी मन्याकडे गेलो. चहा घेऊ लागलो. सोबत पप्पूशेठ होतेच. चहाचा घोट घेतो न घेतो तोच गाडीचा आवाज आला. मन्या बोलला,

''पप्पूशेठ, पुढून चिक्या येतोय.''

चिक्या म्हणजे माच्यो ग्रुपचा अध्यक्ष! कंपनीतून आलेला होता. शिल्लक तार रस्त्यात तशीच होती.चिक्या फुल स्पीडने येत होता.तेवढ्यात पप्पूशेठ वाऱ्याच्या गतीने पळत सुटले. पाठोपाठ

आम्हीही. चिक्या फुल स्पीडने आला अन् पप्पूशेठ ओरडले,

''थांबऽऽऽ!''

चिक्याने जागेवरच ब्रेक दाबला. स्पीड असल्याने चिक्याची गाडी तीन-चार फूट घासत आली. एव्हाना तार चिक्याच्या गळ्याला लागली होती. चिक्याच्या चेहऱ्यावर भीती आणि कपाळावरून घामाचे थेंब टपकू लागले. सर्व काही व्यवस्थित असल्याचे पाहून आम्ही सुटकेचा निःश्वास टाकला. चिक्या पक्का हादरला होता. आम्ही त्याला गाडीवरून उतरवून बाजूला बसवले. मग रस्त्यातली तार सोडली. चिक्या ढसाढसा रडायला लागला.

''मी बॅनर फाडून तुमची बदनामी केली, पण आज तुम्हीच माझे प्राण वाचवले. मला माफ करा.'' तो हात जोडून म्हणत होता.

दुसऱ्या दिवशी चिक्याने चौकातले सगळे फ्लेक्स काढले आणि एकच नवीन फ्लेक्स चौकात लावला. त्यावर लिहिले होते, 'ओपन चॅलेंज आणि माच्यो ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने निर्मित सार्वजनिक गणेश मंडळ, पिंपळे जगताप, ता. शिरूर सर्व गणेशभक्तांचे हार्दिक स्वागत करत आहे.'

आमच्या गावातली माणसे आम्हा सर्वांना एकत्र बघून अवाक् झाली आणि जो तो म्हणू लागला, 'गणपती पावला...!' ■

**कविता**

## कोण हा राजा ये आकाशातूनी?

**कोण हा राजा ये आकाशातूनी ? कोकिळ गाते सुर अळवूणी !**

**गडगड वाजे ताशा ढगांचा,**

**थुईथुई नाचतो मोर नाचणा !**

**धूरोळा उधळीत वारा सुटला,**

**सुगंध मातीचा आसमंती दरवळला !**

**कोण हा राजा ये आकाशातून ? कोकिळ गाते सुर अळवणी !**

**लकलक लकलक वीज लखाखूणी,**

**वरूणास दाखवी सरोवर तळी ।**

**टपटप टपटप नाद ऐकोणी,**

**चिमणी पाखरे पळती घरटी ।**

**कोण हा राजा ये आकाशातूनी ? कोकिळ गाते सुर अळवणी !**

**पाने पुष्पे बहरली रानोरानी,**
**डोंगर दऱ्यांना फुटल्या झरवणी ।**

**हिरवा भरजरी शालू नेसूणी,**
**भ्रतारास भेटाया सजली अवनी !**

**कोण हा राजा ये आकाशातूनी ? कोकिळ गाते सुर अळवणी !**



**रघुनाथ मोहिते**
**मुंबई**

लेख



पंकज पेडणेकर (गंधार)
प्रमुख लिपीक
महाराष्ट्र पोलीस मुख्यालय
मुंबई

# प्रिय बालपण



प्रिय बालपण,

आजकाल तुझी खूप आठवण येते. चेहऱ्यावर नकळत हसू तर मनात हळूवारपणे गुदगुल्या करून जाते तुझी आठवण. खरे म्हणजे तुझ्याशी कसे बोलायचे तेच कळत नाही, म्हणून हे पत्र लिहीत आहे.

वाहत्या नदीमध्ये पोहायला गेल्यावर, घरचे ओरडायचे. कधी कधी मारायचेसुद्धा. तरीपण चोरून, लपून नदीवर जायचे, आजूबाजूच्या कोणत्याच गोष्टीचा किंचितही विचार न करता अंगावरचे सगळे कपडे काढून, उंच कातळातून स्वतःला नदीच्या कुशीत झोकून दयायचे, उलट्या सुलट्या उड्या मारून नाकातोंडात पाणी गेले तरी डुबक्या मारायच्या. संपूर्णपणे उघडे शरीर असलेल्या अवस्थेतही चेहऱ्यावर समाधानाचे हास्य फुलायचे ते याच वयात. ते वय म्हणजे

बालपण.

सकाळी जाग आली, की सगळ्यात आधी अंग ताणून मोठा आळस द्यायचा, डोळे उघडल्याबरोबर आईला शोधायचे, आईला कडकडून मिठी मारली, की येऊन बसायचे दरवाजाच्या उंबरठ्यावर आणि वाट बघायची उगवणाऱ्या सूर्याची निवांतपणे डोंगराच्या मागून कासवाच्या गतीने येणाऱ्या सूर्याची प्रत्येक हालचाल टिपून घ्यायची सविस्तर. 'हा डोंगराच्या मागे लपलेला सूर्य आपल्यालाच डोकावून बघायला येतो की काय?' असे नेहमी वाटायचे त्यावेळी. ती वेळ म्हणजे बालपण. अंगणात रवंथ करत बसलेल्या गाईला मिठी मारून तिच्या अंगावर निवांत झोपायचे. तिच्या वर-खाली होणाऱ्या पोटाची हालचाल एखाद्या मसाजर पेक्षाही सुख द्यायची. तिच्या पोटाला कान लावल्यावर तिच्या पोटात सामावलेल्या ३३ कोटी देवतांचा कधी भास झाला नाही. पण पराकोटीचा आनंद अनुभवायला मिळायचा एवढे नक्की.

वडाच्या पारंबीला लटकून जोरजोरात झोका घ्यायचा. ती वडाची पारंबी तुटेल आणि आपण पडू अशी शंकाही यायची नाही मनात कधीच. निटस मैदान नाही, स्टंप नाही, बॅट नाही तरी पायाला टोचणाऱ्या दगडांनी भरलेल्या मैदानात, दगडाचा स्टंप करून

**तू जे काही दिलेस ते शब्दात मांडणे खूपच कठीण आहे आणि जरी शब्दात मांडले तरी त्यातल्या भावना जशाच्या तशा व्यक्त करणे त्याहूनही कठीण. हळूवार फुंकर मारावी तसे तू आमच्या रिकाम्या मेंदूत नवनवीन गोष्टी अगदी हळूवारपणे पेरल्यास. आज या सर्व गोष्टी आठवल्या, की खरेच सगळ्याचेच नवल वाटते. दिवसभरात दहा काजूच्या बिया जमवायच्या आणि त्या देवून आठ आण्याची एक पेप्सी यायची.**

आणि लाकडाच्या फळीची बॅट करून जोपर्यंत अंधार पडत नाही व चेंडू पूर्णपणे दिसायचा बंद होत नाही तोपर्यंत क्रिकेट खेळायचे. या अशा कित्येक गोष्टीचे अनुभव मिळत गेले ते बालपणात.

तू जे काही दिलेस ते शब्दात मांडणे खूपच कठीण आहे आणि जरी शब्दात मांडले तरी त्यातल्या भावना जशाच्या तशा व्यक्त करणे त्याहूनही कठीण. हळूवार फुंकर मारावी तसे तू आमच्या रिकाम्या मेंदूत नवनवीन गोष्टी अगदी हळूवारपणे पेरल्यास. आज या सर्व गोष्टी आठवल्या, की खरेच सगळ्याचेच नवल वाटते. दिवसभरात दहा काजूच्या बिया जमवायच्या आणि त्या देवून आठ आण्याची एक पेप्सी यायची. खरे पैसे देऊन खोटे पैसे विकत यायचे आणि जग जिंकल्यासारखे आनंदाने उड्या मारत फिरायचे. हे सगळे आठवले, की पैशाने आनंद विकत घेता येत नाही हे वाक्य खोटे वाटायला लागते.

खरे तर तुला धन्यवाद म्हणायचे आहे. कारण तू खूप काही शिकवलेस, दिलेस. जरी कधी धडपडलो, पडलो तरी पुन्हा उत्साहाने उभे राहायला शिकवलेस, तू खळखळून हसायचा मोकळेपणा दिलास. ओक्साबोक्शी रडता रडता खुदकन हसायची कला अंगी रुजवलीस. घामाने शरीर ओले चिंब होईपर्यंत खेळायची सवय लावलीस. हवे तसे वागायची मुभा दिलीस. एखादे खेळणे कोणी हातात दिले तर ते सगळ्यात आधी उलट सुलट करून, चहुबाजुंनी निरखून बघायची अक्कल दिलीस. खेळून थकल्यावर घरी आल्या आल्या आईच्या मांडीवर डोके ठेवून शांत झोपून जायचा शहाणपणा दिलास. साधा कांदा कापताना आईच्या डोळ्यांत पाणी आले तरी डोळ्यात टचकण पाणी यायचे आणि नकळत हुंदका फुटायचा अशी काळजात काळजी भरलीस. या सगळ्यासाठी खूप धन्यवाद!

पण जसजसे वय वाढत गेले तशी तुझी संगत दुरावत गेली. तू

दिलेल्या या सगळ्या गोष्टींचा विसर पडत गेला नकळत. तुझे अस्तित्व अतीव जबाबदारीच्या ओझ्याखाली गुदमरत गेले. आता खरे पैसे कमवायला लागलोय तरी पण मनावर असलेल्या जबाबदाऱ्यांच्या सावटामुळे याचा आनंद चेहऱ्यावर तासभरही टिकत नाही. आता झोपेतून उठल्याबरोबर डोक्यात विचार येतो तो रोजची लोकल मिळेल की नाही याचा. आईला शोधणारे डोळे आता मोबाईलमधील रील्स बघण्यात व्यस्त झालेत.

आता घरात मऊ आलिशान बेड आहे. पण गाईच्या पोटावर झोपल्यावर जो पराकोटीचा आनंद मिळायचा तो आनंद मऊ गादीच्या बेडवर नाही, हे प्रकर्षाने जाणवते. मुळात निवांत झोप कशी असते याचाच विसर पडला आहे. हातात आलेले खेळणे जसे चहूबाजूंनी निरखून बघायला हवे तसेच आपल्या समोर घडणाऱ्या प्रत्येक घटनेला निरखून बघायला हवे ही गोष्टच विसरून गेलो वाढत्या वयाप्रमाणे.

वय वाढत गेले तसे खूप काही अनभुव मिळत गेले. पण तू दिलेल्यातले काहीच उरले नाही. हल्ली जबाबदारीचे ओझे वाहताना खूप थकायला होते. पण घरी जाऊन आईच्या मांडीवर डोके ठेवून शांत झोपायचा शहाणपणा राहिला नाही. आईच्या कुशीत गाढ झोपायचे सुख अनुभवायची जाणीव उरली नाही. आईच्या डोळ्यात खरे अश्रू दिसले तर डोळ्यांत पाणी सोडाच पण साधे गहिवरूनही येत नाही. ती काळजी उरली नाही आणि डोंगराच्या मागून

**वय वाढत गेले तसे खूप काही अनभुव मिळत गेले. पण तू दिलेल्यातले काहीच उरले नाही. हल्ली जबाबदारीचे ओझे वाहताना खूप थकायला होते. पण घरी जाऊन आईच्या मांडीवर डोके ठेवून शांत झोपायचा शहाणपणा राहिला नाही. आईच्या कुशीत गाढ झोपायचे सुख अनुभवायची जाणीव उरली नाही. आईच्या डोळ्यात खरे अश्रू दिसले तर डोळ्यांत पाणी सोडाच पण साधे गहिवरूनही येत नाही. ती काळजी उरली नाही.**

येणाऱ्या सूर्याची वाट बघणारे मन व्हॉट्सअॅपवर उगवत्या सूर्याची इमोजी पाठवून शुभ सकाळ करण्यात रमायला लागले.

आजी नेहमी म्हणायची, 'लहान मुले म्हणजे देवाघरची फुले.' तिचे ते म्हणणे आता पटायला लागले. ती म्हणायची, 'हे बालपण जपून ठेव, एकदा गेले की परत नाही येत.' यावेळी तिच्या बोलण्याचे हसू यायचे. कारण काय जपायचे आणि काय उधळायचे याची अक्कल नव्हती ना त्यावेळी. पण आता कळते कितीही आटापिटा केला, कितीही जोर जबरदस्ती केली, तरी स्वतःला बिलगता येत नाही. तसेच कितीही वाटले, कितीही आठवले तरी काळजाच्या खोल थराला चिकटून पडलेले बालपण पुन्हा अनुभवता येत नाही. आजीला समजलेले तुझे महत्त्व आता समजले. खरंच. आजकाल खूप आठवण येते तुझी. ■

तपासकथा



निकेतन कदम
सहा. पोलीस अधीक्षक
लातूर

# घात

**लातूर जिल्ह्यातील चाकूर पोलीस ठाण्यात एका दिवशी सकाळी सकाळी पोलीस पाटलांनी केलेल्या फोनमुळे गडबड उडाली. त्यांच्या गावात घडलेल्या घटनेची माहिती त्यांनी त्या फोनद्वारे कळवली होती. एका जबरदस्तीच्या मैत्रीने एक कुटुंब उघड्यावर आले होते. कोणी घात केला होता त्या व्यक्तीचा? पोलिसांनी त्याची ओळख पटवून पुढे त्याला न्याय कसा मिळवून दिला?**



सोमवार म्हणजे नोकरदार माणसाचा आळसाचा खरा दिवस. माणसाचे मन घरीच असते आणि शरीर कामावर निघालेले असते. शेतकरी वर्गाला मात्र अशी चैन परवडत नाही.

डोक्यात असे विचार घोळवत शंकरने रस्त्यावर काढलेल्या मोटरसायकलला वेग दिला आणि आपल्या शेताचा रस्ता पकडला. शेताकडे निघालेला असताना अचानक त्याला काहीतरी खटकले आणि त्याने मोटरसायकल थांबवली. आपल्याला नक्की काय खटकले हे त्याच्या लक्षात आले तो दचकला.

त्याच्या शेताच्या रस्त्याच्या अजून एकाचे शेत होते आणि त्या शेताच्या कडेला एक व्यक्ती पडलेली होती. शंकर गाडीवरून उतरला



**बाळाजी मोहिते**
पोलीस निरीक्षक
चाकूर पोलीस ठाणे
लातूर



**दिगंबर पाडीले**
पोलीस अंमलदार
चाकूर पोलीस ठाणे
लातूर



**राजेंद्र रायभोले**
पोलीस अंमलदार
चाकूर पोलीस ठाणे
लातूर



**साहेबराव हाके**
पोलीस अंमलदार
चाकूर पोलीस ठाणे
लातूर

आणि सावधपणे त्या व्यक्तीजवळ पोहोचला. त्या व्यक्तीची अवस्था बघून तो जागीच थबकला. त्याने पोलीस पाटलांना फोन लावला.

''हॅलो, मी शंकर बोलतोय.''

''बोल काय रे एवढ्या सकाळी सकाळी फोन केलास?''

मी सकाळी शेताकडे चाललो होतो तेव्हा वाटेत मला....''

शंकर जसजसे पुढे सांगत गेला तसे ऐकताना पोलीस पाटलांचे डोळे मोठे होत होते. त्यांनी फोन बंद झाल्यावर लगेच लातूर जिल्ह्यातील चाकूर पोलीस ठाण्यात त्यांना मिळालेली माहिती सांगितली. प्रकरणाचे गांभीर्य ओळखून ठाण्यात पोलीस निरीक्षक म्हणून कार्यरत असणारे बालाजी मोहिते तातडीने घटनास्थळाकडे रवाना झाले. सकाळची वेळ असल्याने रस्त्यावर रहदारी अजून सुरू व्हायची होती. वाटेत त्यांनी आपले वरिष्ठ सहा. पोलीस अधीक्षक श्री. निकेतन कदम यांना घडलेल्या घटनेसंदर्भात सांगितले.

थोड्याच वेळात मोहिते स्वत: आणि बरोबर असलेले पोलीस अंमलदार दिगंबर पाडीले घटनास्थळाचे निरीक्षण करण्यास धावले. शेताच्या बांधाला पडलेली व्यक्ती मृत पावली होती. तिच्या



**शंकर जसजसे पुढे सांगत गेला तसे ऐकताना पोलीस पाटलांचे डोळे मोठे होत होते. त्यांनी फोन बंद झाल्यावर लगेच लातूर जिल्ह्यातील चाकूर पोलीस ठाण्यात त्यांना मिळालेली माहिती सांगितली.**

डोक्यात अवजड वस्तूच्या वाराने मृत्यू झाल्याचे स्पष्ट दिसत होते. गळ्याभोवती दोरी आवळून प्रेताला काही अंतर फरफटत आणल्याचे देखील दिसून येत होते. मात्र ज्याने डोक्यात घाव घातला होता ती वस्तू मात्र कुठे दिसत नव्हती. प्रेताच्या भोवती लाल रंगाची पावडर पडलेली होती. मोहिते साहेबांनी बोटाने ती उचलली आणि तिचा वास घेतला तेव्हा ती लाल रंगाची पावडर म्हणजे लाल मिरची पावडर असल्याचे आढळले.

मोहिते साहेबांनी आता गर्दीकडे आपला मोर्चा वळवला.

''या व्यक्तीला कोणी ओळखतं का इथे?'' उपस्थित गर्दीकडे बघत साहेबांनी विचारणा केली. पण पण तिथे असलेल्या लोकांपैकी कोणीही त्या व्यक्तीला ओळखत नव्हते. इथे फारसे हाताला काही लागणार नाही हे लक्षात येताच त्यांनी ओळख पटवण्यासाठी मृतदेहाची तपासणी सुरू केली. मात्र मृताचे पाकीट आणि मोबाइल दोन्ही गायब झालेले होते. दरम्यानच्या काळात कदम साहेब घटनास्थळी दाखल झाले होते. इतक्यात काही अंतरावरून पोलीस अंमलदार रायभोले यांची आरोळी ऐकू आली आणि ते सावध झाले.

''साहेब, इथे काय सापडलं बघा..'' रायभोले जमिनीकडे बोट दाखवत म्हणाले.

त्यांच्यापासून हातभर अंतरावर एक लोखंडी रॉड पडलेला होता. त्याला रक्त लागलेले होते. ज्या हत्याराने खून झाला ते हत्यार हेच असणार हे कदम साहेबांनी ओळखले. हा रॉड जवळच काम सुरू असलेल्या महामार्गाच्या कामाच्या ठिकाणाहून घेण्यात आला होता. आजूबाजूच्या संपूर्ण परिसराची त्यांनी व्यवस्थित तपासणी केली, मात्र हाताला काही लागले नाही. त्यांनी मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवून दिला.

पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा केला. घटनास्थळावरून लोखंडी रॉड, दोरी हस्तगत करण्यात आली. कदम साहेबांनी लोकल व्हॉट्सएप ग्रुपवर मयताचा फोटो ओळखीसाठी पाठवला.

''साहेब, मयताची ओळख पटली.'' घाईघाईने आत येत हवालदार राचमालेंनी बातमी दिली आणि तपासाला खऱ्या अर्थाने वेग आला. मयत व्यक्तीचे नाव शेखर होते आणि त्याच्या वडिलांनी त्याची ओळख पटवली होती. शेखरच्या वडिलांना शांत करून आता पुढची माहिती मिळवण्याची जबाबदारी पोलिसांनी आपल्या खांद्यावर घेतली. शेखरचे कोणाशी वाद असे नव्हते आणि त्याच्या वडिलांना कोणावर संशय देखील नव्हता.

पोलिसांनी आता आपला होरा सुमन– शेखरची पत्नी हिच्याकडे वळवला.

''शेखरचे कोणाशी काही वाद भांडण झाले का?''

''नाही.''

''पण मग... तुमचा कोणावर संशय वगैरे?''

साहेबांच्या या प्रश्नावर तिने नकारार्थी मान हलवली.

''बरं राग येऊ देऊ नका पण हा प्रश्न तपासाच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. म्हणून फक्त तुमच्या मिस्टरांचे बाहेर कोणाशी संबंध? तुमच्या सासऱ्यांना याविषयी काही आयडीया नाही. पण तुम्हाला काही माहिती आहे का?''

''हो रुक्साना म्हणून एक बाई आहे. बऱ्याचदा ते तिच्याकडे थांबायचे.''

तिच्याकडून मिळालेल्या माहितीनुसार पोलिसांनी रुक्सानाविषयीची माहिती गोळा करायला सुरुवात केली.

आवाज थोडा कडक केल्यावर सरलाने शेखरची कुंडलीच उघडून दिली. शेखरचे अर्चना नावाच्या



मयत व्यक्तीचे नाव शेखर होते आणि त्याच्या वडिलांनी त्याची ओळख पटवली होती. शेखरच्या वडिलांना शांत करून आता पुढची माहिती मिळवण्याची जबाबदारी पोलिसांनी आपल्या खांद्यावर घेतली.शेखरचे कोणाशी वाद असे नव्हते...

एका स्त्रीसोबत विवाहबाह्य संबंध होते आणि तिला भेटण्यासाठी तो अनेकदा रुक्साना या केसमधील एक महत्त्वाचा दुवा ठरू शकते असा संशय पोलिसांना आला. रुक्सानाबद्दल शेजाऱ्यांचे मत काही फारसे चांगले दिसले नाही. ती वेश्याव्यवसाय करते अशी कुजबूजदेखील पोलिसांच्या कानावर पडली. एकुणच सगळी माहिती गोळा करून पोलिसांनी आता थेट तिच्या घराकडे मोर्चा वळवला. दोन चार वेळा कडी वाजवल्यानंतर दार उघडले गेले आणि झोपाळलेल्या डोळ्यांनी एका बाईने दरवाजा उघडला.

''रुक्साना तूच का?''

''हो साहेब मीच. काय काम काढलं या गरिबाकडं'' अंगावरचे कपडे व्यवस्थित करत रुक्साना म्हणाली.

''शेखरला ओळखते का?''

''हो. का बरं?''

''कशी काय?''

''कशी काय म्हणजे? अडल्या नडल्याला मदत करतात ते मला. माझ्या नवऱ्याने मला टाकलंय. माझ्या नवऱ्याचे मित्रच आहेत ते.''

''अडीनडीला मदत करायला काय रात्रीच वेळ मिळतो का त्याला?'' कदम साहेबांनी तिरकसपणे विचारले.

''तुमच्यापासून काय लपवायचे साहेब? तो येतो कधीकधी रात्री आणि सकाळी जातो.'' मान खाली घालत रुक्साना पुटपुटली.

''काल किती वाजता आला होता?''

''काल? साहेब दोन दिवस झाले तो इकडे आलाच नाही.''

''खरं बोलते आहेस ना? फोन तरी आला असेलच की त्याचा.''

''नाही साहेब. कामात असला तर तो फोन करत नाही आणि मी

केला तरी उचलत नाही. खरं सांगू का साहेब, दोन दिवस मला पण जरा ताप आल्यासारखं झालंय. आला नाही तेच बरं आहे असा विचार करून मी पण त्याला फोन नाही केला.''

''तुझ्या घरी अजून कोण कोण असतं?'' कदम साहेबांनी अधिक माहिती मिळण्यासाठी विचारले.

''माझी दोन लहान मुलं असतात साहेब. तिसरा मुलगा पंधरा वर्षांचा आहे, तो त्याच्या मामाकडे असतो. इथून जवळच घर आहे त्याचं.''

हे उत्तर ऐकून कदम साहेबांनी इशारा केला आणि तपास संपवत पोलीस बाहेर पडले.

''काय वाटतं साहेब?'' मोहितेंनी विचारले.

''बाई नक्की झोपेतून उठलेली होती. खून करून कोणी येवढ्या सहज झोपेल असे वाटत नाही. ज्या प्रकारे खून झालाय त्यावरून हे एकट्या बाईचे काम नक्कीच नाही. तिच्या पंधरा वर्षांच्या मुलाची जरा माहिती काढा. नको त्या अवस्थेत त्याने आपल्या आईला शेखरबरोबर पाहून डोक्यात राग घालून घेतला असण्याची देखील शक्यता आहे. रागाच्या भरात त्याने शेखरचा काटा काढलेला असू शकतो. मोहिते तुम्ही आणि हवालदार रायभोले या मुलाची माहिती काढा आणि पाडीले तुम्ही शेखर आणि रुक्सानाचे मोबाइल कॉल रेकॉर्ड्स कंपनीकडून मिळवा. ही रुक्साना नावाचा दुवा खुनी नसला, तरी कुठे ना कुठेतरी तो या सगळ्याशी जुळलेला असणार.''

पोलिसांनी तपासादरम्यान शेखरच्या बँकत भेट देऊन त्याच्या व्यवहारांची माहिती घेतली.

'सर आत येऊ का?' मोहितेंनी सॅल्यूट करत परवानगी मागितली आणि ते आत शिरले.

''बोला, एनी अपडेट्स?''

'साहेब, तो मुलगा अभ्यासात तसा मंद आहे आणि अगदी शांत



नको त्या अवस्थेत त्याने आपल्या आईला शेखरबरोबर पाहून डोक्यात राग घालून घेतला असण्याची देखील शक्यता आहे. रागाच्या भरात त्याने शेखरचा काटा काढलेला असू शकतो. मोहिते तुम्ही आणि हवालदार रायभोले या मुलाची माहिती काढा.

स्वभावाचा आहे. सर्वात महत्त्वाचं म्हणजे तो गेले तीन दिवस आपल्या मामा मामी सोबत मामीच्या गावच्या यात्रेला गेलेला आहे. आम्ही तिथल्या स्थानिक पोलिसांकडे संपर्क करून त्याची खात्री करून घेतली आहे.''

''ओह... हा अंदाज देखील चुकीचा निघाला तर.''

''पण तुमचा दुसरा अंदाज मात्र अगदी बरोबर ठरला साहेब.''

''येऊ का आतमध्ये?'' हसत हसत पाडीलेंनी परवानगी मागितली.

''तुमचा चेहरा काहीतरी महत्त्वाचं हाताला लागल्याचं अगदी स्पष्ट सांगतो आहे.'' मोहिते साहेब अंमलदार पाडीलेंना म्हणत होते

''हो साहेब. कॉल डिटेल्स आलेत. त्यावरून शेखर आणि रुक्साना दोघेही घटनेच्या रात्री एकमेकांच्या संपर्कात होते. मुख्य म्हणजे शेखरने शेवटचा फोन रुक्सानाला केलेला होता. ज्या ठिकाणी खून झाला, त्या ठिकाणी शेखरचा मोबाइल सोबत रुक्सानाच्या मोबाइलचे लोकेशन दिसतंय. सर्वात महत्त्वाचं, शेखरच्या मावसभावाने रुक्सनाला त्या रात्री शेखरच्या गाडीवर बसून जाताना बघितलं होतं.''

''शाब्बास! मोहिते कमॉन, आता घाई केली पाहिजे आणि पहिल्यांदा त्या रुक्सानाला ताब्यात घेतलं पाहिजे. पडोळे, तुम्ही अर्चनाला ताब्यात घेऊन चौकीला आणा. आणि मोहिते, पंचांच्या साक्षीने तिच्या घराची झडती घ्यायची. काही ना काही पुरावा हाती लागेलच!'' कदम साहेबांनी तपासाला अधिक वेगवान केले. थोड्याच वेळात पोलिसांचा ताफा रुक्सानाच्या दारात येऊन थडकला.

''काय साहेब? मी बोलले ना तुम्हाला आमची गाठभेट झालीच नाही दोन तीन दिवसांत.''

''ते सगळं आता ठाण्यात

सांगायचं. चला.''

''अहो पण मी काय केलंय?''

''सांगितलं ना आता जे काय बोलायचं ते पोलीस ठाण्यात.''

हे सगळे सुरू असताना कदम साहेब आणि अन्य पोलिसांनी तिच्या घरात तपासकामाला सुरुवात केली.

''साहेब, हे दोन मोबाईल इथे घरात सापडले. यातला एक शेखरचा आहे.''

''रुक्साना, त्या रात्री तू शेखरबरोबर होतीस ह्याचा साक्षीदार आमच्याकडे आहे. त्याच रात्री शेखरच्या खात्यातून एटिएममधून पैसे काढले गेले होते आणि त्याचा व्हिडिओ देखील आमच्याकडे आहे. त्यात तू स्पष्ट दिसत आहेस. तू अजूनही गप्प बसणार आहेस का?'' कठोर आवाजात कदम साहेब म्हणाले आणि त्यांच्या प्रत्येक वाक्याबरोबर रुक्सानाच्या चेहऱ्याचा रंग उतरत गेला.

''साहेब, काय करणार होते मी. राक्षस होता तो. आधी मला प्रेमात पाडले आणि नंतर माझा बाजार मांडला. मला वेश्या बनवली त्या हरामीने आणि माझी कमाई खाणारा दलाल बनला हा नालायक माणूस. रात्री बेरात्री कधीही गाडीवर बसवायचा आणि आडबाजूला, शेतात, रानात गिऱ्हाइकाच्या ताब्यात द्यायचा. आलेल्या पैशातले पन्नास शंभर माझ्या हातावर टेकवायचा आणि बाकीचे घशात घालायचा. मला सोड म्हणाले तर सोडायला पण नकार देत होता.''

''म्हणून त्याचा खून केला?''

''केला साहेब! या धंद्याच्या कामात माझी आणि अश्रफची ओळख झाली. जीव टाकतो साहेब तो.. माझ्यावर. त्यानेच मला सुचवलं की शेखरला कायमचं नाहीसा करणं हाच एक उपाय आहे. मग आम्ही नीट बेत आखला आणि अश्रफच्या एका मित्राला मदतीला घेतले. अश्रफने ग्राहक बनून शेखरला फोन केला



मी लपवून आणलेली तिखटाची पूड शेखरच्या डोळ्यात भिरकावली आणि त्याला पार आंधळं केलं. जवळच रस्त्याचं काम चालू आहे, तिथून येताना अश्रफ एक जाड सळई घेऊन आला होता. तीच त्याने शेखरच्या डोक्यात घातली आणि एका फटक्यात खेळ खलास!

आणि तो मूर्ख शेखर, स्वत: मला घेऊन ह्या आडबाजूला आला. अश्रफ आणि त्याचे मित्र तयारीत होतेच. मी लपवून आणलेली तिखटाची पूड शेखरच्या डोळ्यात भिरकावली आणि त्याला पार आंधळं केलं. जवळच रस्त्याचं काम चालू आहे, तिथून येताना अश्रफ एक जाड सळई घेऊन आला होता. तीच त्याने शेखरच्या डोक्यात घातली आणि एका फटक्यात खेळ खलास!''

''मग?''

''कुत्र्यागत ओढला त्याला गळ्यात दोरी बांधून. मला शेखरच्या कार्डचा पासवर्ड माहिती होता. तिथून मग आम्ही एटीएमवर गेलो. ८० हजार रुपये काढले आणि आपापल्या घराची वाट पकडली.''

बोलता बोलता तिने ओढणीत मान लपवली. पोलिसांनी तिच्याकडून अश्रफ व त्याच्या मित्राचा पत्ता हस्तगत केला. पोलिसांनी त्या दोघांनाही अटक करून मा. न्यायालयात तीनही आरोपितांविरोधात दोषारोपत्र दाखल केले. मा. न्यायालयाने दोन्ही बाजू ऐकून तसेच समोर आलेले सर्व साक्षीपुरावे ग्राह्य धरत तिघांनाही दोषी ठरवले. मा. न्यायालयाने तीनही आरोपींना भादंवि कलम ३०२, २०१, १२० (ब) व ३४ अन्वये आजन्म सश्रम कारावास व १० हजार रुपये दंड अशी शिक्षा सुनावली आहे.

सदर प्रकरणाचा तपास लातूर जिल्ह्याचे तत्का. सहा. पोलीस अधीक्षक श्री निकेतन कदम, चाकूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक बालाजी मोहिते, पोलीस अंमलदार दिगंबर पाडीले, राजेंद्र रायभोले, साहेबराव हाके यांनी अत्यंत कौशल्याने आणि चिकाटीने पूर्ण केला आहे. ■

***(कथा सत्यघटनेवर आधारित असून पात्रांची नावे व काही प्रसंग बदलले आहेत.)***



संजय जगताप
पोलीस निरीक्षक
कामशेत पोलीस ठाणे
पुणे ग्रामीण

# अनोखे वादळ

**पुणे जिल्ह्यातील मौजे कोथुर्णे गावातील २०२२ सालची नागपंचमी गावकऱ्यांच्या आयुष्यात अनोखे वादळ घेऊन आली. खासकरून महादेव आणि सुनंदा यांचे आयुष्य या वादळाने पार उध्वस्त करून टाकले. काय होते ते वादळ? कामशेत पोलीस ठाण्याच्या पोलिसांनी अथक प्रयत्नांनी कसा न्याय मिळवून दिला महादेव व सुनंदा या दाम्पत्याला?**



पुणे जिल्ह्याच्या मावळ तालुक्यातील मौजे कोथुर्णे गावातील एका मंदिराच्या परिसरात २ ऑगस्ट २०२२ या दिवशी एकाएकी गोंधळ उडाला. त्याला कारणही तसेच होते. नागपंचमीच्या दिवशी त्या ठिकाणी साप निघाला होता. पण सर्वानुमते त्या सापाला मारू नये असे ठरले. त्याचवेळी बिट्टी अर्थात सविता आपल्या वडिलांकडे तिचा फोटो काढण्यासाठी हट्ट करत होती. बिट्टीचा बालहट्ट महादेवला काही मोडवत नव्हता. त्याने लगेच आपल्या मोबाईलवर तिचा फोटो काढला. तिचा तो फोटो अतिशय मोहक आला होता. एखाद्या परिप्रमाणे तिचा फोटो आला होता. वडिलांनी आपला फोटो काढला आहे, हे कळताच ती आनंदाने आपल्या वडिलांना जाऊन



**अभिनव देशमुख**
पोलीस अधीक्षक
पुणे ग्रामीण



**अजय दरेकर**
सहा. पोलीस उपनिरीक्षक
कामशेत पोलीस ठाणे
पुणे ग्रामीण



**समीर शेख**
सहा. पोलीस उपनिरीक्षक
कामशेत पोलीस ठाणे
पुणे ग्रामीण



**शुभम चव्हाण**
पोलीस उपनिरीक्षक
कामशेत पोलीस ठाणे
पुणे ग्रामीण पोलीस

बिलगली. हे सुरू असतानाच,

''अवो, येता ना आत? सगळं झालं आहे. तुम्ही आलात की लागलीच वाढायला घेते मी.''

सुनंदाने आपली मुलगी बिट्टी आणि नवरा महादेव यांना जेवण्यासाठी आत बोलावले.

''काय काय आहे आज? तोंडाला पाणी सुटलंय माझ्या. चल लवकर दे जेवायला. बाबांचं जेवण झालं?''

''होऽऽ मगाच. नागोबाला नेवेद्य पण दाखवून झाला.''

सुनंदाने नैवेद्याचे ताट त्याच्या पुढ्यात ठेवले. आपल्या मुलीची आणि नवऱ्याची क्षुधाशांती होईल याची सुनंदाने पूर्णपणे काळजी घेतली होती. मनसोक्त जेवण केल्यावर परत एकदा कामाला जाण्याची इच्छा महादेवला होत नव्हती. पण न जाणे अशक्य होते. तो शेवटी कामावर जाण्यासाठी बाहेर पडला. जेवणे झाल्यावर मागचे आवरून सुनंदा कपडे धुण्यासाठी पाठीमागे गेली. कपडे धुऊन आल्यावर बिट्टी घरात नसल्याचे तिला आढळले. बिट्टीला हाका मारत ती घराच्या अंगणात आली. पण बिट्टी ना घरात होती; ना अंगणात. मैत्रिणींबरोबर खेळत खेळत गेली असेल असा विचार करत सुनंदा परत एकदा आपल्या उर्वरित कामाला निघून गेली. यातच



**बिट्टी सापडत नसल्याची बातमी वणव्यासारखी परिसरात पसरली. महादेव घरी येत असताना त्याला वाटेतच याबद्दल समजले. पण तोपर्यंत सगळीकडे तिचा शोध सुरू झाला होता. एवढा शोध घेऊनही काहीच थांगपत्ता लागत नव्हता.**

सगळी दुपार गेली. आता संध्याकाळ झाली, तरी बिट्टी अजून घरी परतली नव्हती. आता मात्र तिला काळजी वाटायला लागली. बिट्टी सापडत नसल्याची बातमी वणव्यासारखी परिसरात पसरली. महादेव घरी येत असताना त्याला वाटेतच याबद्दल समजले. पण तोपर्यंत सगळीकडे तिचा शोध सुरू झाला होता.

एवढा शोध घेऊनही कोणताच थांगपत्ता लागत नाही हे लक्षात आल्यावर गावातल्या कोणीतरी कामशेत पोलीस ठाण्याच्या पोलीस अंमलदार हिप्परकर यांना फोन केला. त्यांनी घटनेचे गांभीर्य लक्षात घेत कामशेत पोलीस ठाण्यात घटनेविषयी माहिती दिली. त्यावेळी कार्यरत असलेले पोलीस निरीक्षक संजय जगताप यांना घडलेला प्रकार समजताच त्यांनी तातडीने पावले उचलली. साहेबांनी फोनद्वारे जुजबी माहिती संकलित करून ताबडतोब एक पथक गावात पाठवले. या पथकात पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांचा समावेश होता. तपासाच्या दृष्टीने आवश्यक सूचना साहेबांनी या पथकास दिल्या. पोलीस पथक गावात माहिती संकलित करत असतानाच दुसरीकडे साहेबांनी परिसरातील सर्व पोलीस पाटलांना समाजमाध्यमाच्या माध्यमातून घटनेबद्दल अवगत केले. हे सगळे होईपर्यंत महादेव इतर काही लोकांसह कामशेत पोलीस ठाण्यात आला.

''साहेब, माझी बिट्टी...'' महादेव हात जोडत साहेबांना म्हणाला.

''हे बघा काही काळजी करू नका. आपण सगळे मिळून शोधून काढू. तुम्ही फोटो आणला आहे ना बरोबर.''

''हो. आज दुपारीच काढलाय. भारी हट्ट करत होती.''

साहेबांनी फोटो मिळाल्यावर



**प्रियंका माने**
पोलीस उपनिरीक्षक
कामशेत पोलीस ठाणे
पुणे ग्रामीण पोलीस



**सुरेखा शिंदे**
पोलीस उपनिरीक्षक
कामशेत पोलीस ठाणे
पुणे ग्रामीण पोलीस



**जितेंद्र दिक्षीत**
पोलीस अंमलदार
कामशेत पोलीस ठाणे
पुणे ग्रामीण



**आशिष झगडे**
पोलीस अंमलदार
कामशेत पोलीस ठाणे
पुणे ग्रामीण



**रविंद्र राय**
पोलीस अंमलदार
कामशेत पोलीस ठाणे
पुणे ग्रामीण

तातडीने तो फोटोही सगळीकडे प्रसारित केला. विशेष म्हणजे तो फोटो हा बिट्टी हरवण्याआधी त्याच दिवशी थोड्या वेळापूर्वी काढला होता. वरिष्ठांनाही जगताप साहेबांनी सर्व परिस्थितीविषयी अवगत केले. थोड्याच वेळात साहेब बिट्टीच्या गावात पोहोचले. त्यांनी गावात पोहोचल्यावर अधिक माहिती घेण्यास सुरुवात केली.

''कोणी बघितलंय का तिला कोणाबरोबर जाताना किंवा कुठे जाताना?''

''हो. मी पाहिलं तेव्हा ती इथे खेळत होती.'' जमलेल्या लोकांपैकी एकजण पुढे होत म्हणाला.

''अजून कोणाला काही माहिती आहे का?'' साहेबांनी जमलेल्या लोकांकडे बघत विचारले.

साहेबांच्या या प्रश्नावर त्यांना म्हणावा तितका प्रतिसाद मिळाला नाही. साहेबांनी बिट्टीच्या मित्रमैत्रिणींना बिट्टीबद्दल विचारले.

''काय नाव तुझं बाळा?'' बिट्टीच्या मैत्रिणीला विचारले

''चिंगी.''

''ही मैत्रीण आहे ना तुझी?''

जगताप साहेबांच्या या प्रश्नावर चिंगीने होकारार्थी मान हलवली.

''तू पाहिलं का तिला आज



तो फोटो हा बिट्टी हरवण्याआधी त्याच दिवशी थोड्या वेळापूर्वी काढला होता. वरिष्ठांनाही जगताप साहेबांनी सर्व परिस्थितीविषयी अवगत केले.थोड्याच वेळात साहेब बिट्टीच्या गावात पोहोचले. त्यांनी गावात पोहोचल्यावर अधिक माहिती घेण्यास सुरुवात केली.

दुपारनंतर?''

आम्ही इथेच खेळत होतो थोड्या वेळापूर्वी. मग नंतर आम्ही आईनी बोलावलं म्हणून घरी गेलो.''

''पण त्यावेळी बिट्टी कुठे होती?''

''ती इथेच खेळत होती.''

''तुमची मैत्रीण मिळायला पाहिजे ना लवकर?''

''हो.''

या दरम्यानच्या काळात डॉ. श्री. अभिनव देशमुख पोलीस अधीक्षक पुणे ग्रामीण घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी व इतर अधिकाऱ्यांनी परिस्थितीचा आढावा घेतला. उपविभागीय पोलीस अधिकारी लोणावळा श्री. भाऊसाहेब ढोले व अपर पोलीस अधीक्षक बारामती मिलिंद मोहिते यांनी घटनास्थळी भेट देऊन तपासात मार्गदर्शन केले. स्थानिक गुन्हे शाखा व आजूबाजूच्या पोलीस स्टेशनची पथके शोधासाठी पाठवण्यात आली. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या सूचना आणि मार्गदर्शनानुसार साहेबांनी लहानग्या बिट्टीचा शोध अधिक वेगवान होण्यासाठी वेगवेगळी पथके निर्माण करून संपूर्ण गाव पिंजून काढायला सुरुवात केली. तपासादरम्यान सीसीटीव्ही फुटेज तपासले असता ती गावाबाहेर जाताना दिसली नाही त्यामुळे ती गावातच असण्याची शक्यता धुसर होती. जगताप साहेबांनी घटनेच्या दुसऱ्या दिवशी पहाटे पाचच्या सुमारास गावातून बाहेर जाण्याऱ्या-येणाऱ्या वाटांवर चेक पॉईंट्स तयार केले.

''उद्या महत्त्वाचं काम असल्याशिवाय कोणताही व्यक्ती गावाच्या बाहेर जाणार नाही. कोणाला जावं लागलंच तर त्यांनी आम्हाला सांगायचं आणि जायचं.'' गावातल्या लोकांना साहेबांनी सूचना केली. उजाडल्यावर पोलिसांनी परत एकदा वेगवेगळ्या टीम्स बनवून तपासाला सुरुवात केली. यावेळी गावातली कुठली व्यक्ती बाहेर गेली आहे का? किंवा कोणाच्या घराला कुलुप आहे या दृष्टीने तपासाला सुरुवात केली त्यावेळी त्यांना एका शेतात बिट्टीचा मृतदेह आढळला. तिच्या त्या निश्चल देहाची तपासणी केली असता तिच्या गळ्यावर कापल्याच्या खुणा होत्या. तिचा मृतदेह अतिशय विदीर्ण अवस्थेत होता. महादेव आणि सुनंदापर्यंत ही बातमी पोहोचण्यास जराही वेळ लागला नाही. घडलेली गोष्ट समजताच ते दोघेही धावत त्या शेतापाशी आले.

''बिट्टीऽऽ उठ ना गं. आई–बाबा आलेत बघ, तुला न्यायला. डोळे उघडून बघ ना सोन्या आमच्याकडे.'' सुनंदा उर बडवत बिट्टीला उठवण्याचा प्रयत्न करत होती. महादेवने तिला कसेबसे शांत केले. साहेबांनी बिट्टीचा मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवला.

गुन्ह्याशी संबंधित महत्त्वाचे सोपस्कार पूर्ण करत असताना ज्या ठिकाणी बिट्टीचा मृतदेह मिळाला तेथून जवळच असणाऱ्या घरांमधील तरुणांकडे याविषयी विचारपूस केली. या चौकशीदरम्यान काही महत्त्वाच्या गोष्टी पोलिसांच्या लक्षात आल्या. पोलिसांनी आपला तपास आता त्या दिशेने सुरू केला. पोलीस आता परत एकदा महादेवच्या घराजवळ आले. तेथे सुनंदाला धीर देणाऱ्या महिलांमधून पोलिसांनी शांता नावाच्या महिलेला बोलावले. पोलिसांनी बोलवताच ती उठून साहेबांच्या पुढ्यात जाऊन उभी राहिली.

''रवि मुलगा आहे ना तुमचा?''



साहेबांनी आता रविच्या कामाच्या ठिकाणाचा पत्ता शोधून काढून त्या ठिकाणी तो आहे की नाही याची खातरजमा करून घेतली. त्यानंतर सहा. पोलीस उपनिरीक्षक म्हणून कार्यरत असलेले शुभम चव्हाण, अंमलदार दिक्षित, पवळे यांचा समावेश असलेले पथक त्या ठिकाणी पाठवले.

''व्हय. काय झालं सायेब?''

''कुठे आहे तो? गावात दिसला नाही, काल संध्याकाळपासून.''

''तो तर कामाला गेला.''

''कामाला गेला? पण आम्ही तर सांगितलं होतं आम्हाला कळवल्याशिवाय कुठेही जायचं नाही तरीही गेला? बरं कधी गेला?'' साहेबांनी चढ्या स्वरात विचारले.

''त्याला जायचं होतं. म्हणून तो आज सकाळच्यालाच गेला.''

साहेबांनी आता रविच्या कामाच्या ठिकाणाचा पत्ता शोधून काढून त्या ठिकाणी तो आहे की नाही याची खातरजमा करून घेतली. त्यानंतर पोलीस उपनिरीक्षक म्हणून कार्यरत असलेले शुभम चव्हाण, अंमलदार समीर शेख, पोलीस नाईक हिप्परकर यांचा समावेश असलेले पथक त्या ठिकाणी पाठवले. पोलिसांनी तिथे पोहोचताच चौकशी करण्यासाठी त्याला ताब्यात घेतले.

''तुम्हाला सगळ्यांना कल्पना दिली गेली होती ना की कोणीही गावाबाहेर जायचं नाही तरी तू कसा काय कामावर आला?''

''नाही ते... कामावर येणं आवश्यक होतं म्हणून आलो.''

''काल कुठे होता?''

''काल सुट्टी होती नागपंचमीची त्यामुळे काल घरीच होतो.''

रवि बोलत असतना नजर चोरत असल्याचे पोलिसांनी ओळखले. शिवाय त्या दिवशी नागपंचमीची सुट्टी म्हणून नाही तर आठवडी सुट्टी असल्याने तो घरी होता हे पोलिसांना तपासादरम्यान समजले होते. त्यांनी आता घटनेच्या दिवशी रविने दिवसभर काय केले याचे तपशील संकलित करायला सुरुवात केली. त्यातून काही गोष्टी पुढे आल्या. त्यानुसार पोलिसांनी त्याला संशयित

म्हणून अटक केली. दुसऱ्या दिवशी शांतालाही पोलिसांनी चौकशीसाठी ताब्यात घेतले. त्यावेळी झालेल्या तपासातून तिलाही घटनेसंदर्भातील काही गोष्टी माहिती असल्याचे समोर आले. आता घडलेला सगळा घटनाक्रम सूर्यप्रकाशाइतका स्वच्छ पोलिसांसमोर आला होता.

''रवि...! बोल का मारलं तू त्या पोरीला?''

''साहेब त्यानं काही नाही केलंय?'' रवि काही बोलणार तितक्यात शांता पटकन म्हणाली.

''तुमचं नाव रवि आहे? मी रवि नावाच्या माणसाला विचारलंय. ज्या व्यक्तीला विचारलं गेलं आहे. त्याने उत्तर द्यायला हवं. कळलं?'' साहेबांनी चढ्या स्वरात शांताला सांगितले.

''हं रवि चल बोल आता, का असं केलं तू? हे बघ गप्प बसून तुम्ही सुटू शकणार नाही. आधीच खूप उशीर झाला आहे. आता आणखीन उशीर नको. पटकन सांग. का मारलं तू? हे बघ तू काल काय काय केलं तू कुठे गेला होतास त्याची बित्तंबातमी आहे आमच्याकडे. बोल पटकन.''

साहेबांचे ते वाक्य ऐकले त्यानंतर मात्र रविचे आत्तापर्यंत आणलेले खोटे अवसान गळाले.

''साहेब मी काल बाहेर पडलो तेव्हा बिट्टी मला एकटीच दिसली शाळेच्या ग्राऊंडवर असलेल्या झोपाळ्यावर खेळत होती. ते मी बघितलं होतं.''

''मग पुढे?''

''माझं खाऊन पिऊन झाल्यावर मला सुट्टा मारायचा होता म्हणून सिगरेट घेण्यासाठी बाहेर पडलो तर जाताना शाळेच्या कंपाऊंडजवळ दोन पोरं खेळत होती. त्यांना एक गंमत दाखवली ते बघून ती घाबरली आणि गेली पळून. मग पुढे सिगरेट घेतली. तिथेच ती पेटवली आणि ओढून झाल्यावर परत येताना ही परत तिथेच दिसली. उंच झोका घेताना काय दिसत होती साहेब!''



**घरात एका गोणीत तिला भरलं आणि ती गोणी बाथरूममध्ये ठेवली. आजूबाजूला पडलेलं रक्त पुसून घेतलं उगाच कोणाला कळायला नको अशा बेतानी. पण मध्येच एकदा आवाज आला. म्हणून गेलो तर ती शुद्धीत आली. आता ही जाऊन सगळं सांगणार म्हणून मग किचनमध्ये ठेवलेला चाकू घेतला आणि गळा चिरला.**

''ए पुढे काय झालं ते सांग उगाच लांबण नको लावू.''

''मी तिच्या जवळ गेलो. तिला म्हटलं 'माझ्या बरोबर आलीस तर तुला बिस्कीट, चॉकलेट देईन.' येशील का विचारलं तर हो म्हणाली. म्हणून मग तिला नेताना कोणी बघू नये म्हणून आमच्या किचनच्या दरवाजातून तिला आत नेलं. मग तिला खायला दिलं. खिशातला मोबाईल काढून तिलाही गंमत दाखवली आणि म्हटलं असं खेळूया आपण चल. तर ही 'नाई शी!! मी नाई खेलनार' म्हणत ओरडायला लागली. पण डोक्यात दुसरं काही येतच नव्हतं साहेब. म्हटलं आता हाताशी आलेली गोष्ट मिळायलाच हवी. ती बेशुद्ध झाल्यावर म्हटलं आता कोणी अडवू नाही शकत आपल्याला मग मी मला करायचं होतं ते करून घेतलं. पण तोपर्यंत गावात तिच्या नावानी आरडाओरड सुरू झाली होती. नंतर घरात एक गोणी होती त्यात तिला भरलं आणि ती गोणी बाथरूममध्ये ठेवली. आजूबाजूला पडलेलं रक्त पुसून घेतलं उगाच कोणाला कळायला नको अशा बेतानी. पण मध्येच परत एकदा आवाज आला. म्हणून गेलो तर ती शुद्धीत आली. आता ही जाऊन सगळं सांगणार म्हणून मग किचनमध्ये ठेवलेला चाकू घेतला आणि गळा चिरला.''

''पण मग ती आम्हाला शिवारात कशी मिळाली?''

''मी आधी घराच्या मागे काही जुनी कौलं ठेवायची जागा आहे तिथे खड्डा खणला आणि त्यात ते पोतं ठेवलं आणि मग परत ती कौलं होती तशी ठेवून दिली. मग सगळे रक्ताचे डाग साफ केले. मग खड्डा खणल्याचे लक्षात येऊ नये म्हणून

रोप लावण्याचं नाटक करायचं म्हणून एका बाईकडून जास्वंदीच्या काड्या आणल्या आणि त्या फांद्या छाटत बसलो होतो, तेवढ्यात आई आली घरी. आल्याआल्या हिची कटकट सुरू. सणासुदीच्या दिवशी काय ड्रिंक करायचं? मी पण तिला म्हटलो, ''उगीच माझ्या मागं लागू नको. मला च्या दे करून.'' च्या देईस्तोवर मी ती डागाळलेली चादर घेऊन निघालो तेवढ्यात ही च्याचा कप घेऊन समोर उभी. मला म्हणाली कशाला बाहेर निघालास आता?''

रवि पुढे काही बोलणार तेवढ्यात शांता त्याच्याकडे बघत साहेबांना म्हणाली, ''काय करणार साहेब एकतर ड्रिंक केलेली याने आणि तशा अवस्थेत हा निगाला गाडी गेऊन मग बोलणार नाही का मी?''

''हे बघा तुमच्या काळज्या, तुमच्यातले संबंध याच्याशी आम्हाला काही देणंघेणं नाही तुम्ही तिला तिथे कशी आणली ते सांगा''

आता शांताने तिला आलेली शंका, तिने रविला फोनवरून केलेली विचारणा, अधूनमधून बिट्टीच्या घरी जाऊन मागोवा घेणे इत्यादी गोष्टी पोलिसांना सांगितल्या.

''सांगते.. मी तिचं प्रेत हुडकून काढलं आणि ते गावाबाहेर शेताच्या बाजूला उंच गवतावर फेकलं.''

यावेळी तिने पोलिसांना महत्त्वाच्या गोष्टीही सांगितल्या तिच्या सांगण्यावरून पोलिसांनी शांताच्या घराची बारकाईने तपासणी केली. त्यावेळी तिथे त्यांना घरात अनेक ठिकाणी रक्ताचे शिंतोडे आढळून आले. त्या रक्ताच्या अवशेषांचे नमुने हस्तगत करून ते तपासणीसाठी प्रयोगशाळेकडे पाठवण्यात आले. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा



पोलिसांनी शांताच्या घराची बारकाईने तपासणी केली. त्यावेळी त्यांना घरात अनेक ठिकाणी रक्ताचे शिंतोडे आढळून आले. त्या रक्ताच्या अवशेषांचे नमुने हस्तगत करून ते तपासणीसाठी प्रयोगशाळेकडे पाठवण्यात आले. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा केला. सदर जागेचे छायाचित्रणही करण्यात आले.

केला. सदर जागेचे छायाचित्रणही करण्यात आले. साक्षीदारांचे जबाब नोंदवण्यात आले.

पोलिसांनी संशयितांविरोधात मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. मा. न्यायालयाने समोर आलेले सर्व साक्षीपुरावे ग्राह्य धरून दोन्ही आरोपींना दोषी ठरवत रवि याला भादंवि कलम ३०२, ३७६(ए) ३७६ एबी व पॉक्सो कलम ६ अन्वये मृत्यूदंड आणि १० हजार रुपये दंड, ३७६(२) अन्वये आजन्म सश्रम कारावास आणि १० हजार रुपये दंड, पॉक्सो कलम ४ अन्वये आजन्म सश्रम कारावास आणि २० हजार रुपये दंड, भादंवि कलम २०१ नुसार ७ वर्षे सश्रम कारावास आणि ७ हजार रुपये दंड अशी शिक्षा सुनावली असून शांता हिला भादंवि कलम २०१ अन्वये ७ वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली आहे.

सदर प्रकरणाचा तपास पुणे जिल्हा अधीक्षक श्री. अभिनव देशमुख, मिलींद मोहिते, अपर पोलीस अधीक्षक, बारामती तसेच भाऊसाहेब ढोले पोलीस उपाधीक्षक, लोणावळा यांच्या मार्गदर्शनाखाली पुणे जिल्ह्यातील कामशेत पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संजय जगताप, सहा. पोलीस निरीक्षक अविनाश भागवत, आकाश पवार, शुभम चव्हाण, सहा. पोलीस उपनिरीक्षक अब्दुल शेख, समीर शेख, विद्याधर निचित (कोर्ट पैरवी), अजय दरेकर, पोलीस उपनिरीक्षक सुरेखा शिंदे, प्रियंका माने, महिला पोलीस अंमलदार कुंदे, पोलीस अंमलदार अनिल हिप्परकर, जितेंद्र दिक्षीत, रविंद्र राय, आशिष झगडे, नितीन कळसाईत, मनोज माने, हनुमंत वाळूंज व गणेश तावरे यांनी अत्यंत मेहनतीने पूर्ण केला आहे. ■

***(कथा सत्यघटनेवर आधारित असून पात्रांची नावे व काही प्रसंग बदलले आहेत.)***




सुनिल पुंगळे
सहा. पोलीस निरीक्षक
नानलपेठ पोलीस ठाणे
परभणी


# क्रोध

**रागाच्या भरात माणसाचा सारासार विवेक नष्ट होतो. अशावेळी राग नियंत्रण ठेवण्यासाठी स्वत:वरचा संयम सुटू न देणे अत्यंत आवश्यक आहे. नाहीतर हा राग काय अनर्थ करू शकतो याचे उदाहरण म्हणजे परभणी येथील नानलपेठ पोलीस ठाण्यात आलेला तो कॉल. कोणाच्या तरी रागामुळे कोणाच्या तरी आयुष्यात प्रचंड उलथापालथ झाली होती. नेमके काय घडले होते? कॉल करणाऱ्या व्यक्तीने नेमके असे काय सांगितले होते पोलीस अंमलदार यांना?**



परभणी जिल्ह्यातील नानलपेठ पोलीस ठाण्यात फोन येणे ही तशी नित्याची बाब होती. पण त्या दिवशी आलेला फोन वेगळाच होता. त्यावेळी कर्तव्यावर असलेल्या पोलीस अंमलदार संतोष पटवे यांनी उचलला.

''नमस्कार''

''नानलपेठ पोलीस स्टेशनचा नंबर आहे ना?''

''हो बोला. कोण बोलताय आपण?''

''सर, मी हॉस्पिटलमधून बोलतीये. आमच्या इथे आत्ता एक पेशंट आलाय. त्याची कंडिशन गंभीर आहे.''

''म्हणजे?''



**अशोक सोडगीर**
पोलीस अंमलदार
नानलपेठ पोलीस ठाणे
परभणी



**संतोष पटवे**
पोलीस अंमलदार
नानलपेठ पोलीस ठाणे
परभणी



**ज्ञानेश्वर निळे**
पोलीस अंमलदार
नानलपेठ पोलीस ठाणे
परभणी



**दत्तराव खुने**
पोलीस अंमलदार
(कोर्ट पैरवी)
परभणी

पलीकडून हे सगळे बोलणाऱ्या व्यक्तीने अंमलदार साहेबांना नेमकी परिस्थिती कथन केली. ते ऐकून त्यातले गांभीर्य त्यांच्या लक्षात आले.

''ठीक आहे. आम्ही येतो तिकडे.''

त्यांनी फोन ठेवून लगेच ठाण्याचे सहा. पोलीस निरीक्षक सुनील पुंगळे यांना आलेल्या फोनबद्दल अवगत केले. साहेबही तातडीने अंमलदारांनी सांगितलेल्या ठिकाणी रवाना झाले. काही वेळातच ते आपल्या सहकाऱ्यांसह रुग्णालयाच्या आवारात येऊन पोहोचले. साहेबांना आणि इतर पोलिसांना पाहून तिथे जमलेल्या रुग्णाच्या नातेवाईकांच्या चेहऱ्यावर भीतिमिश्रित भावना उमटल्या.

''हे का आले इते? त्यांना कोणी सांगितलं?'' दबक्या आवाजात ते एकमेकांना विचारत होते. त्याचवेळी साहेबांचे लक्ष रूममधून बाहेर पडणाऱ्या डॉक्टरांकडे गेले. पोलिसांनी आपला मोर्चा त्यांच्याकडे वळवला.

''डॉक्टर, हाऊ इज ही?''

''वेल... ऑफिसर, कंडिशन इज व्हेरी क्रिटीकल. खूप ब्लड लॉस झाला आहे त्याचा, ॲन्ड ही इज इन कोमा.''

''व्हॉट?''



ठाण्याचे सहा. पोलीस निरीक्षक सुनील पुंगळे ही तातडीने अंमलदारांनी सांगितलेल्या ठिकाणी रवाना झाले. काही वेळातच ते आपल्या सहकाऱ्यांसह रुग्णालयात येऊन पोहोचले. साहेबांना आणि इतर पोलिसांना पाहून तिथे जमलेल्या रुग्णाच्या नातेवाईकांच्या चेहऱ्यावर भीतिमिश्रित भावना उमटल्या.

''हो. आम्ही आमच्याकडून शक्य ते सगळं काही करण्याचा प्रयत्न करू. एस्क्यूज मी.''

पुंगळे साहेब आणि डॉक्टर यांच्यात नेमके काय बोलणे सुरू आहे हे जरी तिथे असलेल्या लोकांना कळले नसले, तरी काहीतरी भयंकर घडले आहे याची जाणीव रुग्णालयात दाखल असलेल्या आदिलच्या घरच्यांना झाली होती. नेमके काय झाले आहे हे त्याच्या घरच्यांशी बोलल्याशिवाय समजणार नाही, हे साहेबांनी ओळखले. पोलिसांना आपल्या दिशेने येताना पाहून आदिलच्या घरच्यांच्या मनात असलेल्या भीतीत भरच पडली.

''हे बघा, घाबरू नका. नेमकं काय घडलं आहे ते व्यवस्थित समजण्यासाठी तुम्ही बोलणं आवश्यक आहे.''

''आता काय बोलणार? ज्याचा डर होता तेच घडलं.''

''म्हणजे?''

''जाऊ द्या ना साब. कशाला आणखी वाढवता? हमे हमारे हाल पे छोड दो।'' अब्दुल– आदिलचे वडील– काकुळतीला येत म्हणाले.

''हे बघा, बात को समझने की कोशिश करीए। आज तुमचा मुलगा इथे मृत्यूशी लढत असताना तुम्ही शांत बसू शकत नाही. आज आपका बेटा है, कल किसी और का बेटा हो सकता है... म्हणून प्लीज कोऑपरेट करा.''

''इन्होने क्या बोला, समजून घ्या ना जरा. आम्हाला माफ करा आणि तुम्ही जा इथून.'' तिथे असलेले अजून एक नातेवाईक मध्येच म्हणाले.

''तुम्हाला काय वाटत असेल हे समजू शकतो आम्ही. पण तुम्ही काही काळजी करू नका. हे सगळं ज्या कोणी केलं आहे ना, त्याला

नक्की शिक्षा होणार.''

पुंगळे साहेब आणि अब्दुलच्या घरचे यांच्यातला हा संवाद सुरू असतानाच डॉक्टर परत एकदा व्हिजिटसाठी तेथे दाखल झाले. ते तपासून जेव्हा बाहेर आले तेव्हा त्यांच्या चेहऱ्यावरची चिंता वाढली होती. त्यांनी साहेबांना बाजूला बोलावून घेत आदिलची परिस्थिती विशद केली. डॉक्टरांनी त्याला नांदेड जिल्हा रुग्णालयात तातडीने हलवण्याची सूचना केली. पुंगळे साहेबांनीदेखील डॉक्टरांच्या सूचनेनुसार त्याला तातडीने नांदेड जिल्हा रुग्णालयात हलवले. पण त्यांचे हे प्रयत्न व्यर्थ गेले. रुग्णालयाच्या वाटेवरच आदिलने शेवटचा श्वास घेतला. डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. या गोष्टी घडत असताना दुसरीकडे पोलिसांनी दुसरे एक पथक तयार करून घटनास्थळी रवाना केले. घटनास्थळाचा पंचांसमोर पंचनामा केला. तपासपथकाने घटनास्थळावरून साधी माती, रक्तमिश्रित माती यांचे नमुने संकलित केले. साहेबांनी आदिलचा मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवला. तसेच मृतदेहाचा इन्क्वेस्ट पंचनामा केला. त्यावेळी त्याच्या पोटावर मोठे घाव होते. हे घाव आणि त्याची परिस्थिती म्हणजे एखादी व्यक्ती किती निर्दयी असू शकते याचे मूर्तिमंत उदाहरणच होते. आदिलने परिधान केलेले कपडे पोलिसांनी हस्तगत केले. संकलित केलेल्या गोष्टी वैद्यकीय तपासणीसाठी न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयाशाळेकडे पाठवण्यात आल्या. महत्त्वाच्या साक्षीदारांचे जबाब नोंदवण्यात आले. यावेळी प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांचे जबाबही नोंदवण्यात आले. यातून पुढे आलेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी पुढचा तपास सुरू ठेवला. त्यांनी आदिलच्या मित्रांकडे चौकशी केली, तेव्हा तपासादरम्यान सलमान आणि अजमल या दोन तरुणांची नावे संशयित म्हणून पुढे आली. हे दोघे कोठे असू शकतात याची चौकशी पोलीस करत होते. दरम्यान नानलपेठ पोलीस ठाण्यात अंमलदार म्हणून



डॉक्टरांनी पुंगळे साहेबांना बाजूला बोलावून घेत आदिलची परिस्थिती विशद केली. त्याला नांदेड जिल्हा रुग्णालयात तातडीने हलवण्याची सूचना केली. पुंगळे साहेबांनीदेखील डॉक्टरांच्या सूचनेनुसार त्याला तातडीने नांदेड जिल्हा रुग्णालयात हलवले.

कार्यरत असलेल्या अशोक सोडगीर यांचा मोबाईलची रिंग वाजली. स्क्रीनवर आलेला नंबर बघून सोडगीर यांच्या चेहऱ्यावर स्मित फुलले.

''नमस्कार साहेब.''

''नमस्कार... बरं ते नमस्काराचं नंतर बघू... आधी काम झालं का ते बोल!''

''बस काय साहेब! मी काय असाच फोन केलाय का आजपर्यंत? आहेत अजून, पण फुर्र व्हायच्या आत त्यांना ताब्यात घ्यावं लागेल.''

''शक्यता आहे का तशी?''

''वाटतंय तरी तसं.''

''ठीक आहे. तू पत्ता मेसेज कर, मी साहेबांना सांगतो.''

''ठीक आहे. मी पाठवतो पत्ता.''

मिळालेली माहिती सोडगीर यांनी तातडीने पुंगळे साहेबांच्या कानावर घातली. साहेबांनी तत्परतेने कारवाई सुरू केली. पोलिसांचा ताफा काही वेळातच आदिल राहात होता त्या वस्तीपाशी येऊन पोहोचला. या पथकात पुंगळे साहेबांबरोबर पोलीस अंमलदार सोडगीर यांच्यासह ज्ञानेश्वर निळे व पटवे हेही होते. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीस एका घराच्या समोर येऊन थांबले. अंमलदार निळे यांनी दरवाजा ठोठावला. पण आतून कोणताही प्रतिसाद आला नाही. मध्ये काही वेळ गेला. आता पटवेंनी परत एकदा दरवाजावर थाप मारली. थोड्या वेळाने दरवाजा उघडला गेला. दरवाजात एक विशीच्या दरम्यानचा एक तरुण उभा होता.

''अजमल आणि सलमान कोण आहे?''

''मी अजमल, आणि तो सलमान.'' आतमध्ये गादीवर बसलेल्या दुसऱ्या एका तरुणाकडे बोट दाखवत तो म्हणाला. ''काय झालं?''

''आदिलला मारल्याबद्दल आम्ही तुला अटक करायला आलो आहोत.''

काही वेळातच पोलिसांची जीप अजमल आणि सलमान यांना घेऊन नानलपेठ पोलीस ठाण्याच्या आवारात दाखल झाली. अटक केलेले ठिकाण ते नानलपेठ पोलीस ठाणे या संपूर्ण वाटेत अजमल आणि सलमान हे दोघेही खाली मान घालून आणि एकही शब्द न बोलता शांतपणे बसून होते. जीपमधून बाहेर पडल्यानंतर ठाण्यात जाईपर्यंत त्या दोघांचीही चाल मोठ्या आजारातून उठल्याप्रमाणे अतिशय मंद होती.

''हं बोला आता. का? आणि कसं मारलं आदिलला?''

''मरता क्या न करता, असतं ना तसं. फक्त इथे मरता ऐवजी मारता हा एकच बदल आहे. पण परिस्थिती अगदी सेम आहे.''

''नीट सांग काय ते. असं कोड्यात उत्तर नाही चालणार. मजा सुरू आहे का इथे? व्यवस्थित सांगायचं काय घडलं ते.''

''अहो सर, आदिल आणि त्याचे दोस्त खुन्नस खाऊन असायचे कायम.''

''कसली खुन्नस? भांडण कशावरून झालं होतं नेमकं?''

आता अजमलने सलमानकडे बघत नजरेनेच त्याला बोलण्याचा इशारा केला. त्याचा हा इशारा सलमानला समजला.

''साब, त्यांना काही कारण लागायचं नाही भांडण करायला. आमच्या वस्तीत याचाच रुबाब जास्त. वैताग आला होता. एवढंसं काही त्या आदिलच्या मनाविरुद्ध झालं की आलाच भांडण करायला! त्या दिवशी पण असंच झालं. खायचं यांनी आणि हाडं मात्र आमच्या घरासमोर. अजमल असं का केलं म्हणून विचारायला गेला तर भांडण करायला सुरुवात याची... आमच्या



खायचं यांनी आणि हाडं मात्र आमच्या घरासमोर. अजमल असं का केलं म्हणून विचारायला गेला तर भांडण करायला सुरुवात याची... आमच्या घरातल्यांना शिव्या द्यायला लागला. वाट्टेल ते बोलायला लागला. शेवटी अजमलनी मला बोलावलं. मीपण खूप प्रयत्न केला शांत करण्याचा, पण हा बोलतच होता.

घरातल्यांना शिव्या द्यायला लागला. वाट्टेल ते बोलायला लागला. शेवटी अजमलनी मला बोलावलं. मीपण खूप प्रयत्न केला शांत करण्याचा, पण हा बोलतच होता. डोक्याचा पार भुगा करून ठेवला होता आमच्या. किती दादागिरी सहन करणार? तेव्हाच ठरवलं ही ब्याद कायमची मिटवायची. म्हणून मग त्याला वाटेत गाठला. त्याला मोटरसायकल थांबवायला सांगितली. जाताना चाकू घेऊनच बाहेर पडलो होतो. तो थांबल्यावर लगेच खिशातून चाकू बाहेर काढून भोसकला त्याच्या पोटात. त्याचं आतडं बाहेर निघालं तेव्हा जिवाला शांतता भेटली.''

अजमल आणि सलमानच्या सांगण्यानुसार गुन्ह्यात वापरलेला चाकू पोलिसांनी मेमोरेंडम पंचनाम्याद्वारे हस्तगत करून तोही साहेबांनी प्रयोगशाळेकडे पाठवून दिला. काही काळाने पोलिसांना प्रयोगशाळेकडून सर्व अहवाल प्राप्त झाले. पोलिसांनी दोन्ही आरोपितांविरोधात मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

मा. न्यायालयाने दोन्ही पक्षाच्या बाजू ऐकून, समोर आलेले सर्व साक्षीपुरावे यांची छाननी करून अजमल आणि सलमान यांना भादंवि कलम ३०७, ३४ अन्वये दोषी ठरवत १० वर्षे सश्रम कारावास आणि प्रत्येकी २५ हजार रुपये दंड अशी शिक्षा सुनावली आहे.

सदर प्रकरणाचा तपास परभणी जिल्ह्यातील नानलपेठ पोलीस ठाण्याचे सहा. पोलीस निरीक्षक सुनिल पुंगळे, पोलीस अंमलदार अशोक सोडगीर, संतोष पटवे ज्ञानेश्वर निळे तसेच कोर्ट पैरवी म्हणून पोलीस अंमलदार दत्तारावा खुने यांनी अतिशय तत्परतेने पूर्ण केला आहे. ■

***(कथा सत्यघटनेवर आधारित असून पात्रांची नावे व काही प्रसंग बदलले आहेत.)***



चंद्रकांत भोयर
पोलीस अंमलदार
रेल्वे पोलीस ठाणे
गोंदिया

# लोभ

**लोभ किंवा हव्यास ही माणसाची सहजप्रवृत्ती. अजून हवं, आणखी हवं या अट्टाहासापायी अनेकदा माणसे स्वतःचे नुकसानच करून घेतात. त्या दिवशी दुपारच्या वेळी थोडी डुलकी लागल्यावर रामभाऊंचा मोबाईल चोरीला गेला तो अशाच कुणाच्यातरी लोभापायी. आणि 'अजून हवं'च्या हव्यासापोटीच तो चोर पोलिसांच्या तावडीत सापडला...**



रेल्वे पोलीस स्टेशन म्हणजे रेल्वे स्टेशनचे दुसरे रूप असते असे म्हणायला हरकत नाही. रेल्वे स्टेशनवर जशी गर्दी, गोंगाट आणि लगबग सुरू असते, अगदी तशीच रेल्वे पोलीस स्टेशनमध्ये बघायला मिळते. कोणी सामान चोरीला गेले म्हणून बिथरलेला असतो, कोणाचे लहान लेकरू गर्दीत हरवल्याने तो काकुळतीला आलेला असतो. कुठे गर्दीचा फायदा घेऊन कोणाचे तरी पाकीट मारले गेलेले असते किंवा चेन, मंगळसूत्र लंपास करण्यात आलेले असते.

शंभर प्रकारच्या तक्रारी आणि शंभर प्रकारच्या नमुन्याची माणसे. अशा ठिकाणी व्यवस्था सांभाळणे आणि सगळ्यांचे समाधान करणे म्हणजे तारेवरची कसरत. गोंदिया रेल्वे पोलीस स्टेशन देखील या नियमाला अपवाद नव्हते. नेहमीची गडबड, लगबग आणि गोंगाट सहन करत पोलीस अंमलदार चंद्रकांत भोयर त्यांच्या हातातले काम उरकत होते. समोर एक इसम पडलेल्या तोंडाने आपले पाकीट मारले गेल्याची तक्रार दाखल करत बसला होता. त्याचवेळी पोलीस अंमलदार अखिलेश रॉय हे भोयर यांच्या टेबलापाशी आले आणि जरा थबकले.

बोलावे की न बोलावे अशा विचारात ते दोन सेकंद थांबले. हे पाहून भोयर यांना आश्चर्य वाटले. कामाशी काम असा स्वभाव असणाऱ्या रॉय यांना नक्की काय सांगायचे असेल हा तर्क त्यांना करता येईना.

''काय झालं रॉय? आज तुमचं टेबल सोडून चक्क आमच्या टेबलापाशी?'' त्यांनी मिष्किलीने विचारले.

''ते रामभाऊ आलेत चौकीत.''

''रामभाऊ?'' गोंधळून भोयर यांनी विचारले.

''आपल्या मंजूचे वडील'' रॉय यांनी उत्तर दिले आणि भोयर यांचे लक्ष एकदम रॉयच्या टेबलच्या



**किशोर ईश्वर**
पोलीस अंमलदार
रेल्वे पोलीस ठाणे
गोंदिया



**अखिलेश रॉय**
पोलीस अंमलदार
रेल्वे पोलीस ठाणे
गोंदिया

दिशेने वळले. अत्यंत दु:खी मुद्रेने तिथे बसलेल्या रामभाऊंनी त्या परिस्थितीत देखील आदराने भोयर



**रामभाऊंची मुलगी मंजू म्हणजे पोलीस स्टेशनमधील सगळ्यांचा कौतुकाचा विषय. रामभाऊंनी स्वत: आयुष्यभर हमाली केली पण पोरीला मोठ्या हिमतीने शिकवले. पोरगी देखील मोठ्या जिद्दीने शिकली आणि नुकतीच एका सहकारी बँकेत नोकरीला लागली होती.**

यांना नमस्कार केला. रामभाऊंना अशा दु:खी अवस्थेत बघून भोयर पटकन उठले. रामभाऊंची मुलगी मंजू म्हणजे पोलीस स्टेशनमधील सगळ्यांचा कौतुकाचा विषय. रामभाऊंनी स्वत: आयुष्यभर हमाली केली पण पोरीला मोठ्या हिमतीने शिकवले. पोरगी देखील मोठ्या जिद्दीने शिकली आणि नुकतीच एका सहकारी बँकेत नोकरीला लागली होती. गेली कित्येक वर्षे स्टेशनवर राबणाऱ्या अनेक हमालांचे पोलिसांशी जिव्हाळ्याचे संबंध निर्माण झाले होते; रामभाऊ त्यातलेच एक.''

''काय झालं रामभाऊ?'' भोयरांनी मायेने विचारले.

''रामभाऊंचा मोबाईल चोरीला गेलाय. स्टेशनवर शोधत फिरत होते. मी त्यांना 'आधी चौकीत चला, फिर्याद नोंदवा' म्हणालो आणि इकडे घेऊन आलो.'' रामभाऊंच्या बाजूला उभ्या असलेल्या पोलीस अंमलदार किशोर ईश्वर यांनी माहिती दिली.

''तुम्ही चौकशी केली का तिथे?'' भोयरांनी विचारले.

''सगळीकडे केली. दोन चार जणांना हटकलंसुद्धा. पण हाती काऽऽही लागलं नाही. रामभाऊपण गांगरलेले होते, मग सरळ त्यांना इकडे चौकीला घेऊन आलो.'' ईश्वर सांगते झाले.

''हे बघा रामभाऊ, घाबरू नका. तुम्ही आधी तक्रार दाखल करा. म्हणजे मग आम्हाला कायदेशीर मार्गाने तपास करायला सुरुवात करता येईल. कोणत्या कंपनीचा मोबाईल होता, किंमत किती होती, रंग कोणता होता, शेवटचा तुम्ही मोबाईल कधी बघितला होता, तुमचा कोणावर संशय आहे का हे सगळं एकदम डिटेलवार सांगा.

घाबरून जाऊ नका. शांतपणे सगळं आठवा आणि माहिती द्या.'' रॉय यांनी रामभाऊंना धीर दिला.

''साहेब, पोरीने पहिल्या पगारातून हप्ते बांधून घेऊन दिला होता हो मोबाईल. चार दिवस पण नाही झाले. मी हणम्याच्या नंबरवरून माझा नंबर लावून पाहिला तर फोन बंद येतो आहे साहेब..'' त्यांच्या डोळ्यात पाणी तरळले.

''आपण काढू शोधून रामभाऊ. तुम्ही काही काळजी करू नका. हा हणम्या कोण? जरा सांगा पाहू...'' आपले हातातले काम संपवून आता पोलीस निरीक्षक पुरुषोत्तम खाडे देखील तिथे पोहोचले होते. इतकी सगळी माणसे धीर देत आहेत हे पाहून रामभाऊंनादेखील थोडा हुरूप आला आणि त्यांनी बोलायला सुरुवात केली.

''साहेब, हणम्या आपल्याच लायनीतला. काल रात्री जरा पित्त झालेलं, त्यामुळे झोप अशी व्यवस्थित लागली नाही. पहाटे पहाटे एक्सप्रेसची वेळ असल्याने चार वाजताच स्टेशनला आलो. एकदा जो कामाला लागलो तो दुपारचा एक कधी वाजला कळलंच नाही. बायकोने तोवर डबा पाठवला होता. डबा खाल्ला आणि जरा डुलकी घ्यावी म्हणून प्लॅटफॉर्म नंबर एकच्या पार्सल ट्रॉलीवर जरा अंग टाकलं. मोबाईल तेव्हा खिशात होता साहेब. मला चांगलं आठवतंय. डाव्या कुशीवर झोपायचं म्हणून मी मोबाईल पँटच्या उजव्या खिशात सरकवला आणि झोपलो. पॅसेंजरची वेळ झाली म्हणून हणम्या उठवायला आला तेव्हा उठलो. म्हणजे अडीच वाजत आले होते बघा साहेब. मोबाईलमध्ये घड्याळ पण बघता येतं. ते पोरीने शिकवलेलं म्हणून वेळ काय झाली बघायला मोबाईल काढायला गेलो तर खिशात मोबाईलच नव्हता..''



**''पोरीला नोकरी लागल्यापासून रामभाऊ जरा जास्त निवांत झाल्यासारखे वाटत आहेत. गेल्या पंधरा दिवसात मी त्यांना दोन वेळा देशी दारूच्या अड्ड्यातून बाहेर पडताना पाहिलं आहे.'' रॉयनी माहिती दिली आणि भोयर विचारात पडले.**

रामभाऊंचा आवाज पुन्हा कातर झाला. ''झोपेत पडला असेल म्हणून सगळीकडे शोध घेतला पण मोबाईल गेला तो गेलाच.''

''ईश्वर तुम्ही तातडीने रामभाऊंना घेऊन प्लॅटफॉर्म नंबर एकला जायला निघा. रामभाऊ झोपले होते त्या जागेची पाहणी करा. दोन पंचांना घेऊन घटनास्थळाचा पंचनामा करा. आजूबाजूला कोणी काही संशयास्पद पाहिलं का त्याचा तपास करा.'' भोयरांनी कामाची वाटणी केली. ईश्वर तातडीने रामभाऊंना घेऊन निघाले.

''चार दिवसातली दुसरी कंप्लेंट आहे ही.'' रॉय हलक्या आवाजात म्हणाले.

''हो रॉय. आणि म्हणूनच मी सावध झालो आहे. एखादी परप्रांतातली टोळी आपल्या हद्दीत हात साफ करायला तर शिरली नाहीये ना, अशी शंका मला येते आहे. त्यामुळेच मी स्वत: जातीने या दोन्ही प्रकरणात लक्ष घालायला सुरुवात केली आहे. रामभाऊ आपल्या ओळखीतले आहेत. त्यामुळे त्यांच्या वेदना आपण समजतो आहोत. पण परवा ज्या दुसऱ्या व्यक्तीचा मोबाईल चोरीला गेला आहे त्यांचं दु:ख रामभाऊंपेक्षा कमी नक्की नाही.'' भोयर काळजीच्या स्वरात म्हणाले.

''अजून एक जरा बोलायचं होतं..'' रॉय कुजबुजले.

''काय झालं?''

''पोरीला नोकरी लागल्यापासून रामभाऊ जरा जास्त निवांत झाल्यासारखे वाटत आहेत. गेल्या पंधरा दिवसात मी त्यांना दोन वेळा देशी दारूच्या अड्ड्यातून बाहेर पडताना पाहिलं आहे.'' रॉयनी माहिती दिली आणि भोयर विचारात पडले.

''म्हणजे दारूच्या नशेत रामभाऊंनी मोबाईल पाडला असावा असं वाटतं का तुला? पण आता तर ते व्यवस्थित दिसले. आणि मुख्य म्हणजे ते कामावर कधीच नशा करत नाहीत.'' भोयर बोलले खरे पण त्यांच्या शब्दात आत्मविश्वास असा जाणवत नव्हता.

थोड्या वेळाने ईश्वर परतले.

''आम्ही घटनास्थळाचा पंचनामा केला. मोबाईल नक्की चोरीला गेलेला आहे. आजूबाजूला तपास केला पण संशयास्पद असं कोणी काही पाहिलेलं नाही. आम्हालाही संशयास्पद असं काही आढळलं नाही.'' त्यांनी माहिती दिली.

''ईश्वर, मोबाईल चोरीला गेला साधारण दुपारी दोन वाजता. साधारण दहा हजार रुपयांचा मोबाईल. माझा अंदाज जरा चुकतोय असं मला वाटतंय. एखाद्या टोळीचं हे काम असतं, तर त्यांनी दुपारपर्यंत सावज सापडायची वाट पाहिली नसती. सकाळच्या गर्दीचा फायदा घेत हात साफ करण्याचा नक्की प्रयत्न केला असता.'' भोयर म्हणाले.

''बरोबर आहे. मला हे एखाद्या गंजेडी किंवा भटक्याचं काम वाटतं आहे. किंवा सहज मोबाईल हाताला लागतो आहे हे बघून एखाद्याचं मन भरकटलं असण्याचीही शक्यता आहे.'' ईश्वर यांनी आपले मत दिले.

''ईश्वर तुम्ही एक काम करा, तुम्ही आणि रॉय प्लॅटफॉर्म एक पासून चार पर्यंत उजव्या कडेने पाहणी करत फिरा. मी आणि खाडे साहेब डाव्या बाजूने शोध घेतो. एकमेकांच्या संपर्कात राहू आणि कोणाला काही संशयास्पद आढळलं तर एकमेकांना लगेच ॲलर्ट करू.'' भोयर यांनी तपासाची पुढची दिशा ठरवली.



**भोयरांचा अंदाज अगदी अचूक निघाला. पोलिसांनी संशयित म्हणून ताब्यात घेतलेला रंगा हाच खरा गुन्हेगार निघाला. त्याच्याकडून रामभाऊंच्या मोबाईलसोबत आणखी एक महागडा फोन देखील ताब्यात घेण्यात आला.**

''पण बऱ्यापैकी किमतीचा मोबाईल आयताच हाताला लागल्यावर चोरटा स्टेशनवरच थांबेल असं वाटतं तुम्हाला? तिथून लगेच पसार नाही होणार?'' खाडेंनी विचारले.

''लोभ फार वाईट असतो खाडे साहेब. इतका सहज हात मारायला मिळाल्यावर चोरट्याला हव्यास नक्की सुटणार आणि एखादी अजून सहज संधी मिळते का हे बघण्यासाठी तो नक्की प्रयत्न करणार... असा आपला माझा अंदाज आहे.'' आजूबाजूला आपली सावध नजर फिरवत भोयर म्हणाले. प्लॅटफॉर्म दोन वरून पुढे सरकत असतानाच त्यांचा मोबाईल खणाणला. फोन ईश्वरचा होता.

''दोन नंबर प्लॅटफॉर्मच्या पेपर स्टॉलपाशी निळ्या चौकडीचा शर्ट घातलेला एक माणूस उभा आहे. मी त्याच्या मागावर आहे. हा माणूस फक्त झोपलेल्या किंवा सामानावर अंग टाकून पडलेल्या लोकांचं बारीक निरीक्षण करत हिंडत आहे.'

''त्याला नजरेआड होऊ देऊ नका ईश्वर. आणि त्याने स्टेशनबाहेर पडण्याचा प्रयत्न केला तर लगेच त्याला ताब्यात घ्या. मी त्या बाजूला येतोच आहे.''

भोयरांचा अंदाज अगदी अचूक निघाला. पोलिसांनी संशयित म्हणून ताब्यात घेतलेला रंगा हाच खरा गुन्हेगार निघाला. त्याच्याकडून रामभाऊंच्या मोबाईलसोबत आणखी एक महागडा फोन देखील ताब्यात घेण्यात आला. दुसरा फोन देखील त्याने चोरलेला होता. आपण झोपायला निघालो होतो तेव्हा हा इसम समोरून चालत गेल्याचे रामभाऊंना आठवले आणि ते त्यांनी लगेच पोलिसांच्या कानावर घातले.

पोलिसांनी तातडीने आरोपीला

अटक केली. हजर असलेल्या साक्षीदारांची साक्ष नोंदवून घेतली. आरोपीवर मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले. पोलिसांचा अत्यंत हुशारीने केलेला तातडीचा तपास, पुरावे, फिर्यादीची आणि साक्षीदारांची साक्ष याची दखल घेत माननीय न्यायालयाने आरोपीला भादंवि कलम ३६९ अन्वये १ महिना साध्या कारावासाची शिक्षा सुनावली. अत्यंत समयसूचकपणे तपास करून आरोपीला ताब्यात घेणाऱ्या या पोलीस पथकातल्या पोलीस निरीक्षक पुरुषोत्तम खाडे, तसेच पोलीस अंमलदार किशोर ईश्वर, चंद्रकांत भोयर, आणि अखिलेश रॉय यांनी चोख कामगिरी पार पाडली आहे. ■

***(कथा सत्यघटनेवर आधारित असून पात्रांची नावे व काही प्रसंग बदलले आहेत.)***

## कविता

### प्रेरणेने याच एका

**देशप्रीतिचीच गाणी रोज मी गाणार आहे -**
**ऐक्य आणि शांती यांचे गीत मी होणार आहे**

**ना कधीहि भंगणारे देशव्यापी प्रेम माझे-**
**अंक साऱ्या अंतरांचा सूर मी होणार आहे-**

**ना मला मंजूर केंव्हा भेदभावाची गुलामी**
**सोडुनि त्या शृंखलांना मुक्त मी होणार आहे.**

**भावना अंकात्मतेची रोज माझ्या अंतरी-**
**देशसेवा ब्रीद माझे रोज मी जपणार आहे-**

**जात माझी माणसाची धर्म हा माणूसकीचा-**
**जाण याची सर्व लोका रोज मी देणार आहे-**

**स्पंदणारा ऊर माझा देशभक्तिने सदा हा**
**प्रेरणेने याच एका काव्य मी रचणार आहे-**



**दत्तात्रय जोशी**
**पुणे**

# सोशल मुशाफिरी

महाराष्ट्र राज्यातील विविध जिल्ह्यांतील पोलीस दलांच्या अधिकृत ट्विटर (आता एक्स) हॅन्डलवर त्या त्या भागातील महत्त्वाच्या घडामोडी, गुन्हे तपास, उपक्रम यांची माहिती देणाऱ्या काही पोस्ट्स.

## मुंबई वाहतूक पोलीस, २८ जुलै

**आम्ही फक्त दंड आकारत नाही तर तुमच्या आयुष्याला दंड बसू नये यासाठी प्रयत्नशील असतो! पोलीस हवालदार प्रविण क्षीरसागर यांनी फक्त सीटबेल्ट वापरण्याचा सल्ला दिला ज्याने भीषण अपघातातून दोन जीव वाचले.**




## वर्धा पोलीस, २६ जुलै

**वर्धा पोलिसांची कारवाई**

- **अवैध दारुची वाहतूक करणाऱ्यावर कारवाई**
- **गावठी मोहा दारुची भट्टी उद्ध्वस्त**



लोकमत

### दुचाकीवरुन सुरू होती दारूची तस्करी

लोकमत न्यूज नेटवर्क

**वर्धा :** दारूची अवैधरीत्या वाहतूक करणाऱ्या एकाला पोलिसांनी नाकाबंदीच्या दरम्यान अटक केली. त्याच्याकडून दुचाकीसह १ लाख ९ हजार ७०० रुपयांचा दारूसाठा जप्त केला. ही कारवाई शास्त्री चौकात रामनगर पोलिसांकडून करण्यात आली.

नवीन गजानन तिरपुडे (२५ रा.हिंदनगर) असे अटक आरोपीचे नाव आहे.

शास्त्री चौक येथून दारूची तस्करी सुरू असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार, पोलिसांनी नाकाबंदी करून सापळा रचला असता, नवीन तिरपुडे हा दुचाकीने सुसाट येताना दिसला. त्याला थांबवून पाहणी केली असता, त्याच्या दुचाकीवर विदेशी दारूसाठा मिळून आला. त्याला अटक करून गुन्हा दाखल केला.

**यांनी केली कारवाई**

ही कारवाई पोलिस अधीक्षक अनुराग जैन यांच्या मार्गदर्शनात पोलिस निरीक्षक अजय भुसारी यांच्या निर्देशात बंडू महाकाळकर, मुकेश वांदिले, विक्की अणेराव, मनोज भोमले यांनी केली आहे.

Hello Wardha
Page No. 4 Jul 21, 2025
Powered by: erelego.com

# नारळाच्या पाककृती



## ओल्या नारळाचे लाडू

### ओल्या नारळाचे लाडू

**साहित्य:**

काजू – १/४ कप

दूध पावडर – १/४ कप

तूप – १ चमचा

नारळाचा चव – ३ कप

वेलची पूड – १/४ चमचा

दूध – ११/४ कप

साखर – १ कप

**कृती:**

१. सर्वप्रथम एका मिक्सरच्या भांड्यात काजू व दूध पावडर घेऊन बारीक पूड तयार करून घ्या व बाजूला ठेवून द्या.

२. त्यानंतर एका पॅनमध्ये १ चमचा तूप घाला व ३ कप खोबऱ्याचा कीस घालून मंद आचेवर ८ ते १० मिनिटे परतत भाजून घ्या. नंतर खोबरा कीस चा हलकासा रंग बदलतो.

३. त्यानंतर त्यात ११/२ कप दूध घाला. म्हणजे जेवढा खोबरा कीस घेतलेला आहे त्याच्या अर्ध्या क्वांटिटी मध्ये दूध घाला व एकत्र करा.आणि हे मिश्रण मंद आचेवर १० ते १२ मिनिटे परतत रहा.

४. नंतर त्यात काजू व दुध पावडर ची तयार केलेली पूड घाला. त्याने लाडूला छान चव येते. व नंतर आणखी थोडावेळ मंद आचेवर परतत रहा.

५. आता हे मिश्रण चांगले भाजून झाल्यावर त्यात १ कप साखर घाला व मंद आचेवर छान परतत राहा.



# बीट नारळ वडी

६. थोडा वेळाने साखर वितळायला लागेल व हे मिश्रण ओलसर होईल. मिश्रण सतत परतत राहायचे थोड्यावेळाने त्याचा गोळा तयार होईल. गोळा तयार होईपर्यंत सतत परतत राहायचं व छान भाजून घ्यायचं.

७. आता थोडा वेळ हे मिश्रण थोड थंड होऊ द्या. व हलकं गरम असतानाच त्याचे लाडू बांधून घ्या.

## बीट नारळ वडी

### साहित्य:

दोन वाट्या खोवलेला नारळ

एक वाटी बीट तुकडे

अर्धी वाटी दूध

पाऊण वाटी साखर

अर्धी वाटी मिल्क पावडर

तूप

वेलदोडे पूड

### कृती:

१. बीटचे तुकडे थोड्या तुपात वाफवून मऊ करून घ्या.

२. गार झाल्यावर मिक्सर मध्ये त्याची पेस्ट करून घ्या. लागल्यास थोडे दूध घाला.

३. खोवलेला नारळ, बीट पेस्ट, मिल्क पावडर व साखर एकत्र करून शिजायला ठेवा. मंद आचेवर ढवळत राहा.

४. हळूहळू साखर वितळू लागेल व मिश्रण गोळा होऊ लागेल. दोन चमचे तूप घाला.(तुपामुळे वडीला चकाकी येते)

५. वेलदोडे पूड घालून मिसळून घ्या.

६. मिश्रण पूर्ण कढई पासून सुटू लागले की एका थाळीला तूप लावून घ्या आणि मिश्रण त्यात ओता.

७. एका वाटीच्या तळाला तूप लावा आणि मिश्रण थापून घ्या. थाळी ठोकून घ्या.

८. गरम असतानाच सुरीने हलक्या हाताने अपल्या आवडीनुसार वड्या पाडा. गार झाल्यावर वड्या सोडवून घ्या. ■

# शब्दकोडे

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ■ | ३ | ४ | | ■ | ५ | ■ |
| ६ | | ■ | ७ | | | ■ | ८ | | |
| ■ | ९ | १० | | ■ | ११ | १२ | | | ■ |
| १३ | | | ■ | १४ | | | | ■ | १५ |
| १६ | | | ■ | | ■ | ■ | ■ | ■ | |
| | ■ | ■ | १७ | | ■ | १८ | १९ | २० | ■ |
| २१ | २२ | २३ | | ■ | २४ | ■ | २५ | | |
| ■ | २६ | | ■ | २७ | | | | | ■ |
| २८ | | ■ | २९ | | | ■ | ■ | ३० | ३१ |
| ३२ | | | | ■ | ३३ | | | ■ | |

**आडवे शब्द**

१. दुसरा ४. चिवट ६. तर चा साथी ७. तारून नेणारा ८. धाक ९. वेळ मोजण्याचे साधन (मालवणी शब्द) ११. हिंदूंचा एक मोठा सण १३. पदार्थ खाण्याचे साधन १४. संपूर्ण ताकदीनिशी १६. सपाट भूभाग १७. डावा १८. नाराजी २१. कडोसरी २५. गणपती २६. सुट्टी २७. क्लिष्ट, कटकटीचा २८. होडी २९. जाण्याचे स्थान ३०. पद्धत ३२. बिहारमधला एक जिल्हा ३३. पुणे सोलापूर रस्त्यावरील एक गाव

**उभे शब्द :**

१. ब्राह्मण २. धनुष्यबाण ३. दिवस ४. नशीब ५. आदिवासींची चित्रकला ७. दह्याचे पेय ८. एक तेल बी १०. लोचट, दीनवाणा १२. पवित्र १३. तडाखा, ताडन १४. धोका १५. शरीर १७. रस्ता १९. सराव २०. नियमित वारीला जाणारा २२. श्रेष्ठ मनुष्य २३. उणे २४. वाया घालवणे २७. पिता, वडील २८. आवाज २९. एक नदी ३१. बारा वर्षांचा काळ

## दक्षताच्या वाचकांसाठी खुशखबर...

दक्षता मासिकाशी वाचकांचा स्नेहबंध असाच टिकून राहावा व जास्तीत जास्त वाचक दक्षता परिवाराशी जोडले जावेत या हेतूने आम्ही काही उपक्रम हाती घेतले आहेत. यापैकीच एक म्हणजे अचूक शब्दकोडे सोडवणाऱ्या तीन स्पर्धकांना विजेते म्हणून घोषित केले जाणार आहे आणि त्यांना रोख पारितोषिकही दिले जाणार आहे. त्यासाठी स्पर्धकांनी मूळ शब्दकोडे अचूक सोडवून त्याचे कात्रण, आपले नाव, अचूक पत्ता, पिन कोड, संपर्क क्रमांक तसेच बँकेचा अकाऊंट नंबर व आयएफएससी कोड या माहितीसह आमच्या दक्षताच्या पत्त्यावर त्या महिन्याच्या पंचवीस तारखेपर्यंत पाठवणे आवश्यक आहे. दर महिन्याला विजेत्यांची निवड केली जाईल व पुढील महिन्यामध्ये विजेत्यांची नावे जाहीर केली जाऊन त्यांचे बँक खात्यात ऑनलाईन बक्षिसाची रक्कम वर्ग करण्यात येईल. यासाठी आपला भरघोस प्रतिसाद अपेक्षित आहे.

**बक्षिसे : पहिले ₹५००/-, दुसरे ₹३००/-, तिसरे ₹२००/-**

# जुलै २०२५ च्या अंकात प्रसिद्ध झालेल्या शब्दकोड्याचे उत्तर व स्पर्धेतील विजेत्यांची नावे

नाव : ______________________________

पत्ता : ______________________________

______________________ मोबाईल : ______________________

अकाउंट नं : ______________________ आयएफएससी कोड ______________________

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ह | त | भा | गी | | र | जो | नि | वृ | त्ती |
| र | म | ल | | व | ग | | ता | शा | |
| ण | | चं | पा | | ड | बा | | ली | न |
| | भा | द्र | प | द | | जा | र | | |
| ना | ना | | भी | | आ | र | स | पा | नी |
| रा | म | | रू | धि | र | | ना | | ळा |
| ज | ती | न | | क्का | | श्या | | | वं |
| | | का | सा | र | | म | धु | म | ती |
| नि | रा | शा | | | जू | | स | खा | |
| शा | प | | ब | ळ | | भ | र | णा | |



शब्दकोड्याचे अचूक उत्तर प्राप्त न झाल्याने या महिन्यात कुणीही विजेता ठरलेले नाही.

# लाखो वाचक

## ज्याची आतुरतेने वाट पाहतात!

महाराष्ट्र राज्य पोलिसांचे मुखपत्र

# दक्षता

सर्वदूर पोहोचलेले वाचकप्रिय मासिक




नागरिक आणि महाराष्ट्र पोलीस यांच्यातील
महत्त्वाचा दुवा असलेले, सर्वोच्च खपाचे,
५० वर्षांची दर्जेदार परंपरा असलेले
मराठी मासिक

- रोमांचकारी सत्यकथा,
- विविध उत्कंठावर्धक सदरे,
- जनता व पोलीस यांच्यातील जिव्हाळा जपणारे वाङ्मय
- रसिक वाचकांच्या पसंतीस उतरेल असे दर्जेदार साहित्य...

**आपली प्रत आजच राखून ठेवा!**

महाराष्ट्र पोलीस

सद्रक्षणाय खलनिग्रहणाय


पत्रव्यवहारासाठी पत्ताः
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय
शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१
दूरध्वनीः ०२२-२२८३४५११/२२०४९७०१
mpd.dakshata@mahapolice.gov.in

वर्गणीसाठी दूरध्वनी: ०२२-२२८३४५११

DAKSHATA Marathi Magazine August 2025. RNI Registration No. 21352/1974. Postal Reg.No. MCS/131/2024-26 Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office GPO, Mumbai - 400 001 on 5th and 6th of every month. Date of Publication is 1st of every month.

महाराष्ट्र पोलीस

सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय




**प्रेषक :**

**सरसंपादक, दक्षता**

महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय,
शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा,
मुंबई - ४०० ००१

**प्रति,**